अन्नपूर्णा
परिवाराचे त्रैमासिक
मार्च २०२०

# संवाद





वार्षिक सभा - मुंबई विभाग



वार्षिक सभा - पूणे विभाग

# अनुक्रमणिका


* संपादकीय — *सुरेश धोपेश्वरकर*
* मूल्ल्यांना बदलू या — *वृषाली मगदूम*
* बेकार भारी नियतीशी अटळ अकाली करार!... — *राही श्रुती गणेश*
* बातचीत विद्याताईशी... — *अंजली मुळे, आशा साठे*
* लय भारी वाटतंय 'सुपर वुमन' म्हटलं की! — *डॉ. कुंदा प्रमिला निळकंठ*
* अमेरिकेतील स्त्रीवाद : शोध आणि बोध — *स्नेहा गोळे*
* मागे वळून पाहाताना — *वैशाली चवाथे*
* लक्ष्मी नारायण सहसंस्थापक स्वच्छ प्रेरणादायी प्रवास — *वृषाली मगदूम*
* एक आई म्हणून मला कसा समाज हवा आहे? — *वासंती ताठे*
* घर — *मालती भादळे*
* विज्ञान निर्भयता नीती स्त्रिया आणि अंधश्रद्धा — *दीक्षा इंद्रसेन गोरे*
* अन्नपूर्णा वार्तापत्र — *अंजली दिवाण पाटिल*
* सत्य आणि तथ्य, याचा भ्रम — *प्रतिमा जोशी*



**संपादकीय मंडळ**

- **डॉ. मेधा पुरव-सामंत**
- **कॉ. सुरेश धोपेश्वरकर**
- **वृषाली मगदूम**
- **अंजली पाटील**
- **बाळासाहेब पिसाळ**

**पत्ता :** अन्नपूर्णा परिवार, सेक्टर १९ ई प्लॉट नं १८, कोपरी गाव, वाशी, नवी मुंबई.

**फोन :** ०२२-२७८४५६१७


**संपादकीय**

# अस्वस्थ वातावरणातील आंतरराष्ट्रीय महिला दिन

८ मार्चच्या आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या सर्व सभासदांना अन्नपूर्णा परिवारातर्फे हार्दिक शुभेच्छा.

यंदाचा आंतरराष्ट्रीय महिला दिन जगात अधिक अस्वस्थता आणि अस्थिरता जाणवत असताना येत आहे.

चीनमधील करोना व्हायरस संसर्गजन्य रोगामुळे आतापर्यंत २६०० बळी घेतले आहेत. रोज जगाच्या नव्या भागांत या संसर्गजन्य रोगाने आजारी झालेली माणसे जाहीर होत आहेत. भयाचे आणि चिंतेचे वातावरण सर्वत्र पसरत आहे. या रोगावर अजूनही प्रतिबंधात्मक उपाय सापडलेला नाही.

इराण आणि अमेरिकेमधील खडाखडीत तात्पुरता विश्राम आहे. परंतु अफगाणिस्थानात तालिबान आणि अमेरिकेत समझोता झाल्यानंतर एक नवीन भू-राजकीय परिस्थिती निर्माण होणार आहे. त्याचे अफगाणिस्थान, भारत, पाकिस्तान या तिन्ही देशांत आणि अफगाणिस्थानातील महिलांवर विशेष विपरीत परिणाम जाणवतील, असा आंतरराष्ट्रीय क्षेत्रांतील तज्ज्ञ मंडळींचा अंदाज आहे.

सबंध जग कर्जाच्या विळख्यात सापडले आहे. राष्ट्रीय सरकारे, औद्योगिक कंपन्या, व्यक्तिश: नागरिक सर्व जणांवर कर्जाचा बोजा आहे. जगाच्या एकूण उत्पन्नाच्या २३० टक्क्यांवर हे कर्जाचे प्रमाण गेले आहे. परिणामी कर्ज आणि व्याज याच्या परतफेडीमुळे बचतीचा आणि बचतीतून गुंतवणुकीच्या मार्गात नवे नवे अडथळे निर्माण होत आहेत. त्याचा विपरीत परिणाम नव्या रोजगार निर्मितीवर होत आहे.

नवीन तंत्रज्ञानाच्या वापरांमुळे जुने पारंपरिक उद्योगधंदे बंद पडत आहेत. नवे उद्योगधंदे जास्त भांडवल खर्च करणारे (खाणारे) आणि कमी नवे रोजगार निर्माण करणारे आहेत. त्यामुळे जगात सकल राष्ट्रीय उत्पन्न (GDP) वाढत आहे. पण दरडोई उत्पन्न कमी होत आहे किंवा त्यामध्ये स्थगितता (Stagnation) आली आहे. जगभर त्यामुळे चिंतेचे वातावरण आहे.

त्यामुळे जगभर विकास कुणासाठी, आर्थिक विषमता का वाढत आहे? नवे रोजगार कुठे आहेत, पर्यावरणाचा नाश न करता विकास करा, या सर्व कष्टकरी जनतेच्या मागण्या बनत आहेत.

**रोजगाराच्या आघाडीवरील या परिस्थितीमुळे जगातील युवक–युवती त्यामुळे अस्वस्थ आहेत.**

देशोदेशीचे राज्यकर्ते सामान्य माणसाच्या या रोकड्या प्रश्नांना उत्तरे द्यावयाची टाळाटाळ करीत आहेत. रोजी, रोटी, कपडा, मकान (घर), आरोग्याचे प्रश्न यावरून सर्वसामान्य जनतेचे लक्ष दुसरीकडे वळविण्यासाठी धर्माचे, विद्वेषी राष्ट्रवादाचे, वंशवादाचे संकुचित प्रश्न निर्माण करीत आहेत. आपल्या भारतातदेखील राज्यकर्ते याच मार्गाने जात आहेत.

२०१९ साली पुन्हा फेरनिवड झाल्यानंतर मोदी सरकारची पावले भारतीय प्रजासत्ताक ज्या संविधानाच्या आधारे चालत आहे. त्यापासून अघोषित फारकत घेऊन भरकटत जाऊ लागली आहेत.

१३० कोटी भारतीयांना त्यांनी आपले नागरिकत्व सिद्ध करावे यासाठी नव्या परीक्षेस बसावे, असे केन्द्र सरकारने फर्मान काढले आहे.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला भारत स्वतंत्र झाला. २६ जानेवारी रोजी भारतीय संविधानानुसार (घटनेनुसार) आपल्या स्वतंत्र भारताचे ''सार्वभौम प्रजासत्ताकात'' रूपांतर झाले. १९४७ ते १९४९ अशी अडीच वर्षे घटना समितीत प्रदीर्घ चर्चा करून संविधान संमत झाले आहे. या संविधानाच्या प्रास्ताविकात ''आम्ही भारताचे लोक'' अशी सुरूवात आहे. या संविधानानुसार भारताचे नागरिकत्व कोणत्याही धर्मावर, जातीवर, वंशावर, भाषेवर किंवा लिंगावर आधारित नाही. ते सर्वसमावेशक आहे.

मोदी सरकारने ''नागरिकत्व सुधारणा कायदा'' केवळ ४८ तासांत लोकसभेतील पाशवी पाठिंब्यावर पास करून घेऊन. अफगाणिस्थान, पाकिस्तान, बांगलादेश येथून भारतात आलेल्या फक्त हिंदू, शीख, ख्रिश्चन, बौद्ध, जैन, पारसी अशा स्थलांतरितांना ते जर ३१ डिसेंबर २०१४ पूर्वी आलेले असतील तर त्यांना भारतीय नागरिकत्व देण्याचा निर्णय घेतला आहे. याचा एक परिणाम म्हणजे या देशांतून जे मुस्लीम बांधव आले असतील त्यांना भारतीय नागरिकत्व मिळणार नाही. धार्मिक छळवादामुळे स्थलांतरित असतील त्यांनाच हे नागरिकत्व मिळेल, वरील तिन्ही देश हे मुस्लीमबहुल आहेत म्हणून आम्ही या देशांतील मुस्लिमांचा समावेश केलेला नाही. असा अत्यंत लंगडा बचाव केला आहे. परिणामी भारताबाहेर देशाच्या प्रतिमेला आच पोहोचली आहे. याच कायद्यापाठोपाठ नॅशनल सिटीझन रजिस्टर (NCR) आणि ''नॅशनल पॉप्युलेशन रजिस्टर (NPR)'' या योजना राबविण्याचे ठरविले आहे. सध्याच्या भारताचे नागरिक असलेल्या लोकांनासुद्धा यासाठी नव्याने कागदपत्र दाखल करावी लागतील. आदिवासी, भटके विमुक्त भारतातील विविध राज्यांत स्थलांतरित झालेले नागरिक यांच्यामध्ये सध्या सरकारच्या या धोरणाविषयी शंका, प्रश्न आणि चिंता आहेत. वंशावळीतील आपल्या पालकाचे दाखले देता न आल्यामुळे किंवा कागदपत्रे दाखल न केल्यामुळे आसामात १९ लाख नागरिकांचे नागरिकत्व वादग्रस्त ठरले आहे. या पार्श्वभूमीवर सरकारच्या 'हम करेसो कायदा' या धोरणामुळे आज एका नव्या दुभंगाला, आपल्या सार्वभौम प्रजासत्ताकाला सामोरे जावे लागत आहे.

आर्थिक मंदीच्या काळात अशा तऱ्हेची नवीनच समस्या निर्माण करून मोदी सरकारने नागरिकां-नागरिकांमध्ये संभ्रमाचे आणि भेदभावाचे वातावरण निर्माण केले आहे. शासनाच्या दमन यंत्रणेमार्फत हा संवेदनशील प्रश्न हाताळू नये, असे केंद्र सरकारला अन्नपूर्णा परिवाराचे आवाहन आहे.

आपल्या परिवाराच्या मुंबई २३ जानेवारी आणि पुणे १ फेब्रुवारी रोजी झालेल्या वार्षिक सभांमध्ये आपल्या सभासदांना वाटणाऱ्या या चिंतेचा म्हणूनच आपण ठराव रूपाने उच्चार केला आहे. राज्य शासनाकडे ठराव पाठवून त्यांनासुद्धा आपल्या सभासदांना आणि अन्य कष्टकऱ्यांना जाचक ठरणारे हे कायदे पास करू नयेत, म्हणून विनंती केली आहे.

आपल्या वस्ती पातळीवरील कार्यकर्ते सभासद यांनी आपल्या स्टाफसमवेत राणी लक्ष्मी पुतळा, डेक्कन जिमखाना, स्वारगेट, कौसरबाग पुणे या ठिकाणी झालेल्या ठिय्या आंदोलनात सक्रिय भाग घेऊनसुद्धा केंद्र सरकारला अशीच विनंती केली आहे.

**या अंकाचे मुखपृष्ठ म्हणूनच या विषयाला धरून आहे.**

राही श्रुती गणेश यांचा युवकांच्या या प्रश्नांवरील आंदोलनाची भूमिका समजावून सांगणारा लेख या अंकात आहे. तसेच हिंगणघाट येथील मुलीवर झालेला जळीत हल्ला प्रकरणाचा परामर्ष घेणारा लेख आपल्या विश्वस्त वृषाली मगदूम यांचा आपण छापला आहे. डॉ. कुंदा प्र. नि यांनी आधुनिक स्त्रीवर असलेल्या विविध कामाच्या बोजावर माहितीपूर्ण लिहिलेला लेख आम्ही छापला आहे. अमेरिकेतील स्त्रीवादाचा शोध हा स्नेहा गोळे यांचा लेख आपल्या दैनंदिन प्रश्नांना एक आंतरराष्ट्रीय पार्श्वभूमी आहे. याचे भान निर्माण करणारा आहे.

निमिष साने, ठाणे, अरुणचंद्र गवळी, पुणे, मल्लीका अमर शेख मुंबई, अशोक इंगळे - अकोला यांच्या कविता या अंकात छापल्या आहेत. अंजली पाटील यांचे वार्तापत्र छापले आहे.

❐

# मूल्ल्यांना बदलू या

■ वृषाली मगदूम

हिंगणघाटातील घटना व त्याचे पडसाद समाजमनावर व माध्यमावर उमटत आहेत. जनक्षोभ तर आरोपीला जाळा, फाशी द्या म्हणत आहे. हिंगणघाटात गरीब घरातील एक मुलगी शिकली महाविद्यालयात तिला लगेच नोकरी लागली. मोठ्या उमेदीने करिअरची स्वप्नं पाहात ती नोकरी करू लागली. पण आरोपी ज्याचं लग्न झालंय ज्याला सहा महिन्यांची मुलगी आहे तो या मुलीच्या मागे लागला. छेडछाड करू लागला. तिने घरी सांगितले. घरच्यांनी त्याला समजावून, खडसावून सांगितले. पण त्याचा पाठलाग थांबला नाही अन त्याच्या एकतर्फी प्रेमाला प्रतिसाद न देणाऱ्या त्या मुलीच्या तोंडावर पेट्रोल फेकले व तिला पेटवून दिले. हॉस्पिटलमध्ये या मुलीने शेवटचा श्वास घेतला. लोक रस्त्यावर उतरले. आंदोलन केले. आरोपीच्या शिक्षेची मागणी केली. काही दिवसांनी जनआक्रोश थांबेल. निरागस, सुंदर अशा या मुलीचे आयुष्य उद्ध्वस्त झाले आहे. आईवडिलांना आता एक न्यायालयीन लढाई लढायची आहे. आरोपी व त्याचे नातेवाईक त्याला सोडविण्यासाठी प्रयत्न करत राहतील. न्यायालयीन प्रक्रियेत अडथळे आणतील. प्रक्रिया लांबवत राहतील. अन् या गरीब, अनभिज्ञ, सरळ, चाकोरीतील आयुष्य जगणाऱ्या आईवडिलांचे आयुष्यच बदलून जाईल. घर कोर्टमय होऊन जाईल. संघर्ष करणाऱ्या इतरांचं आयुष्य पूर्वपदाला येईल. पण तिच्या आईवडिलांचे आयुष्य नरकमय होऊन जाईल. आर्थिक भार आहे. शारीरिक कष्ट आहेत. मानसिक खचणं आहे. एक माथेफिरू मुलगा एका अख्ख्या कुटुंबाचं आयुष्य यातनामय करून टाकतो. कारण काय तर याच्या प्रेमाला मुलगी हो म्हणत नाही. बायको व मुलगी असलेला हा गृहस्थाधर्मी असा विचार का व कसा करू शकतो याचे आश्चर्य वाटते.

आपल्या समाजातील पुरुषप्रधानता हे याचे उत्तर आहे. मूल्ल्यांना वाढविताना समाज, घर, कुटुंब त्याच्यात अहंकार जोपासते. मुलगा म्हणून घरात त्याला विशेष वागणूक मिळते. त्याच्या मुलगा असण्याचे फायदा तो वडील, काका, मामा यांच्या जीवनक्रमातून पहात आलेला असतो. त्यालाही तसेच वागायचे आहे. हे घरातून बिंबवले जाते. मुलगे घरकाम करत नाहीत. स्वयंपाक करणे. भांडी घासणे. भाजी आणणे. ही सारी कामे बायको आहेत व ती आई, काकी, ताई यांनीच करायची असतात. हे सांगितले जाते. मुलगा म्हणून घरकामाचा भार नाहीच. पण घरातील इतर पुरुषाप्रमाणे सर्व गोष्टी हातात मिळण्याची सवयही त्याला लागते. यातूनच स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन संकुचित होत जातो. घरातली बाई ही पुरुषवर्गाच्या सेवा करण्यासाठी, आज्ञा झेलण्यासाठी व सर्व काही ऐकण्यासाठी आहे असे मुलग्यांना वाटते. घरात आई त्याला आग्रह करून वाढताना, ताई त्याचे कपडे धुताना, वडील फक्त त्याच्या अभ्यासाची चौकशी करताना तो पाहात आलाय. पुरुषी वृत्ती घरातून जोपासली जाते.

पुरुषप्रधान संस्कृतीच्या मुसीतून बाहेर पडलेला हा मुलगा समविचारी मूल्यांना भेटतो व मर्दानगीची भाषा शिकायला लागतो. मर्दानगी म्हणजे संध्याकाळी शहराच्या कोपऱ्याकोपऱ्याला उभे राहून येणाऱ्या जाणाऱ्या मुलीची छेडछाड करणे. टवाळकी करणे. सिनेमा

व माध्यमातून तयार झालेल्या गैरसमजुतीवर आधारलेल्या अशास्त्रीय लैंगिकतेवर हे मुलगे बोलत असतात. मुलीची छेडछाड करण्यात कोण पुढाकार घेईल तो त्यांच्यातील मर्द असतो. हा मर्द मग आणखी चेकाळतो व मुलीचे प्रेम जिंकण्याच्या पैजाही मारतो. मुलगी ही उपभोगाची वस्तू आहे. आपल्या मालकीची आहे. ती आपणाला नाही म्हणूच शकत नाही. अशा पुरुषी कल्पना त्यांच्या मनात पक्क्या रुतलेल्या असतात. तू माझी नाही झालीस तर कोणाचीच होऊ शकत नाहीस हा अहंम तर इतका टोकाला जातो की मग ॲसिड हल्ला, पेट्रोल फेकणे असे कृत्य करून तिला जीवनातून उठवले जाते. तू असाध्य अप्राप्य असशील तर तुला जगण्याचा अधिकार नाही हे हा पुरुष ठरवतो.

ॲसिड व पेट्रोल फेकून मुलीचे आयुष्य उद्ध्वस्त करणारा पुरुष याला प्रेमाचा अर्थ माहीत असतो का? प्रेम हे प्रामाणिक असते. प्रेमामध्ये त्याग असतो. प्रेमात नाही पचवण्याची ताकद असते. प्रेम व मैत्री यातला फरक न कळणे हे मुलांचे दुर्दैव आहे. आज मुलगा व मुलगी यांच्यात मैत्री हवी ती निव्वळ, निकोप व निरोगी हवी. र. धों. कर्वेंची सहशिक्षणाची संकल्पना हीच आहे. मुलगे व मुली एकत्र शिकवले पाहिजेत कारण मुलगी ही मुलगी नसून ती एक माणूस आहे. मन, विचार, भावना यांनी परिपक्व आहे. तिच्या विचारांचा आदर माणूस म्हणून केला गेला पाहिजे. मुलगी म्हणून दुय्यमत्व देणे व तसे वागवणे समानतेला छेद देणारे आहे.

मुलगा हा समूहाने संध्याकाळी शहरभर बिनकामाचा फिरत असतो. रात्री उशिरा घरी येतो. पण कामानिमित्त संध्याकाळी घराबाहेर दिसलेल्या बहिणीवर मात्र डाफरतो तिने सातच्या आत घरात असले पाहिजे. अशी त्यांची दादागिरी असते व या दादागिरीचे आई, आजी व बाबांकडून कौतुक होते. या व अशा टोळक्यांनी मुलीची सुरक्षितता धोक्यात आणली आहेच. पण व्यक्ती म्हणून समाजात मोकळेपणाने फिरण्याचे स्वातंत्र्य अधिकार हिरावून घेतला आहे. हैद्राबादमधील डॉक्टर मैत्रीण प्रॅक्टिस करत होती. दवाखान्यात जात होती. तिच्यावर बलात्कार करून तिला मारून टाकले गेले. म्हणजे मुलीच्या शिकण्यावर, करिअरवर हा घाला आहेच. पण समाजात तयार झालेल्या या भयावह वातावरणात मुलींना बाहेर पडण्यावरून घरच्यांची पाबंदीही आहे.

ॲसिड अटॅकमधील छपाक पीडित लक्ष्मी अगरवाल या मुलीची साहसकथा सांगणारा छपाक हा सिनेमा नुकताच प्रदर्शित झाला पण वास्तवाकडेसुद्धा प्रेक्षकांनी पाठ फिरवली. मेघना गुलजार दिग्दर्शित व दीपिका पदुकोन निर्मित अशा या सिनेमात दीपिकाने अतिशय समरसून लक्ष्मीची भूमिका मालती या नावाने केली आहे. २००५ साली पंधरा वर्षेच्या लक्ष्मीवर ३२ वर्षेच्या नराधमाने ॲसिड टाकले होते. लक्ष्मीवर अनेक शस्त्रक्रिया झाल्या ती यातून वाचली. कोर्टाच्या असंख्य फेऱ्या घालून ॲसिडसंबंधीचा कायदा करण्यात तिला यश आले. ॲसिड अटॅक चळवळीत ती आज काम करतेय. पण मध्यमवर्गीय घरातील ही मुलगी सात वर्षे कोर्टाची लढाई लढत होती. या काळात वडिलांचा मृत्यू झाला. भावाला टी. बी. झाला. समाजातून अनेक उलटसुलट प्रतिक्रिया उमटल्या. ॲसिड अटॅकने कुरूप केलेल्या लक्ष्मीला नोकरी मिळत नाहीय. ब्युटी पार्लरमध्ये सुंदर मुलगीच नोकरी करू शकते. हे पार्लरच्या मालकिणीने तिला सांगितले. म्हणजे स्त्री सुंदर असणे हे ती सुपरपॉवर असल्याचे मानले जाते. हेही समाजाच्या अनारोग्याचे लक्षण आहे. या अनारोग्यातूनच मुलीचे सुंदर असणे तिच्यासाठी शाप ठरते. कोणीतरी नराधम तिला कुरूप करतो व नंतर समाजाकडून बळ देण्याऐवजी तिला वाळीत टाकले जाते. तिच्या कुरूपतेला नाकारले जाते. बाईला माणूस म्हणून समजून घेणे. ती आहे तशी तिचा स्वीकार करणे. तिच्या संघर्षात, लढाईत तिच्या पाठीशी उभे राहणे हे जेव्हा समाजातून होत नाही. तेव्हा ही लढाई तिची एकटीची राहते. आज परिस्थितीत बदलही झाला आहेच. नाकारणारे खूप असले तरी स्वीकारणारे हाताच्या बोटावर मोजण्याइतके आहेत. जे कुटुंबाला जगण्याचं बळ देतात. जे निर्भया केसमध्ये झाले. कोपर्डी केस मध्ये झाले. पण जे खैरलांजीमध्ये घडू शकले नाही. लक्ष्मी अगरवाल छपाकमधील मालती हिच्या पुनर्वसनासाठी व संघर्षात्मक लढाईसाठी वकील मैत्रीण पुढे सरसावली. आर्थिक पाठबळ देणारे कुटुंब भेटले हेही महत्त्वाचे खैरलांजी बलात्कार हत्याकांडात मागे राहिलेले भाऊ भोतमांग संघर्ष करून मृत्यू पावले. बलात्कार हा बलात्कार असतो त्याला जात, वर्ग नसतो. हा मुलीवरील अत्याचाराचा, हिंसाचाराचा कडेलोट असतो. त्यामुळे त्याला जातीय व वर्गीय गालबोट लागले नाही पाहिजे.

वस्तीमध्ये बचतगटाच्या माध्यमातून महिलांच्यात आज एक ताकद आली आहे. त्या आर्थिक सक्षम झाल्या आहेत. आर्थिक सक्षमता ही त्यांच्या सामाजिक व मानसिक विकासाची सशक्त पायरी आहे. त्यांच्या सशक्तीकरणामुळे आज त्यांच्या मुली शिकू लागल्या आहेत. शिक्षणाने त्या सजग झाल्या आहेत. माणूस म्हणून स्वत:चा विचार करू लागल्या आहेत. समान वर्तनाची रास्त अपेक्षा करू लागल्या आहेत. पण वस्तीमधील व आजूबाजूच्या भवतालमधील मुलगे गोंधळलेले आहेत. आपली जोडीदार, आपली

मैत्रीण, बहीण, आई यांच्याकडे माणूस म्हणून नाही तर बाई म्हणून पाहतात. घरकाम व नोकरी या दोन्ही आघाड्यांवर तिनेच काम करायचे असते. असा त्यांचा समज असतो. समानतेची व माणूस म्हणून जगण्याची अपेक्षा करणाऱ्या मुलीशी कसे वागावे याबाबत मुलगे गोंधळलेले आहेत. पुरुषप्रधान संस्कृतीचा व परंपरेचा हा भाग ते मानतात.

मूल्यांना बदलू या असे म्हणत मुलग्यासाठी विचारपरिवर्तनाचे वारे समाजातून झिरपले पाहिजेत. नुसते प्रबोधन करून भागणार नाही. तर कृतीतून ते दिसले पाहिजे. कुटुंब, समाज, नोकरी या सर्वच आघाड्यांवर हे झाले पाहिजे. हिंगणघाट, हैद्राबाद या व अशा घटनांची सलग मालिकाच तयार होतेय. नुसते अस्वस्थ होणे व हळहळ व्यक्त करणे थांबवून आपल्या घरापासून बदल सुरू झाला पाहिजे. पुरुषांना, मुलग्यांना जबाबदार लैंगिक वर्तन शिकवले पाहिजे. मुलींना नाही म्हणण्याचा अधिकार आहे व मुलांनी त्याचा निकोप व निरोगी वृत्तीने स्वीकार केला पाहिजे हे मुलग्यांना शिकवले पाहिजे. हिंसाचारी, बलात्कारी युवकापेक्षा समान विचारांचे जोडीदाराचा आदर करणारे, अशा युवकांची संख्या वाढली पाहिजे थोडक्यात प्रेम व आकर्षण फरक समजून घेतला पाहिजे. प्रेमात आत्मीयता असणं विचारपूर्वक केले जाते. प्रेमासाठी तडजोड व त्याग केला जातो प्रेम सहवासातून व हळूहळू निर्माण होते. प्रेमाला वयाचे बंधन नसते. प्रेम क्षमाशील असते व दीर्घकाळ टिकते विचारपूर्वक केलेल्या प्रेमात गुणदोषासह स्वीकार असतो. मागचा-पुढचा विचार न करता चटकन निर्माण होणारे व अवास्तव कौतुक करणारे आकर्षण असते. जे स्वार्थी असते. तात्कालिक असते. गुणदोष समजून न घेता तारुण्यात रूपावर भाळून केलेले असते. मालकी हक्काच्या भावनेतून सूड घेणारे असते. हा फरक मुलांना समजून सांगून त्यांना आता बदलाच्या वाटेवर नेऊया.

❖❖❖

# कविता

## हम देखेंगे

पाहूच आपण
याचि देही याचि डोळा हो
पाहूच आपण
दिस सटवाईनं लिहिलेला
अनंताच्या भाळी कोरलेला
पाहूच आपण
जुलुमांचे निगरगट्ट हे पहाड
फू म्हणता तेव्हा जातील उडून
पिचलेल्या आपल्या पायतळी
धडाडेल धडधड ही धरणी
नि छत तडकेल सत्तामत्तांचं
कडाडत्या तडिताघातांनी
अडत्यांच्या गराड्यातून तेव्हा
देवाची सुटका होईल
पायरीशी अडवल्या शुद्धांना
गादीवर बसवलं जाईल
भिरकावून सगळ्या मुकुटांना
सर्व तख्तं फोडली जातील
फक्त नाम हरीचं राहील
जो भ्रमही भ्रमाचा आकारही
जो दृश्यातही अन् दृष्टीतही
दुमदुमणार 'अनल हक'चा नारा
तो तू गं, मीही सचियारा
अन् प्रवर्तेल चक्र धम्माचं
ऋत तूही, मी अन् भव सारा
मूळ कविता
फैज अहमद फैज
मराठी रूपांतर

**- निमिष साने ठाणे**

❒

# बेकार भारी नियतीशी अटळ अकाली करार!...

■ राही श्रुती गणेश

सत्तेला प्रश्न विचारणं म्हणजे राजकारण आणि पाकिस्तानला धडा शिकवण्याची मागणी करणं म्हणजे देशप्रेम अशी तरुणांची समज घडविण्यात उजव्या राजकारणाला यश आलं आहे. या अशा वातावरणातही ज्यांना देशप्रेमाच्या या नव्या व्याख्या मान्य नाहीत असे तरुणतरुणी गेल्या पाच वर्षांत मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर उतरून आंदोलन करत आहेत. शैक्षणिक स्वातंत्र्य, सामाजिक न्याय, बेरोजगारी, पर्यावरण अशा विविध विषयांवर सत्तेला प्रश्न विचारत आहेत. राजकारणात पडलेल्या या अशा तरुणाईला बदनाम करण्याचे प्रयत्नही केले जात आहेत. या तरुणाईच्या विखंडित आवाजांमधून उद्याच्या भारताची निर्मिती होणार आहे.

जागतिकीकरणासोबत जिचा जन्म झाला ती आजची तरुण पिढी आहे. साधारणपणे ९०च्या दशकात आणि त्याच्या आगेमागे जन्मलेल्या पिढीला आज 'तरुण' म्हटलं जातं. आमचा स्वभाव, आवडीनिवडी, आमची स्वप्नं आणि या देशाकडे, जगाकडे पाहण्याचा आमचा दृष्टिकोन, आमच्या कल्पना हे सगळं समजून घ्यायचं तर थोडं मागे जाऊन सुरुवातीपासून आमचा काळ समग्रपणे पाहायला हवा. आमच्या काळाला असलेली पार्श्वभूमी समजून घ्यायला हवी.

### उंच आकाशातली मापं आणि हाताबाहेरच्या मोजपट्ट्या

स्वातंत्र्यानंतर १९५० आणि ६०च्या दशकात जन्मलेल्या पिढीने सुखवस्तू जगण्याची काही एक स्वप्नं पाहिली. १९८०च्या दशकापासून हे सुखवस्तू जगणं हळूहळू हाती येऊ लागले, असं वाटू लागलं आणि ९०चं दशक येताच जागतिक बाजारासाठी आपण आपली दारं उघडली. स्वातंत्र्यलढ्याच्या काळातल्या आदर्शवादी जगण्याला आणि 'साधी राहणी, उच्च विचारसरणी' अशा सरळसोट मूल्यचौकटीला मागे टाकून त्यापुढच्या पिढीने सुखवस्तू जगण्याची बिनतोड परिमाणं ठरवून घेतली. स्थिर नोकरीतून विकत घेता येण्याजोग्या सगळ्या सुखसोई, टीव्ही आणि गाडी, स्वत:च्या मालकीचं घर आणि बँकेतली निश्चित ठेव या 'स्टेटस' आणि 'स्टॅण्डर्ड'च्या मोजपट्टीवरच चांगलं जगणं मोजलं जाऊ लागलं. अशा स्टेटसचा सतत पाठलाग करत राहणं हेच इथल्या माणूसपणाचं, चांगल्या नागरिकत्वाचं लक्षण झालं. नागरिकत्व आणि माणूसपणाच्या अर्थांना अशा प्रकारे बदलणाऱ्या या पिढीच्या पोटी जन्मलेली मुलं म्हणजे आम्ही... आजची तरुणाई...

'चांगल्या जगण्या'ची काही एक स्पष्ट भौतिक परिमाणं शिकतच आमची ही पिढी मोठी झाली. खुल्या बाजाराने हाताशी आणलेल्या सगळ्या वस्तूंची बाजारांमधली रेलचेल पाहत वाढली. जागतिकीकरण झालं, मात्र देशातली गरिबी कमी न होता उलट गरीब-श्रीमंतांमधली दरी वाढत गेली. मात्र याच काळात या दोन टोकांमधला मध्यमवर्ग वेगाने वाढत गेला. स्वावलंबन, काटकसर आणि बचतीची सर्वसाधारण मानसिकता असलेल्या भारतीय मध्यमवर्गाचा चेहरा बदलत होता. आपल्याकडे असणारा पैसा 'दाखवणं' हे आता महत्त्वाचं होत गेलं आणि 'खर्च करणं' हा मनोरंजनाचा भाग म्हणून स्वीकारलं गेलं. एखाद्याची 'लायकी' किंवा 'औकात' हे त्याच्या पैसा 'दाखवण्याच्या' क्षमतेच्या समानार्थी होत गेलं. कसल्या तरी अदृश्य यशाच्या आकर्षणातून एका न संपणाऱ्या तीव्र स्पर्धेचा जन्म झाला. एकेकट्या स्पर्धकाने स्वार्थीपणे, आजूबाजूला न पाहता, फार विचार न करता खेळण्याची ही स्पर्धा होती. मात्र समाजात प्रत्येकाला या स्पर्धेत

उतरण्याची खुली संधी होती का? तर नाही. मात्र घरोघरी पोहोचलेल्या टीव्हीच्या माध्यमातून, रोज रात्रीच्या मालिकांमधून ही मूल्यं एक आदर्श प्रारूप म्हणून सगळीकडे पोहोचत होती. या अशा बदलांच्या काळात आमचं बालपण गेलं. १९९१ हे वर्ष उजाडण्याची चाहूल लागेपर्यंत आत्यंतिक स्पर्धा, धूर्त व्यवहारीपणा, केवळ आपण आणि आपल्या कुटुंबाच्या भल्याचा विचार समोर ठेवून 'प्रगती' करत राहणं हे इथल्या तरुणपणाचेच गुणविशेष होऊन गेले होते. त्या काळी, आमच्या शाळकरी वयात आम्ही आजूबाजूच्या मुलामुलींसोबत खेळताना, रस्त्याकडेला सतत झगमगणारे फ्लेक्स पाहताना, टीव्हीवरच्या मालिका आणि बॉलीवूडचे सिनेमे पाहताना, नातेवाईकांसोबत लग्न समारंभ, सालाना येणारे सारे सण साजरे करताना तरुण असण्याचे हे सगळे अर्थ नकळतपणे शिकत गेलो.

## विकासाची भुतं आणि खोल खचलेले दिवस

जागतिकीकरणाच्या लाटेमुळे आपल्या अर्थव्यवस्थेच्या 'देशी' प्रारूपाला मोठा फटका बसला. 'विकास' म्हणजे काय, याचे निश्चित अर्थ आमच्या आधीच्या पिढीने आखून घेतले होते. देशाची आर्थिक वाढ म्हणजे विकास अशी त्याची सरळसरळ व्याख्या केली गेली. प्रगती किंवा विकास म्हणजे जगाविषयीच्या समजुतीतली वाढ आणि एकूण सगळ्या समाजाच्या सुस्थितीकडे चाललेली वाटचाल हा नेहरूयुगातला, संविधान सभेतला अर्थ विसरून आता 'विकसित' म्हणजे लंडन-न्यूयॉर्क किंवा बीजिंग-टोकियोची झगमगीत चित्रं अशी सोपी समीकरणं तयार झाली. मोठे उद्योग, मोठी शहरं आणि सिमेंट-काचांची बांधकामं हीच सहजपणे विकासाची प्रतीकं झाली. या विकास नावाच्या पोकळ स्वप्नातूनच आजच्या तरुणाईच्या मानगुटीवर बसलेल्या किती तरी भुतांचा जन्म झाला आहे.

आजही आपल्या देशातला रोजगाराचा प्रमुख स्रोत असलेली शेती ही या विकासाच्या एकसाची स्वप्नाचा पहिला बळी. जागतिकीकरणाचा आक्रमक मारा आणि शेतीकडे करण्यात आलेलं व्यवस्थात्मक दुर्लक्ष यामुळे शेती दिवसेंदिवस अशक्य होत गेली. शेती आणि शेतीशी जोडलेल्या इतर व्यवसायांमधल्या कुटुंबांची अवस्था भयंकर दयनीय होत गेली. शेतीच्या अस्मानी आणि सुल्तानी संकटांच्या जीवघेण्या चक्रात अडकल्यामुळे भारतभरात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या कहाण्या अविरतपणे ऐकू येत आहेत. वाढत्या शहरांनी किती तरी शेतजमिनी सहजपणे गिळून टाकल्या आहेत. शेतीवरचे हे सगळे आघात पहिल्यांदा सहन करणाऱ्या शेतकऱ्यांची मुलं हे आजचे 'तरुण शेतकरी' आहेत. त्यांना त्यांच्या शेतकरी या ओळखीचा, त्यांच्या असण्याचा संताप येत राहतो. एक तर 'कधी तरी आपण या दलदलीतून बाहेर पडू' म्हणत ते स्वत: स्थलांतराचं स्वप्न पाहतात किंवा हायवे, मेट्रो, एमआयडीसीसारख्या प्रकल्पांमधून रातोरात 'विस्थापित' होतात. अर्थात शेतीभोवती असलेली ग्रामीण अर्थव्यवस्था कोसळते, तेव्हा तिथून बाहेर पडू पाहणाऱ्या या तरुणांना शहरंदेखील स्वीकारत नाहीत. महानगरांच्या परिघांवर वाढत जाणाऱ्या उपनगरांमध्ये आणि निमशहरी औद्योगिक वसाहतींमध्येच हे तरुण ढकलले जातात. बचाव, सुटका, पलायन आणि विस्थापन हा या अर्थाने आजच्या तरुण पिढीच्या एका मोठ्या वर्गाचा अपरिहार्य जीवनक्रम झाला आहे.

गेल्या दोन-तीन दशकांमध्ये जशी एकेक सरकारी क्षेत्रं बाजारासाठी खुली झाली, तसं रोजगाराचं चित्रही बदललं. गेल्या चार-पाच वर्षांमध्ये तर ते फारच चिंताजनक झालं आहे. आज देशातल्या बेरोजगारीने गेल्या पंचेचाळीस वर्षांतला सर्वोच्च दर गाठला आहे. भारताच्या सर्व भागांतल्या, अतिशय वैविध्यपूर्ण पार्श्वभूमीवर जगणाऱ्या तरुणांची आज काही तरी एकच एक सामूहिक ओळख शोधायची तर ती 'बेरोजगार' अशी आहे. आताच्या परिस्थितीत शिक्षण न घेणाऱ्या तरुणांविषयी दोनच विधानं ठामपणे करता येतात. एक तर ते बेरोजगार आहेत किंवा तात्पुरत्या कंत्राटावरच्या अस्थिर नोकरीत आहेत. अगदी थोड्या तरुणांना समाधानकारक उत्पन्न देणाऱ्या कायम नोकऱ्या मिळाल्या आहेत. याशिवाय वर्षानुवर्षं नोकरी शोधून थकून गेलेल्या तरुणांची संख्याही वाढते आहे. संयुक्त राष्ट्राच्या 'मानव विकास आयोगा'च्या आकड्यांनुसार १५ ते २५ या वयोगटातले १० पैकी ८ तरुण बेरोजगार आहेत. ज्यांना रोजगार आहे, तो प्रामुख्याने असंघटित क्षेत्रामधला आहे. म्हणजे नोकरीचं स्वरूप आणि क्षेत्रं वेगवेगळी असली तरी बहुतेकांचा रोजगार हा तात्पुरता, अस्थिर आणि बेभरवशी आहे. खेड्यांमध्ये आणि शहरांमध्ये अपूर्ण रोजगार किंवा 'अर्धरोजगारा'चं (?) प्रमाण मोठं आहे. अपुऱ्या वेतनावर किंवा अनियमित मोबदल्यावर कधी काम आहे, कधी नाही अशी परिस्थिती वरकरणी 'रोजगार' असलेल्या अनेकांची आहे. रोजंदारीवर किंवा हंगामानुसार पडेल ते काम करणाऱ्यांची संख्या वाढते आहे. केवळ आर्थिक वाढीचे आकडे, एवढीच विकासाची मर्यादित व्याख्या केल्यामुळे रोजगारनिर्मिती हा देशाच्या प्रगतीतला महत्त्वाचा घटक संपूर्णत: दुर्लक्षित राहिला, त्याचे हे परिणाम आहेत.

एकीकडे सरकारी नोकऱ्यांची संख्या कमी होते आहे आणि दुसरीकडे सरकारी नोकऱ्या मिळवण्यासाठी धडपडणाऱ्यांचं प्रमाण वाढत आहे. 'सेंटर फॉर द स्टडी ऑफ डेव्हलपिंग सोसायटी'च्या (सीएसडीएस) २०१६ मधल्या 'मूड ऑफ द नेशन' या अभ्यासानुसार ६५% तरुणांना सरकारी नोकरी हवी आहे, त्यासाठी ते प्रयत्न करत आहेत. एमपीएससीसारख्या वेगवेगळ्या सरकारी नोकरभरत्यांच्या परीक्षांच्या तयारीचा एक स्वतंत्र उद्योगच उभा राहू पाहतो आहे. अर्थात उपलब्ध जागा आणि उमेदवार यांच्यामध्ये इतकी मोठी दरी आहे की, या उमेदवारांपैकी बहुतेकांच्या पदरी अखेर निराशाच पडते.

रोजगाराच्या या चित्रामुळे गेल्या काही वर्षांत वयाच्या तिशीपर्यंत आणि त्यानंतरही घरातल्या वडीलधाऱ्या माणसांवर अवलंबून राहणाऱ्यांची संख्या वाढत गेली आहे. रोजगाराची वाट पाहण्याचा काळ वाढत जातो, तशी भविष्याची आशा हळूहळू संपत जाते. बेरोजगारी ही 'बेकारी' होत जाते आणि 'मी काम शोधत आहे' असं म्हणता म्हणता 'आम्ही काहीच नाही; बेकार आहोत!' असं बोलायची वेळ येते. मग निव्वळ 'टाइमपास'च सगळ्या जगण्याला व्यापून टाकतो.

एकीकडे तरुणाईची स्वप्नं आणि दुसरीकडे विकासाच्या पोकळ विचारातून जन्मलेली आजच्या हलाखीची निरनिराळी चित्रं, या दोन टोकांमधली दरी दिवसेंदिवस रुंदावत चालली आहे. शिक्षणानंतर आपले घर-संसार उभारू पाहणाऱ्या तरुणाईला आता ही दरी ओलांडता यायची नाही हेदेखील उमगत चाललं आहे.

**सोडून गेली मॉडर्निटी!**

या सगळ्याचा दोष कुणाला द्यायचा? तरुणाई निराश आहे, संतापलेली आहे. शिक्षण व्यवस्था मोडकळीला आलेली आहे. स्वावलंबी, सुस्थिर होणं अशक्य होत चाललं आहे आणि भविष्याची आशा दिसत नाही. आपल्या नियतीसोबतच्या अटळ कराराची तारीख जवळ येत जावी, अशा अस्वस्थतेने दिवस ढकलताना सगळा समाजच आपली स्वप्नं साकार होऊ देत नाहीत म्हणून कारस्थान करतो आहे, असा भास होत राहतो. प्रत्येक दिवसाला कट-कारस्थानाचा गंध येत राहतो. साकार होऊ न शकणाऱ्या आकांक्षांच्या वाढत चाललेल्या ढिगातून भयंकर उलथापालथ होऊ पाहते. या भीतीचं आणि संतापाचं करायचं काय?

गेल्या वर्षी 'मुळशी पॅटर्न' नावाचा एक सिनेमा येऊन गेला. शहराच्या विस्तारामध्ये आपली शेती गमावून बसलेल्या मुळशी तालुक्यातल्या मराठा कुटुंबाची ही गोष्ट. आपलं गाव सोडून पुण्यासारख्या महानगरात आल्यावर मोठी मानहानी पदरी पडल्यावर ही मुळशीची तरुण मुलं एकगठ्ठा गुन्हेगारी विश्वात पाऊल टाकतात आणि काही काळातच पोलीस आणि गुंडांच्या धुमश्चक्रीत स्वत:चे जीव गमावतात, असं या सिनेमाचं थोडक्यात कथानक. पाटीलकीच्या वैभवाचे दिवस पाहात वाढलेला सिनेमाचा नायक राहुल तात्पुरत्या पैशाच्या लोभापायी आपली जमीन विकणाऱ्या बापाला कधीच माफ करू शकत नाही. जमीन विकून गाव सोडताच पाटलाचा मौल्यवान फेटा मातीमोल होतो आणि कुटुंबाची दैना होते. अखेर मुलाच्या खुनानंतर म्हातारा पाटील स्वत:ला कानाखाली मारून घेतो आणि सिनेमा संपतो. मानहानी आणि संतापापायी स्वत:च तयार केलेल्या एकेका शत्रूपासून पळता पळता जीव देणारा राहुल हा आजच्या तरुणाईचं चपखल प्रतीक आहे. उठताबसता बापाला शिव्या घालण्याशिवाय काय करावं हे त्याला सुचत नाही आणि पळता पळता येणाऱ्या अटळ अकाली मृत्यूच्या लख्ख जाणिवेतून त्याला इतके भास होत राहतात की तो वेडा होतो.

तरुणांच्या आजच्या परिस्थितीबद्दल मागच्या पिढीला आणि गेल्या काही दशकांतल्या राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय धोरणांना जबाबदार धरणं सोपं आहे. जगभरात तशी या दोन पिढ्यांमधली अघोषित लढाईही उभी राहू लागली आहे. कुणी या लढाईला 'नवा वर्गसंघर्ष' म्हणतं आहे, तर कुणी दोन टोकांच्या मूल्यचौकटींमधली लढाई म्हणून याकडे पाहतं आहे. मात्र आज खरं तर या दोन्ही पिढ्या वेगवेगळ्या पातळ्यांवरच्या मोठ्या उलथापालथींमधून जात आहेत.

ब्रिटिश वसाहतकाळात आपला पाश्चात्त्य आधुनिकतेशी पहिल्यांदा परिचय झाला. पुढे स्वातंत्र्यलढा आणि नव्या राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेमध्ये स्वातंत्र्य, समता, व्यक्तिस्वातंत्र्य या मूल्यांचा प्रसार करण्याचा प्रयत्न झाला. भारताच्या संविधान सभेने पाश्चात्त्य आधुनिकतेचा गंभीर अभ्यास करून त्यातून तावून सुलाखून निघालेल्या मूल्यं आणि पद्धतींचा संविधानाच्या निर्मिती प्रक्रियेत अंतर्भाव करून घेतला. या मूल्यांना समांतर आणि त्यांच्याशी संबंधित असलेला भारतीय परंपरेतला मानवतावाद आणि सहभाव या प्रक्रियेमध्ये शोधण्यात आला. मात्र संविधानाचं हे तत्त्वज्ञान इथल्या सामान्य जनतेपर्यंत तितकंसं झिरपलं नाही.

'आधुनिक' असण्याचे भौतिक अर्थ तेवढे उचलत, पाश्चात्त्य सुबत्तेची तीव्र ओढ आणि आपल्या परंपरांचा प्रखर अभिमान यांच्या ताणातून गेल्या पिढीने आधुनिक व्हायचा प्रयत्न केला. सरंजामी व्यवस्थेतून मिळणारे फायदेही सोडवत नाहीत आणि 'आधुनिक'पणातून मिळणारं स्वातंत्र्य तर हवं आहे, अशा पेचातून सधन उच्चवर्णीय पुरुषांनी या आधुनिकतेसोबत 'फ्लर्ट' करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. त्यातून 'नव्या जगा'बद्दल काही आडाखे बांधण्याचा प्रयत्न केला मात्र घर-गाव-भावकीच्या रिंगणात असा आधुनिकपणा उपरा ठरतो हे ओळखून त्यांनी हवं तिथे सहजपणे त्याचा नाद सोडला. स्त्रिया आणि विविध परिघांवरच्या समूहांमधल्या लोकांनी याच सरंजामी व्यवस्थेतून बाहेर पडण्यासाठी या आधुनिकतेचा वापर करायचा प्रयत्न केला. हे सगळे आवाज चढे होते, व्यवस्थेला सरळ आव्हान देणारे होते. वाढत्या मध्यमवर्गाबरोबर वाढत्या संख्येने शहरांमधल्या स्त्रिया नोकरीसाठी घराबाहेर पडू लागल्या, तेव्हा धिमेपणाने 'कुटुंबा'च्या कल्पनेचेही अर्थ बदलू लागले.

आजची तरुणाई ही गेल्या कित्येक दशकांमधली अशी पहिली पिढी आहे, की जिची एकूण भौतिक परिस्थिती तिच्या आधीच्या पिढीपेक्षा वाईट आहे. परंपरेच्या हातात हात घालून वाढलेल्या आधुनिकतेमधल्या भेगा आता खोलवर रुंदावल्या आहेत. आधुनिकतेच्या

आजच्या रूपांनी सगळं जगणं व्यापून टाकलेलं असताना परंपरानिष्ठतेची तहान वाढू लागली आहे. ज्या मध्यमवर्गीय मुलींच्या आया संघर्ष करत पहिल्यांदा नोकरीनिमित्त घराबाहेर पडल्या, त्यांच्याच मुलींना आज त्यांचं धार्मिक, परंपरावादी असणं पुन:पुन्हा जाहीर करावंसं वाटतं आहे. त्यातून नव्या परंपरांचाही जन्म होतो आहे. घरामध्ये तशी परंपरा नसतानाही आजच्या अनेक विवाहित तरुणींना 'सिंदूर' भरून कामाला जावंसं वाटतं. सिनेमा आणि मालिकांमधून लग्नातले वेगवेगळे विधी आणि समारंभ उत्साहात साजरे होतात. मात्र याच वेळी कुटुंब आणि लग्नसंस्थेलाच आतून कुठून तरी सुरुंग लागत असल्याची चाहूलही लागतेय. एका जातसमूहाच्या लोकांनी एका परिसरात राहण्याची पद्धत संपते आहे त्याबरोबर शहर आणि गावाच्या भूगोलात नवे मोहल्ले, नव्या वस्त्या आणि नवे 'वेशीबाहेरचे प्रदेश' उभे राहत आहेत. मोठ्या शहरांमध्ये लग्न आणि कुटुंबाच्या कचाट्यात न पडता जगणाऱ्या तरुणांच्या मालिका वेबसीरिजमधून लोकप्रिय होत आहेत आणि त्यातल्या किती तरी पेचांकडे पहिल्यांदाच बॉलीवूड सिनेमा पाहू लागला आहे. जवळच्या प्रेमाच्या नातेसंबंधांपासून ते लोकशाहीपर्यंत, वैयक्तिक-खासगी ते सामाजिक-राजकीय अशा सगळ्या नात्यांचा नाद सोडण्याची अनिवार ओढ एकीकडे खेचते आणि त्याच वेळी आपली परंपरानिष्ठता जाहीर करण्याची निकड दुसरीकडे ओढत राहते.

सीएसडीएसच्या 'मूड ऑफ द नेशन'चे आकडे सांगतात की, आजच्या तरुणांपैकी पाचातल्या दोघांना वाटतं की, स्त्रियांनी लग्नानंतर नोकरी करू नये. लग्नापूर्वी ओळख, भेटीगाठी, प्रेमप्रकरणं या सगळ्याला तरुण मोठ्या प्रमाणावर जाहीरपणे विरोध करताना दिसत आहेत. 'लिव्ह इन' संबंधांविषयी तर बहुसंख्याकांचा थेट विरोधी आवाज आहे. आंतरधर्मीय आणि आंतरजातीय लग्नांचं प्रमाण अजूनही अतिशय कमी आहे. जगण्यासाठी लग्न आवश्यकच आहे, असं वाटणाऱ्यांची संख्यादेखील गेल्या काही वर्षांत वेगाने कमी होते आहे. अर्थात खासगी आयुष्याबाबतची प्रत्येकाची मानसिकता आणि जाहीरपणे बोलली जाणारी मतं यातही मोठी तफावत दिसते. जे जाहीरपणे बोलले जाते, ती मूल्यचौकट एका पातळीवर मान्य असली तरी प्रत्यक्ष जगताना त्यामध्ये तडजोडी, बदल करत राहावे लागतात. पूर्ण होऊ न शकणाऱ्या भौतिक स्वप्नांचा डोलारा, त्यातून वाटणारी प्रचंड अस्वस्थता... तरुणाईच्या या कोंडीतूनच हिंदुत्वरक्षक, गोरक्षक, योगी आदित्यनाथांच्या उत्तर प्रदेशातले 'अँटी रोमिओ' तरुण तयार होत आहेत.

आजच्या तरुणाईला त्यांच्या वाटेचं प्रेम करायची मुभा नाही. आपली फँटसी प्रत्यक्षात येऊ शकत नाही याची जळजळीत जाणीव दिवसरात्र त्रास देते. 'टिंडर'सारख्या मोबाइल डेटिंग ॲपवर मुलींचे फोटो पाहत बसण्यापलीकडे फार काही करता येत नाही. मग यातले काही जण हातात काठ्या-सळ्या घेऊन बागांमध्ये बसणाऱ्या तरुण जोडप्यांना दहशतीत ठेवतात, हुसकावून लावतात आणि तत्त्वनिष्ठ धर्मकार्याचं पोकळ समाधान मिळवतात. दर 'व्हॅलेंटाइन डे'ला बजरंग बलीची शपथ घेऊन आपलं हे 'प्रेम-विरोधी' कार्य सुरू ठेवण्याची शपथ घेतात.

मागच्या पिढीने आधुनिकतेवर प्रेम करण्याचा प्रयत्न केला असेल, तर आजच्या तरुणाईला ती जणू टाकून चालली आहे. ही 'मागे राहिलेली', 'सोडून दिलेली' पिढी आहे. मात्र या ब्रेक-अपमुळे खचून जायचं की सुटकेचा नि:श्वास टाकायचा हेच तिला अजून कळत नाही. ती अजून धक्क्यातून सावरते आहे.

**आपला आपला मामला आणि देशासाठी कायपण!**

२०१४च्या लोकसभा निवडणुकांनंतर भारताच्या राजकारणाचं चित्र पूर्णत: पालटलं आहे. भाजपच्या नेतृत्वाखाली पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या बहुमताने बिगरकाँग्रेस सरकार सत्तेत आलं आणि पाच वर्षांच्या बहुचर्चित कारकीर्दीनंतर २०१९च्या लोकसभा निवडणुकांमध्ये एनडीएने पुन्हा एकदा सरकार स्थापलं. या भाजप सरकारला 'मोदी सरकार' म्हणत अध्यक्षीय निवडणुकांच्या धर्तीवर निवडणूक लढवण्यापासून अमित शहांच्या 'बूथ लेव्हल' रणनीतीपर्यंत, गेल्या पाच वर्षांत भारतीय राजकारणाची मध्यभूमी पूर्णपणे बदलली. २०१४ला विकासाच्या एकमेव मुद्द्यावर निवडणूक जिंकल्यानंतर पहिल्या मोदी सरकारने हिंदू-मुस्लीम ध्रुवीकरणाचे किती तरी मुद्दे सतत चर्चेत ठेवले. अर्थव्यवस्था कोसळण्याच्या मार्गावर असताना, विकासाच्या बाबतीत देश गटांगळ्या खात असूनही केवळ 'पाकिस्तानवरचा विजय' या देशभक्तीच्या एकमेव मुद्द्यावर भाजप पुन्हा एकदा निवडून आला. बऱ्याच अंशी या बदलाचे कर्तेधर्ते इथले तरुणच होते. ते भाजपचे बूथ लेव्हल कार्यकर्ते होते, मतदार होते आणि भाजपच्या नव्या राष्ट्रवादाचे पहिले 'नागरिक'सुद्धा.

हिंदू राष्ट्रवादाभोवती उभारलेल्या देशप्रेमाच्या वातावरणाचे वाहक आणि चालकही तरुणच आहेत. सोशल मीडियावरून केलेल्या प्रचाराची पहिली फळं भाजपला अर्थातच तरुणांकडून मिळाली. १९९० पासूनच्या आमच्या प्रवासात यश मिळवण्यासाठी जगण्याच्या तीव्र स्पर्धेत केवळ स्वत:चाच विचार करणं आमच्या इतकं अंगवळणी पडलं आहे की, याव्यतिरिक्त दुसरा रस्ता असतो, हेच विसरायला होतं आहे. राजकारण वाईट असतं, त्यात आपण पडायचं नसतं हेच आम्ही लहानपणापासून ऐकत आलोय. विद्यार्थ्यांनी, तरुणांनी प्रश्न विचारणं म्हणजे तर फारच मोठा गुन्हा! अभ्यासाचा, कामाचा बहुमोल वेळ वाया घालवून सरकार-दरबारबद्दल बोलणं हे तर अतिशय बेजबाबदार, नालायकपणाचं लक्षण!

सरकारकडून कोणत्या बाबतीत अपेक्षा ठेवायची हेसुद्धा आता सरकारच सांगत आहे. शिक्षण आणि रोजगार या तरुणांसाठीच्या सर्वात महत्त्वाच्या बाबींमध्ये सरकारने लक्ष घातलं पाहिजे, त्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, अशा अपेक्षा आता कुणाच्याच नाहीत. एखाद्याला चांगलं शिक्षण मिळालं नाही, तर त्यासाठी पैसा मोजण्याची त्याची 'औकात' नाही किंवा एखाद्याला नोकरी मिळत नाही, तर त्या व्यक्तीमध्येच काही तरी खोट असली पाहिजे, असे निष्कर्ष आम्हीच आमच्या पिढीबद्दल काढतो. महागाईमुळे घर चालवता न येणं, आर्थिक अस्थिरतेमुळे लग्न न जमणं किंवा शेतीच्या-जमिनीच्या प्रश्नामुळे कुटुंबावर संकटं येणं या सगळ्या गोष्टी म्हणजे प्रत्येकाचा 'आपला आपला मामला' आहे. असंच आजची तरुणाई पाहते आहे.

हे सगळे प्रश्न व्यवस्थेशी जोडलेले आहेत, प्रचलित राजकारणाशी संबंधित आहेत हे समजून घेण्याइतकं राजकीय आकलन अद्याप तयार झालेलं नाही. सत्तेला प्रश्न विचारणं, जबाबदार धरणं म्हणजे राजकारण आणि राम मंदिरासाठी रस्त्यावर येणं, पाकिस्तानला धडा शिकवण्याची मागणी करणं म्हणजे देशप्रेमाची अभिव्यक्ती अशी तरुणांची समज घडवण्यात उजव्या राजकारणाला यश आलं आहे. सरकारने शिक्षण, आरोग्याच्या क्षेत्रात मूलभूत काम करणं, सर्वांच्या सुरक्षिततेसाठी प्रयत्न करणं यापेक्षा सरकारने पाकिस्तानला धडा शिकवावा, जगाच्या नाकावर टिचून महासत्ता असल्याचं चित्र दाखवावं एवढीच आता तरुणाईची सरकारकडून अपेक्षा आहे. मात्र ज्यांना असं वाटत नाही, किंबहुना ज्यांना सभोवतालचं चित्र पाहून अस्वस्थ वाटतं आहे, ते प्रचंड दहशतीत कायमचे गप्प होऊन गेले आहेत. एका मूकपणाच्या, दहशतीच्या संस्कृतीने त्यांना वेढून टाकलं आहे.

उठताबसता देशप्रेमाबद्दल बोलायचं, मात्र प्रत्यक्ष आयुष्यात स्वत:पलीकडे कुठे पाहता येत नाही, अशा दोन चेहऱ्यांनी आजची तरुण पिढी नकळत राजकारण खेळते आहे. दलित आणि मुस्लिमांविरुद्ध हिंदू उच्चवर्णीय तरुणांच्या मनात संताप भडकतो आहे. या दोन परिघावरच्या समूहांना आजवर लाडावून ठेवल्यामुळेच आम्हाला किती तरी अडचणींना तोंड द्यावं लागतं आहे, असं म्हणत रिकामपणातून वैफल्य आलेले तरुण पुरुष आपलं पुरुषत्व सिद्ध करण्यासाठी या वंचित समूहांवर हल्ले करत आहेत. गेल्या पाच वर्षांमध्ये झुंडीकडून होणाऱ्या हत्यांच्या प्रमाणात प्रचंड वाढ झाली आहे. या हल्ले करणाऱ्या, गोरक्षणाच्या नावाखाली एकेकट्या मुस्लीम-दलिताला मारून टाकणाऱ्या झुंडीमध्ये गावाच्या पारावर बसणारे तरुणच आहेत. त्यांच्या हातात काठ्या आहेत आणि डोक्यात कायमचा संताप. ढकलून दिलं की ते सहज ढकलले जातात. एका अनाम 'अराजकीय' अराजकाचा ते कधीच भाग बनून गेलेले आहेत.

**ग-मिंग ! थावरा ! इन्कलाब !**

एखादी गोष्ट चूक आहे की बरोबर, चांगली की वाईट, योग्य की अयोग्य याबद्दल आज जगभरातल्या तरुणाईच्या मनात अखंड साशंकता आहे. बहुतेकांना तसा विचार करायची गरजच वाटत नाही. आमची कुठलीच मूल्यं नाहीत किंवा सगळीच मूल्यं सापेक्ष आहेत किंवा त्याही पुढे जाऊन मूल्यांची आता गरजच नाही, असा पवित्रा जगभरातली तरुणाई घेते आहे. काळाविषयीचं, हातातून निसटत चाललेल्या वेळेचं जेवढं भान आजच्या तरुणाईला आहे, तेवढं याआधी कधीच कुठल्या काळात नसावं. एकीकडे या पिढीला 'आपला काळ', 'आपली वर्षं' याबद्दल बोलायची खूप हौस आहे. अगदी महिन्याभरापूर्वीची गोष्ट 'आता जुनी झाली' असं आम्ही सहजपणे म्हणतो. वेगवेगळ्या माध्यमांमधून चोवीस तास आमच्यापर्यंत पोचणारी माहिती, विविध प्रकारचा आशय यामुळे रोज या साठ्यात प्रचंड वाढ होते आहे. काळाविषयीच्या वाढत्या भानातून 'जमेल तितकं गाठीला जगून घेणं' आणि लवकरात लवकर जमेल तितकं बांधणं याचं ओझं वाढत जात आहे. अगदी वीस वर्षांच्या वयातच 'आपली अमुक गोष्ट करायची राहून गेली', 'वेळ निघून चालला' असं वाटून निराशाग्रस्त होणं हे सामान्य झालं आहे. एखादी गोष्ट हाती न येण्याच्या या भीतीला 'फोमो' (फियर ऑफ मिसिंग आऊट) म्हणत सोशल मीडियावरची तरुणाई व्यक्त होत आहे. जे तरुण सोशल मीडियावर नाहीत, त्यांनाही या भीतीपासून सुटका करून घेणं दिवसेंदिवस अवघड होत चाललं आहे.

आज जगभरात जवळपास सगळीकडेच लोकशाहीसमोर मोठे धोके आहेत. विकासाच्या एकरेषीय कल्पनेमुळे पर्यावरण, आजचं जनजीवन आणि तरुणाईचं भविष्य धोक्यात आलं आहे. बिना-रोजगार आर्थिक वाढीच्या विकास-कल्पनेतून जगाच्या वेगवेगळ्या कोपऱ्यांत तरुणांचे जथे हतबल आणि असुरक्षित होत आहेत. स्त्रियांना, अल्पसंख्य लैंगिक ओळख असणाऱ्यांना आणि विविध धार्मिक-सामाजिक अल्पसंख्याकांना मोठ्या हिंसेला तोंड द्यावं लागत आहे. जवळपास प्रत्येक देशाचे आता ते 'दुय्यम नागरिक' झाले आहेत.

अशा काळात वर्तमानापासून वेगळ्या झालेल्या एका भविष्याची कल्पना करण्याची क्षमता असेल, तरच आशा जिवंत राहतात, उमेद जागी राहते. ही आशा, उमेद धगधगती ठेवणं हेच तरुणपणाचं लक्षण आहे. जगभरात ठिकठिकाणी उभी राहणारी तरुणांची आंदोलनं ही या अर्थाने खरोखर आपल्या तरुणपणाला जागत आहेत. चिनी सरकारने मांडलेल्या प्रत्यार्पण कायद्याच्या विरोधात हाँगकाँगमध्ये उत्स्फूर्तपणे तरुण रस्त्यावर उतरले. या आंदोलनाच्या विरोधातल्या पोलिसांच्या दमनामुळे लोकशाहीवादी सुधारणांची मागणी आणखी बळकट झाली आणि एक ऐतिहासिक जनआंदोलन उभं राहिलं. 'ग-मिंग' या चिनी घोषणेला हाँगकाँगमधल्या आंदोलनाने नवे अर्थ

मिळवून दिले. हाँगकाँगच्या रस्त्यांवर रात्रीच्या रोषणाईमध्ये मोठ्याने घोषणा देणारे आवाज तिथल्या आकाशावर कायमचे कोरले गेले आहेत.

दुसरं चित्र आहे सुदानच्या खार्तूममधलं. सूर्य मावळल्यावर करड्या होत जाणाऱ्या खार्तूमच्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर महिलांच्या मोठ्या गर्दीच्या मधोमध एका कारच्या पांढऱ्या टपावर उभी राहून बावीस वर्षांची आला सलाह 'थावरा! थावरा!' म्हणत मूठ उंचावतेय आणि शेकडो मोबाइल्स उंचावून त्यांच्या उजेडात या महिलाही तिला साथ देत आहेत, 'थावरा! थावरा! थावरा!'... 'थावरा' या अरेबिक शब्दाचा अर्थ आहे क्रांती. सुदानी महिलांच्या पारंपरिक 'टूब' या कपड्याला आलाने नवे अर्थ मिळवून दिले आहेत. लांब पांढऱ्या टूबमध्ये ताठपणे घोषणा देणाऱ्या आलाला पाहून सुदानच्या नुबियन साम्राज्यातल्या सम्राज्ञींचीच आठवण येते, असं तिथल्या बायका कौतुकाने सांगतात. लोकशाही आणि सार्वजनिक स्वातंत्र्यासाठी चाललेल्या या सुदानच्या आंदोलनाला महिलांचं नेतृत्व आहे आणि त्या गर्दीत कारच्या टपावर चढून घोषणा देणाऱ्या तरुण मुली लक्ष वेधून घेतात.

'बंदुकीच्या गोळीने नाही, लोकांच्या मूकपणाने जीव जातो आहे...' आला सलाह त्यांच्या आंदोलनातली लोकप्रिय कविता पुन्हा म्हणून दाखवते, तेव्हा ती लोकशाहीविरोधी दहशतीमध्ये जगणाऱ्या जगातल्या प्रत्येकाच्या काळजाला हात घालते.

हाँगकाँग आणि सुदानप्रमाणेच युरोपातले रस्तेही जोरकस घोषणांनी दुमदुमत आहेत. मात्र हे समूह मोठ्या माणसांचे नाहीत, तर चक्क शाळकरी मुलांचे आहेत. दर शुक्रवारी शाळेत जाण्याऐवजी मुलं दिवसभर पर्यावरण वाचवण्यासाठी आंदोलनं करत आहेत. जेमतेम सोळा वर्षांची ग्रेटा थनबर्ग ही या आंदोलनाचा चेहरा आहे. 'आमचं भविष्य धुराने काळवंडू देऊ नका' असं आवाहन करत ही मुलं थेट संयुक्त राष्ट्रसंघापर्यंत पोचली आहेत. आम्ही आता मोठ्यांसाठी वाट पाहणार नाही, आपली पृथ्वी वाचवण्यासाठी आम्हीच रस्त्यावर उतरत आहोत, असं म्हणून ही मुलं मोठ्यांना जागं करू पाहत आहेत. मुंबईतही मोठ्या प्रमाणात तरुणाई आरेचं जंगल वाचवण्यासाठी रस्त्यावर उतरली. झाडांना मिठ्या मारत व्यवस्थेसमोर उभी राहिली.

गेल्या पाच वर्षांत आपल्याही देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी आंदोलनं होत आहेत. एफटीटीआयआय, हैदराबाद केंद्रीय विद्यालय आणि जवाहरलाल नेहरू विद्यापीठापासून सुरू झालेली ही आंदोलनं अगदी अलिगढ मुस्लीम विद्यापीठापासून आसाम विमेन्स कॉलेजपर्यंत पोहोचली आहेत. शैक्षणिक स्वातंत्र्य, चांगल्या प्रतीचं शिक्षण, शिक्षण संस्थांमधला सामाजिक न्याय अशा विविध विषयांवर ही आंदोलनं झाली. बनारस हिंदू विद्यापीठातल्या विद्यार्थिनी आणि जामिया मिलियामधल्या विद्यार्थिनी त्यांच्या स्वातंत्र्याच्या समान हक्कासाठी पहिल्यांदाच प्रशासनासमोर उभ्या राहिल्या. 'राजकारणात पडलेल्या' या तरुण मुलामुलींना बदनाम करण्याचे पुन:पुन्हा प्रयत्न झाले. मात्र तरीही ते एकत्रितपणे आपला आवाज उंचावत राहिले. जिओच्या डेटावर निर्जीवपणे 'टिकटॉक' व्हिडीओ करणाऱ्या तरुणांवर टीका करताना आपल्याच देशात उभ्या राहू पाहणाऱ्या या सशक्त तरुण आवाजांकडे आपलं अनेकदा दुर्लक्ष होतं. मात्र इतिहासाच्या पटलावर हे आवाज स्पष्ट कोरले गेले आहेत. ते आज वेगवेगळे आणि विखंडित वाटत असले तरी एकमेकांना जोडून घेण्याच्या त्यांच्यामधल्या शक्यता सुरुवातीपासूनच ते अजमावत आहेत.

आम्ही कोण आहोत?

महासत्तेच्या उंबरठ्यावर उभे राहिलेले नशीबवान शिलेदार की बेकार, आत्मकेंद्री, मागे राहिलेले?

एकवाक्यतेच्या प्रस्थापित मठांना तोडून बहुविधतेच्या आणि सर्जनाच्या सकस शक्यता घेऊन आलेले कलाकार आहोत की जागतिक बाजारात स्वत:च्या लिलावासाठी एका रांगेत उभे असलेले एकसारखे मजूर?

आमच्या पोतडीत आपल्या मातीतून उगवलेल्या खुलेपणाच्या आणि लवचीकतेच्या शक्यतांचे धुमारे आहेत की द्वेष आणि दशहतीचा जीवघेणा दारूगोळा?

आम्ही हिंसेचे बळी की हिंसेचे वाहक?

आम्हाला अजून लक्षात येत नाही. कुंपणापलीकडून सुरक्षित अंतरावरून पाहणाऱ्यांनाही अजून नीटसं दिसत नाहीए. अखंड न्यूनगंड आणि अधेमधे येणारे पोकळ अहंगंडाचे वारे, यातून स्वत:ला आमच्या समवयस्कांसोबत पाहायचीही आमची हिंमत होत नाही. आम्हाला या काळापासून, या पिढीपासूनही मुक्ती हवी आहे...

पण जाणार कुठे?

'काल'चे दरवाजे बंद झाले आहेत आणि उद्याचा दिवस अंधारात आहे. तेव्हा आता आहे त्या गर्दीतच ट्रॅफिकच्या डोक्यावर चढून 'ग-मिंग! थावरा! इन्किलाब!' गात गात बाहेर पडायचा रस्ता मिळेल तेव्हाच स्वत:ला आणि आजूबाजूच्या सगळ्या गर्दीलाही वाचवता येईल.

**(राही श्रुती गणेश हिने जेएनयू विद्यापीठातून समाजशास्त्र या विषयात पदव्युत्तर शिक्षण घेतले असून ती विद्यार्थी आंदोलनात सक्रिय असते.)**

**('वसा' दिवाळी २०१९ वरून साभार...)**

❖❖❖



# बातचीत विद्याताईशी...

■ अंजली मुळे, आशा साठे

विद्याताई बाळ स्त्री मुक्ती चळवळीतील एक आघाडीच्या कार्यकर्त्या, ''मिळून साऱ्याजणी'' या मासिकाच्या संस्थापक संपादक या नात्याने महाराष्ट्रातील स्त्री पुरुषांना परिचित त्याचे नुकतेच दु:ख निधन झाले. अन्नपूर्णा परिवारातर्फे विद्याईंना भावपूर्ण आदरांजली.

त्याच्या कार्याची माहिती देणारी अंजली मुळे आणि आशा साठे यांनी ऑगस्ट २०१३ मध्ये घेतलेल्या प्रदीर्घ मुलाखतीचा हा संक्षिप्त अंश आम्ही अन्नपूर्णा परिवाराच्या सभासदासाठी पुन्हा प्रकाशित करीत आहोत.

– संपादक

- **स्त्रीमुक्ती म्हणजे नेमकं काय?**
- **स्त्रियांना कोणत्या बंधनातून मुक्त व्हायचं आहे?**
- **कशासाठी?**
- **त्यांना कोण मुक्त करणार आहे?**
- **स्त्री मुक्त झाली तर काय फरक पडणार आहे?**

यांविषयी तुम्ही थोडं सविस्तर स्पष्ट करावं असं वाटतं.

स्त्रीमुक्तीच्या संदर्भात खूप गैरसमज आहेत. त्यामुळे मला समजली तशी एक छोटीशी व्याख्या करायला मला आवडेल. स्त्रीमुक्ती कशासाठी? तर प्रथमत: बाईच्या विकासासाठी. बाईच्या वाट्याला पुरुषसत्तेमध्ये सदैव जी दुय्यमता आली आहे, ती ओलांडून जाण्यासाठी.

स्त्रीमुक्तीचा नेमका अर्थ काय? या दुय्यमपणाच्या व्यवस्थेमध्ये स्त्रीला आपल्याजवळ काय आहे, कोणत्या प्रकारचं सामर्थ्य आहे, काय कमी आहे, या सगळ्याचा काही शोध घेण्याची संधी सहसा नसते. ती ज्या तऱ्हेनं वाढवली जाते, त्यामध्येही स्त्री-प्रतिमेचा एक परंपरागत साचा तिच्यावर थोपला जातो. मला असं वाटतं, की पहिल्यांदा आपल्या जवळ असणाया गुणावगुणांचा शोध घेण्याची संधी हीच स्त्रीमुक्तीची पहिली पायरी. शोध घेता आला, की त्यानंतर त्याचा पाठपुरावा करता आला पाहिजे. कुणाला गाणं आवडतं, कुणाला खूप वाचायला आवडतं, आणखी काही आवडतं - तर जी 'माझी' आवड आहे, ती जोपासण्याची संधी मिळाली पाहिजे. प्रत्येक वेळी त्यातून काय मिळणार, याचा विचार करण्याबरोबरच तो आपल्या आनंदाचा भाग आहे याचं भान हवं. काही क्षेत्रात संशोधन करणं, काही कामगिरी करणं, काहीतरी मिळवणं हे उद्दिष्ट असू शकतं. अशी शोधायची आणि पाठपुराव्याची, त्यात काहीतरी मिळवण्याची, सिद्ध करण्याची संधी मिळाली की, मी मुक्त होते का? मला असं वाटतं की, हे तिथे थांबत नाही. अशी संधी ज्यांना मिळालेली नाहीये, त्यांच्याकडे बघण्याची एक समज माझ्यामध्ये जेव्हा येईल, तेव्हा खरा माझा मुक्तीचा प्रवास सुरू होतो. या प्रवासातच जे जे मला मिळतंय ते ज्यांना मिळत नाही, त्यांच्याकडे माझं लक्ष असणं, त्यांच्यासाठी मला काय करणं शक्य आहे ते करणं, याला मी स्त्रीमुक्तीची प्रक्रिया मानते.

यावर लोक असंही म्हणतात की, कशासाठी हे सगळं? काय जरूर आहे? आत्तापर्यंत चाललंच ना सर्व काही छान! काहीतरी खुळं काढता झालं! इथे मला अल्वा मिर्दाल आणि व्हायोला क्लेन यांचं म्हणणं आठवतं. मलाही खूप उशिराच्या टप्प्यावर ते कळलं. पण ते महत्त्वाचं आहे. अल्वा मिर्दाल आणि व्हायोला क्लेन या नोबेल पारितोषिक विजेत्या समाजशास्त्रज्ञ आहेत. त्यांनी म्हटलंय की, कोणत्याही देशाची संपत्ती मोजताना आपण काय काय पाहतो? त्या देशाला सूर्यप्रकाश किती मिळतो? पाणी किती? जंगल किती? किनारा किती आणि कसा आहे? खनिजं किती वगैरे वगैरे. या नैसर्गिक स्त्रोतांमध्ये लोकसंख्याही महत्त्वाची आणि त्यात अर्धी लोकसंख्या जी स्त्रियांची, तोही एक महत्त्वाचा मानवी स्त्रोत आहे, हे आपण विसरतो. या मानवी स्त्रोताचा उपयोग करून पुढे गेल्याशिवाय

खऱ्या अर्थानं देशाचा विकासच होणार नाही. त्यांचं हे विधान मला महत्त्वाचं वाटतं, आवडतं. कारण आज विकासाच्या नव्या संकल्पनांमध्ये माणुसकीचा आणि माणसाच्या सर्वांगीण समृद्धीचा जो विचार डावलला जातो, त्याच्यावर त्यांनी नेमकं बोट ठेवलंय. स्त्रीमुक्तीचा मला तर लाभ होणार आहेच, पण माझं कुटुंब, माझा परिसर, माझा देश यांनाही लाभ होणार आहे. त्यासाठी स्त्रीमुक्ती हवी. अशा मुक्त होण्यात स्त्रीचा व्यक्तिगत स्वार्थ आहेच, पण तो इतर कोणाला डावलून नसल्यानं 'स्वार्थ' शब्दाला जो वाईटपणा चिकटलाय तो त्यात नाहीये. मला जे हवंय, मिळवायचंय त्यासाठीची ही धडपड आहे.

आता 'स्त्रीमुक्ती' यातील मुक्ती शब्दालाही काही लोकांचा विरोध आहे. या शब्दाला विरोध म्हणून काही पर्यायी शब्द शोधले गेले आहेत. 'स्त्रीशक्ती जागरण' वगैरे. पण 'शक्ती' हा शब्द देवकल्पनेकडे जाणारा वाटतो. आपलं 'सामर्थ्य' वाढवणं (empowerment) हे खरं यात अभिप्रेत आहे. वुमन एम्पॉवरमेंटलासुद्धा स्त्रीसबलीकरण शब्द वापरला जातो, तो मला खटकतो. तिथेही स्त्री सामर्थ्यशील होणं अभिप्रेत हवं असं वाटतं. सामर्थ्य हे Power किंवा सत्तेपेक्षा वेगळं आहे, असं मी मानते.

मुक्ती कोणापासून? तर बाईच्या परंपरेने घडवलेल्या प्रतिमेपासून. पारंपरिक प्रतिमा काय सांगते? बाई कशी असली पाहिजे? तर मी सोशिक असलं पाहिजे, मी वत्सल असलं पाहिजे, स्वार्थत्यागी असलं पाहिजे, मी निमूटपणे सर्व काही ऐकणारी असलं पाहिजे, पतीला परमेश्वर मानणारी, काय अन् काय! आपणही ह्या प्रतिमेचे बळी असतो. या प्रतिमेतून मुक्ती म्हणजे स्वत:पासूनच खरं तर सुरुवात असते. मी या पारंपरिक प्रतिमेतच बसणारं माणूस असायचं काही कारण नाही असं वाटायला लागणं, ही विकासाचीच सुरुवात असते. ह्या प्रतिमेत सतत पुरुषाला प्रधान आणि स्वत:ला दुय्यमपण स्वीकारून चालणं असतं.

'ही प्रतिमा नाकारण्याची गरजच काय? बरं चाललंय की सगळं!' विशेषत: माझ्या मागच्या पिढीतले लोक म्हणत, 'आमचे संसार काय वाईट झाले का?' म्हणजे मला आठवतंय माझ्या आई-वडलांचेही वाद व्हायचे. जाणतं झाल्यावर आम्हा भावंडांच्या लक्षात येत होतं की, वडलांपेक्षाही काही बाबतीत आई हुशार होती, तरी वडील तिच्यावर वर्चस्व गाजवत, अधिकार गाजवत. माझे वडील काही फार शिकलेले नव्हते. स्वातंत्र्य चळवळीत त्यांनी शिक्षण सोडलं. मग कमी शिक्षण म्हणून आयुष्यभर कारकुनी नोकरी करावी लागली. सगळा काटकसरीचा संसार करावा लागला. मग कुरबुरी, भांडणं होत. मी आईला म्हटलं की, 'तू एवढी हुशार, शहाणी होतीस! तुला जर संधी दिली असती विकासाची तर तूही काही केलं असतंस. संसार अधिक सुखासमाधानाचा, चांगला झाला असता. तुमच्याकडे बघताना आम्हाला जे खटकलं, ती पार्श्वभूमी माझ्या पुढच्या कामाच्या वाटचालीला, विचाराला आहेच.'

जुन्या पिढीतल्या बायकांना वाटलं की, आमचे नाही का झाले संसार? तर संसार झाले. घटस्फोट घेतले नाही की, संसार होतातच. पण संसार आनंददायक असणं, एकमेकांना तो वाढवणारा असणं, संधी देणारा असणं, मुलांसाठी चांगलं वातावरण असणं, कुणावर अन्याय न करणारा असणं - एकमेकांचा आत्मसन्मान जपणारा असणं. या सगळ्या अर्थींनी जुन्या काळातले किती संसार हे खरे संसार झाले? इथे स्त्रीमुक्तीच्या विचारांची गरज आहे. त्यामुळे बायका शहाण्या झाल्या असत्या, त्यांना आत्मसन्मानाची जाणीव झाली असती आणि संसार चांगले झाले असते. भांडणं झाली असती, तरी ती नेहमीच पराकोटीला गेली असती असं नाही. पुरुषांना आपल्या मनातल्या किंवा इतर अनेक गोष्टी कळत नसतील, तर आपण बोलायला तर हवं. बोलल्यावर त्यांना पटलं नाही, वाद झाले, तरी संवादातून वाद मिटूही शकतात. पण स्त्री-पुरुषांमध्ये संवाद तर सुरू व्हायला हवा! माझ्या भावा-वहिनीचंच उदाहरण आहे. माझी वहिनी निगुतीनं उत्तम स्वयंपाक करणारी आहे. शाळेची नोकरी करत छान संसार सांभाळणारी. वाढत्या वयात नोकरी सोडली तेव्हा तिनं भावाला सांगितलं, 'आता मी नोकरी सोडलीय, पण स्वयंपाकपाणी करायचाही मला फार कंटाळा आलाय.' त्या दोघांमध्ये फार चांगलं अंडरस्टँडिंग आहे. नाहीतर ती हे बोलली नसती. शिवाय चला, आता ही मोकळी आहे, कुणाकुणाला जेवायला वगैरे सहज बोलवा असं झालं असतं. आता मी त्यांच्याकडे जाणार म्हणून फोन केला तरी भाऊ म्हणतो, 'थांब, तिलाही विचारतो, तिची काही अडचण, दुसरा कार्यक्रम नाही ना?' हा समजुतदारपणा माझी वहिनी बोलल्यामुळे पुढे आला. हे असं एकमेकांत शेअर करत राहणं, ही सुद्धा रूढ स्त्रीप्रतिमेच्या बाहेरचीच वाट आहे. नाही तर जे काय चाललंय त्यात निमूट सहभागी होणं, स्वत: कुचंबत राहणं हाच अर्थ पतिव्रतेचा आदर्श मानलेला. स्त्रीमुक्तीच्या विचारामध्ये बोलणं, परस्पर संवाद हेही महत्त्वाचं आहे.

पुरुषप्रधान व्यवस्थेत पुरुषावरही एक प्रतिमा थोपली आहे. त्यामुळे त्याच्यावरही अन्याय होत असतो. स्त्री आणि पुरुषांना आपापल्या काही भूमिका दिल्यात आणि त्यापेक्षा काही वेगळं वागण्याला नावं ठेवली जातात. बायकांना त्या पुरुषी होत चालल्या आहेत म्हणून नावं ठेवली जातात. तसंच नोकरी न करता मी घर सांभाळीन, मुलं सांभाळीन असं मनापासून एखाद्या पुरुषाने ठरवलं तर त्यालाही नावं ठेवली जातात. बायकोला चहा करून देणाऱ्या पुरुषालाही नावं ठेवली जातात. पु.लं.च्याच एका लेखनात असा संवाद आहे ना की, त्या घरातल्या बाईकडे कुणी मैत्रिणी आल्या आणि नवऱ्याने चहा करून आणून दिला तर तो नवरा आहे हे न समजून 'किती छान गडी मिळालाय!' असं कुणीतरी म्हणतं. मला वाटतं की मग घरातल्या नेहमी चहापाणी करून देणाऱ्या बायका काय मोलकरणी असतात का? आणि मुख्य असं की, पुरुषालाही याची जाणीव होत नाही, बाईलाही नाही.

आपापल्या आवडीनुसार काही करता येण्याची संधी स्त्री-पुरुष

दोघांनाही हवी. अर्थात आपल्याला काय हवं ते कळणं महत्त्वाचं. स्त्रिया आणि पुरुष यांच्या सहजीवनासाठी, मग ते नवरा-बायको असोत का बहीण-भाऊ असोत किंवा मित्र मैत्रिणी असोत, दोघांना एका समान पातळीवरचा दर्जा असणं ही खूप आवश्यक गोष्ट मला वाटते. स्त्री-पुरुष समतेच्या चळवळीमध्ये ही गोष्ट महत्त्वाची मानलेली आहे. मूलभूत माणूसपणाची आठवण हे खरं समतेचं द्योतक.

आता लोकं नेहमीच असं बोलतात की स्त्री आणि पुरुष यात निसर्गानेच विषमता ठेवलेली आहे. स्त्री आणि पुरुष निसर्गत: वेगळे नाहीत का? हे वेगळेपण म्हणजे काय? तर शारीरिक पातळीवरचं. काहींच्या मते मेंदूतही काही वेगळेपण आहे. पण वेगळेपण याचा अर्थ विषमता नाही. We are different but equal. वेगळेपण म्हणजे श्रेष्ठ-कनिष्ठपण नाही. जीवशास्त्रीय शरीरधर्म वेगळे. त्याबाबत शकुंतलाबाई परांजपे यांनी म्हटलं होतं की, खरं म्हणजे स्त्री-पुरुष बरोबरीचा विचार केला तर पुरुष काही कधी बाळ जन्माला घालू शकणार नाही. ही शक्ती फक्त बाईजवळ आहे, तर हा स्त्रीच्या श्रेष्ठतेच्या दृष्टीने जमेचा मुद्दा आहे. पण हा मुद्दा पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेत त्याची मूल्यात्मक बाजू बदलली की, योनीशुचिता, बलात्कारातून गरोदरपण येणं वगैरे प्रश्न उभे करतो. आता बलात्कार तर पुरुषच करतो, पण त्याच्या लिंगशुचितेचा सवाल कधीही ह्या व्यवस्थेने उभा नाही केला. का? तर तो कुठे गरोदर राहणार असतो? खरं म्हणजे ही वेगळी आधिक्याची आणि विधायक शक्ती बाईकडे आहे. आणि एका संकल्पनेतून तीच कोंडीत धरून बाईला अबला म्हटलंय. जीवशास्त्रीयदृष्ट्या जी नवमानव निर्माण करू शकते, ती कोणत्या तर्काने अबला ठरवली? नवमानव निर्मितीचं सामर्थ्य हे जसं स्त्री-पुरुषांतलं वेगळेपण आहे, तसं आणखीही एक गोष्ट संशोधनानं पुढे आलीय. मुलीचा गर्भ हा मुलाच्या गर्भापेक्षा जास्त सक्षम आहे. संतती नियमन वगैरे कोणताही कृत्रिम हस्तक्षेप नसेल तर १०० मुली जन्माला येतात तेव्हा १०६ किंवा १०७ मुलगे जन्माला येतात. ही निसर्गाचीच समतोल राखण्याची योजना आहे. आयुष्याच्या लढाईत मुलीचा गर्भ मुलापेक्षा अधिक तग धरणारा, चिवट. त्यामुळे काही मुलग्यांच्या गर्भांना जगण्यात यश आलं नाही, तरी स्त्री-पुरुष संख्येचा समतोल राखला जातो आणि आपण मात्र अशी तर्कटं रचली की बाई 'अबला!' बाईला असं सगळं जीवशास्त्रीय ज्ञान प्राप्त होणं, हेही तिचं एक प्रकारे मुक्त होणंच.

स्त्रीला पाळी येणं हा तिचा शरीरधर्म आहे. प्रथमच पाळी सुरू होते, तेव्हा एक परंपरा तिला मखरात बसवण्याची होती. तिच्या वाढीचा तो उत्सव मानत. तिच्या पूर्ण स्त्री होण्याची जाणीव करून देण्याची कल्पना त्यात असावी. पण पुढे मात्र पाळी आली की, तिला बाजूला बसण्याची सक्ती सुरू झाली. त्या काळात तिला अपवित्र समजू लागले. अशा वेळी जीवशास्त्रीय ज्ञान मिळणं हेच मुक्त होणं. मग तिचं तिलाही कळतं की, देवी म्हणून मखरात बसवणं नको. माणूस आहोत आम्ही, माणूस म्हणून आम्हाला जगता आलं पाहिजे. आपल्या महान संस्कृतीचे गोडवे गाणाऱ्या परंपरेत शंभर वर्षांपूर्वीच्या शिरगणतीतील माहिती हेच सांगते की, तेव्हाही १९०१ मध्ये १००० पुरुषांमागे, ९७१ इतकंच स्त्रियांचं प्रमाण होतं. विकसित देशात दर हजार पुरुषांमागे स्त्रियांची संख्या हजाराहून अधिक असते. आम्ही स्त्रीला देवी मानतो, तिची पूजा करतो तर हे प्रमाण कमी का? तुम्ही तर नेहमीच स्त्रीला गाडून टाकण्याच्या प्रवासावर निघालेले होतात. कायम स्त्रीची उपेक्षा, दुर्लक्ष, जन्मत:च मारून टाकणं ही वृत्ती कायम जोपासलेली होती. आता तर भारताच्या काही भागात १००० पुरुषांमागे स्त्रियांचं प्रमाण ८००पर्यंत खाली आलेलं आहे. तर कसले आपल्या संस्कृतीच्या मांगल्याचे आणि गौरवाचे गोडवे गाणार?

स्त्री-पुरुष समतेचा विचार हा पाश्चात्त्यांकडून आयात केलेला विचार आहे, अशी काही जण टीका करतात. त्यातला एक भाग असा आहे की, इंग्रजी भाषेबरोबर ज्ञान आलं. उदारमतवादी विचारसरणीचा प्रभाव समाजसुधारकांवर होता. तो त्यांनी कृतीत आणला. आपण ह्याबाबतीत 'करू पहिलं नमन जोतीबाला' असं म्हणतो त्याला कारण आहे. त्यांचं साहित्य वाचायला लागलो, त्यांनी लग्नाचे वेळी घ्यायची जी शपथ लिहिली ती बघितली तर लक्षात येतं की, ते सर्व ठिकाणी स्त्री-पुरुष हे शब्द जाणीवपूर्वक वापरतात. त्यांनी मुलींच्या शिक्षणासाठी १८४८ साली शाळा काढली. आपल्या पत्नीला बरोबरीनं आपल्या कामात सहभागी करून घेतलं, स्त्री-पुरुष समता कृतीत उतरवण्याचा त्यांचा जाणीवपूर्वक प्रयत्न राहिला. १९७५ साली आंतरराष्ट्रीय स्त्रीवर्ष जाहीर झाल्यावर जागतिक पातळीवर या विचारांना मान्यता मिळून अनेक दिशांनी उपक्रमांना जोर आला हे खरंय. पण आपल्याकडेही ही संकल्पना जवळपास १५० वर्षांपासून होती. ताराबाई शिंदे यांचं लिखाण आपल्यापुढे आहेच.''

**विद्याताई, 'करू पहिलं नमन जोतीबाला' असं म्हटलं तरी स्त्रीमुक्तीच्या संदर्भात अनेक पाश्चात्त्य विचारवंतांची मतं, पुस्तकं, पाश्चात्त्य देशातील चळवळींची उदाहरणं यांचा उल्लेख स्त्रीमुक्तिवाल्यांच्या चर्चेत अनेक वेळा येतो. त्याला काय म्हणायचं! पाश्चात्त्य विचारांचं हेतुपरस्सर भारतीयीकरण केलं गेलं? तुमचा काय दृष्टिकोन होता?**

मला सारखं असं वाटतंय की, जगभरातले पुरुषसत्ताकतेचे मुद्दे खरं म्हणजे सारखेच आहेत. त्या त्या परिस्थितीमध्ये लोकांनी त्याचे तपशील बदललेले असतील. इंग्रजी शिक्षणामुळे इंग्रजी पुस्तकांच्या वाचनाने जॉन स्टुअर्ट मिल किंवा थॉमस पेन यांच्या विचारांचं अभिसरण झालं हे खरंच.

माझ्या वाचनात जी पुस्तकं आली ती मला इथल्या परिस्थितीतही अधिक काही स्पष्ट करणारी वाटली. औद्योगिकीकरण तिकडे आधीच आलं. त्यामुळे तिथे निर्माण झालेल्या स्त्री-प्रश्नांवर ती पुस्तकं काही म्हणत होती. उदाहरणार्थ, स्त्रियांच्या नोकऱ्या कशा हव्यात? अर्धवेळ असाव्यात का? त्याचा परिणाम म्हणून स्त्रियांना पैसे कमी मिळणार, सेवा ज्येष्ठत्वामध्ये स्थान खालचं, पॅटर्निटी

लीव्हचा मुद्दा हे प्रश्न त्या पुस्तकातून चर्चिले गेले होते. त्यामुळे इथे जेव्हा हे प्रश्न निर्माण झाले तेव्हा त्यांच्या चर्चेत ते आधार म्हणून मांडले गेले. ह्याचा अर्थ हे पाश्चात्त्यांकडून आलेलं खूळ म्हणायचं काय कारण?

'फेमिनाईन मिस्टिक' पुस्तकात प्रामुख्याने मध्यमवर्गीय स्त्रियांचाच विचार मांडलेला होता. दुसऱ्या महायुद्धानंतर 'कुटुंब' ही अत्यंत हळवी, नाजूक भावना व्यक्त करण्याची बाब बनत होती. मग पुन्हा मुली चांगला नवरा मिळवणं यासाठी शिक्षण घेत. नवरा मिळाला की संसारात गुरफटून जायचं. बेटी फ्रीडनने म्हटलंय की, त्यांना सबर्बिया नावाचा रोग व्हायचा. म्हणजे सबर्बमध्ये एक घर असावं, दारात फोक्सवॅगन गाडी उभी असावी, गाडी भरून जाईल इतकी मुलं व्हावीत अशी एक रिॲक्शन उमटली होती. हेच स्वप्न. मग मुलं मोठ्ठी होईपर्यंत आई व्यस्त. ती मोठी होऊन आईचा पदर सोडून दूर गेली की बाईच्या आयुष्यात पोकळी. आणि हाच साधारण मेनॉपॉझचा काळ तेव्हा ही आयुष्यातली पोकळी कशी भरायची? स्वत:साठी काही विचार करायचाच सोडून दिलेला. छंद, आवडी सगळं गुंडाळून आतापर्यंतचं आयुष्य जगलेलं. स्वत:ला ओळखणं, स्वत:चं स्वत्व जपणं, स्वत:साठी काही वेळ ठेवणं याचं महत्त्व सांगताना मलाही अशा पुस्तकांचा खूप चांगला उपयोग करता आला.

हे बायकांना सांगत असू तेव्हा एकदा माझे वडीलही मला म्हणाले होते, 'तू कशाला त्यांच्या सुखात बिब्बा घालतेस? तू काही पर्याय देते आहेस का?' पण मला वाटायचं, जे मला कळलंय ते सगळ्यांना कळलं पाहिजे. सगळ्यांचं सगळं करून चांगुलपणाचं, सगळ्यांना प्रिय होण्याच्या धडपडीचं गाठोडं जमवून काय साध्य होतं? त्या काळात मी एक गोष्ट लिहिली होती. त्यात मी लिहिलं होतं की, मी मेल्यावर माझ्या अंगावर काही फुलंबिलं उधळू नका. कारण मी लोकांना खूप खूष केलंय, पण मी स्वत:वर खूप नाखूष आहे, आणि अशा अवस्थेत मी मरतीये वगैरे... मी गोष्टी लिहायची केव्हाच थांबलीय, तरीपण अबोध पातळीवर केव्हाच लक्षात आलं होतं की, आपण आपल्या संसारात अनेक गोष्टी आवडत नसताना करतो आहोत. आता काही पाश्चात्त्य पुस्तकांतून जे विचार येत होते, ते इथल्या परिस्थितीशी सुसंगत ठरत होते, तेव्हा त्यांचा आधार मीही चर्चेत, भाषणात, लिखाणात नक्की घेतला आहे. पाश्चात्त्य विचारांचं भारतीयीकरण मी केलं असं मला नाही वाटलं. पण तपशील बदलले तरी मूळ विचार आणि तत्त्व तेच असेल, स्त्रियांची मागणी तीच असेल, तेव्हा त्या पुस्तकांचे दाखले जरूर दिले. त्यामुळे अन्याय जास्त ठळकपणे मांडता आला, मांडणी करणं सोपं झालं. 'स्त्रिया शिकल्या तर आगाऊ होतील', 'घरकाम करणार नाहीत' अशी विधानं व्हायची. 'स्त्री शिकली की बिघडते आणि पुरुष शिकले तर शहाणे होतात.' अशा विधानांचा मला त्रास व्हायचा; होतो. फुले, आगरकर, लोकहितवादी, म.कर्वे आणि आंबेडकरसुद्धा स्त्रियांसंबंधी विचार करत होते. त्यांना समजलेला अर्थ खरं म्हणजे सगळ्या शिकलेल्या पुरुषांना समजला नाही हे दुर्दैव आहे.''

**विद्याताई, विचारांचं अभिसरण ही हळूहळू घडणारी प्रक्रिया आहे. सुरुवातीला अतिरेकी वाटणाऱ्या भूमिका हळूहळू स्वीकारल्या जातातही. इथं बाईनं घराबाहेर पडणं हे अजून स्वीकारलं जात नव्हतं तेव्हा पाश्चात्त्य देशात 'ब्रा बर्निंग'ची चळवळ उभी राहिली. याकडे तुम्ही कसं पाहता?**

'माझ्यामध्ये झालेला या बाबतीतला फरक प्रामाणिकपणे नोंदवला पाहिजे. 'ब्रा बर्निंग'च्या चळवळीचे उद्रेक इथे लोकांना दिसत होते. त्यावेळी आम्ही घेतलेली भूमिका मला आठवते आहे. त्यातला जो अतिरेकी स्त्री-मुक्तिवाद आहे त्यातले आम्ही नाही आहोत. आम्हाला नाही याची गरज असं वाटलं होतं. नंतर माझ्या असं लक्षात आलं की, 'ब्रा बर्निंग'मध्ये एक महत्त्वाचा संदेश होता. तो असा होता की आम्ही चांगलं दिसावं, आमचं शरीर बांधेसूदच असावं, ते पुरुषाच्या नजरेला सुखावणारंच असावं यासाठी या सगळ्या गोष्टी आल्या असतील तर त्या आम्ही नाकारू. त्यातून आलेलाच विचार असा की, मला जसा देह मिळाला आहे त्याच्यावर माझं प्रेम आहे आणि मी त्याच्यावरच प्रेम करत जगणार आहे. मग कोणी काळं असेल, बुटकं असेल, कोणी लठ्ठ असेल, छाती लहान-मोठ्ठी असेल या सगळ्यांनी काही फरक पडत नाही. 'ब्रा बर्निंग'च्या चळवळीमागे जर हे सूत्र असेल तर ते बरोबर आहे हे पटलं. मग आम्ही म्हटलं की इथे कदाचित आम्ही 'ब्रा बर्निंग' करणार नाही. पण त्या विचाराला आमचा पाठिंबा आहे. तशाच विचाराच्या सूत्राने विश्वसुंदरी वगैरे सौंदर्य स्पर्धांना आमचा विरोध आहे.

**आता सुरुवातीच्या मुद्‌यांकडे परत यायचं तर कशासाठी मुक्त व्हायचं? तर स्वत:साठी, कुटुंबासाठी, देशासाठी, सर्वांसाठी, मानवतेच्या भल्यासाठी हे तर आहेच. आणखी एक मुद्दा वारंवार मांडला जातो, कोण मुक्त करणार आहे? कोण स्वातंत्र्य देणार आहे स्त्रियांना?**

स्वातंत्र्य कोणी देत नसतं. आपणच ते मिळवायचं असतं. सिद्ध करायचं असतं. सुरुवातीच्या काळात पुरुषापासून मुक्ती असाही काहींचा समज होता. तर पुरुष उदारमतवादी असला तर हा मुद्दाच येणार नाही असाही बायकांचा समज होता. सामान्यत: संवाद असे ऐकायला येत की, मला अगदी पूर्ण स्वातंत्र्य आहे घरामध्ये आणि मी काहीही करायला किंवा कुठेही जायला निघाले तरी मला ह्यांची 'परवानगी' असते अगदी. म्हणजे हिलाच 'परवानगी' शब्द वापरताना 'मुक्त असणं' ह्याचा अर्थ लक्षात येत नाहीये. आज तर स्त्रिया स्वत:ही मिळवताहेत. पण खऱ्या कसोटीच्या क्षणी तुम्ही मुक्त आहात की नाही ह्याचा कस लागतो. दोघेही मिळवत असताना, मला असं म्हणायचं नाही की एकमेकांत विचारविनियम करू नये. पण कसोटीच्या वेळी आपल्या मनाला पटलंय ते ठामपणे करण्याची आत्मनिर्भरता आलीय का हा मुख्य मुद्दा आहे. पारंपरिक स्त्री-प्रतिमेतून स्वत:ला मुक्त करताना स्त्री सामर्थ्यशील झाली पाहिजे. सर्व दृष्टीने मी स्वावलंबी झालं पाहिजे, माझ्यावरील नकोशा/वाईट पारंपरिक संस्कारातून मी मुक्त झालं पाहिजे, नात्यांच्या संदर्भात आत्मनिर्भर झालं पाहिजे. मी अगदीच एकांड्यासारखी निघालेय

असं नाही, मला कुणी भेटलं तर ठीकच आहे, नाहीतर मी एकटीही माझं आयुष्य उत्तम तऱ्हेनं जगू शकेन असा आत्मविश्वास जेव्हा तिच्या मनामध्ये जागेल, तेव्हा काही चांगलं होण्याची शक्यता आहे. असं आहे की आपलं ज्याच्यावर प्रेम असतं त्याच्यावर काही प्रमाणात अवलंबित्वही असतं. पण एकमेकांवर अवलंबून असण्यात नात्यातला गोड भाग असला, तरी त्याने दुबळेपणा येऊ नये. परस्परावलंबनातलं नातं छान असलं तरी त्यापलीकडे जी अवस्था आहे आत्मनिर्भरतेची, ती समजली पाहिजे. त्यासाठी प्रश्न पडणं, चर्चा करणं, विचार करणं, हे नाकारता कामा नये. प्रश्नांची भीती वाटता कामा नये. विचार करण्याचा आळस येता कामा नये. लोकांना तुच्छ लेखून, एकटेपणा मिरवावा असं नाही मला म्हणायचं. पण आपल्या विवेकाचा, तर्कसंगत विचाराचा आपल्याला कशाहीपेक्षा जास्त आधार वाटायला हवा. असलात बरोबर तर तुमच्यासह, नाहीतर तुमच्याविना ह्या अर्थाने आत्मनिर्भरता आली पाहिजे. माझ्या समोरच्या अडचणी, प्रश्न हाताळायची क्षमता मी मिळवली पाहिजे. यश येईल, न येईल. जे असेल त्याला सामोरं जाण्याची हिंमत असायला हवी माझ्यात. ह्या अर्थानं आपल्याला मुक्त करायचं आहे आपणच.

मलाही ही जाणीव खूप उशिरा झाली आयुष्यात. आजही असे खूप लोक असणार की त्यांना जाणीव झालेली नसणार. म्हणून मला वाटतं बोलत राहिलं पाहिजे. कुटुंबामध्ये, मैत्रिणींमध्ये कोणीतरी असावं, त्यांच्याकडून ही जाणीव आपल्यापर्यंत पोचावी. काही अन्याय झाला तरच ह्या पद्धतीने विचार करायला काहींची सुरुवात होते. कदाचित तोपर्यंत खूप उशीर झालेला असतो. अन्याय आज नसला झाला, तरी उद्याही होऊ शकतो. पण तुम्ही तयार पाहिजे ना! म्हणून हे विचार सर्वांपर्यंत पोहोचणं मला महत्त्वाचं वाटतं. कुणीच विचार न करता रखडत आयुष्य रेटावं, असं मला वाटत नाही.

पुन्हा स्त्रीला विचारानं उभं राहण्याची ताकद, शक्ती येईपर्यंत तिच्या विचारांचं स्वागत न होता खच्चीकरण झालं तर तिला उभारी कशी येणार? पुरुषांनी तिला स्वातंत्र्य 'द्यायचं' नाहीये तर तिचं असलेलं स्वातंत्र्य मान्य करायचं आहे. मुलांचंही स्वातंत्र्य मान्य असतं, पण बाईचं नसतं. त्यासाठीही तिची खूप शक्ती खर्ची पडते. बाईचं स्वातंत्र्य कुटुंबाने मान्य करणं हा फार महत्त्वाचा टप्पा आहे स्त्रीमुक्तीचा.

पुरुष जन्मल्यापासून 'मी' कुणीतरी आहे ही भावना घेऊन वाढतो आणि बाई आपली ओळख नेहमी इतरांच्या संदर्भात सांगते. कुणाची मुलगी, बायको, सून, आई. हरकत नाही, पण मीच कुणीतरी आहे ही ओळख का पुरेशी वाटत नाही? ही भावना मनात जागणं, ती ओळख कमावणं हे महत्त्वाचं आहे. पुरुषांमध्ये स्वातंत्र्य असो वा नसो ते स्वतंत्रपणे वागतात. स्वत:ला बाईपेक्षा जास्त कळतं असं समजतात. कुटुंबातले कर्ते मानतात स्वत:ला. कारण त्यांना तसंच वाढवलेलं असतं, पण बाईच्या बाबतीत स्वत:ची ओळख तिला कमवायची आहे. जुन्या काळात शांताबाई किर्लोस्करांनी म्हटलंय की पाटलीणबाई 'म्हणवून घेणं' सोपं आहे, पण स्वत: पाटलीणबाई होणं अवघड आहे.'' त्यासाठी आपण काहीतरी करणं जरुरीचं आहे. महत्त्वाचं आहे.

बाईने काही करायला लागणं ह्यात तिचा विकास होतोच, पण तिच्या गुणांचा देशालाही उपयोग होतो अशी उदाहरणं आहेत. इतिहास आपल्याला असं सांगतो की, पुरुष काही कारणाने राज्य चालवायला नसला, काही दुर्दैवी प्रसंग, आणीबाणी आली तर बायकांनी कारभार सांभाळला आहे. देशातही आणि कुटुंबातही. अशा आपत्कालीन प्रसंगांपेक्षा आधीपासूनच स्त्री-पुरुष समता मान्य करून प्रत्येकाला वाढीला वाव ठेवण्याने आनंद वाढणार आहे. सहजीवनातला आनंद, समतेचा अनुभव, त्यातून येणाऱ्या समृद्धीची आणि आनंदाची कल्पनाच कुणी केली नाही. इथे लोकशाही विचाराचा मुद्दा येतो. एकट्याच्या बुद्धिमत्तेपेक्षा आणि शहाणपणापेक्षा सगळ्यांच्या मताचा आदर करून पुढे जाणं हिताचं असतं. कौटुंबिक वातावरणातही लोकशाही हवी. इथे मला आगरकरांची आठवण होते. ते म्हणाले होते की, स्त्रियांना आणि पुरुषांना एकाच वेळी एकच शिक्षण द्यावं, एकाच ठिकाणी द्यावं. त्यातून स्त्रिया बाहेरही कामं करायला सक्षम झाल्या आणि तयार झाल्या, तर त्यांना ते करू द्याव आणि अशा वेळी घरातल्या पुरुषांनी त्या बायकांची लुगडी धुतली, घरातली भांडी घासली, तर काही बिघडत नाही.

दोघांच्या सहकार्याने, चांगल्या सहजीवनाचा काय परिणाम होतो याचं आपल्यापुढे जोतीबा आणि सावित्रीबाईंचं केवढं उदाहरण आहे! फुल्यांनी खूप मूलभूत विचार मांडलाय. जातीपातींच्या अंगाने, शेतकऱ्यांच्या प्रश्नाच्या अंगाने, किंबहुना धर्मालाच अनेक प्रश्न विचारले आहेत.

स्त्रियांनी नोकऱ्या केल्या आणि पुरुषांनी भाकऱ्या थापल्या म्हणजे झाली का स्त्रीमुक्ती? असं आडमुठेपणाने अजूनही काही जण विचारतात. भूमिकांची अदलाबदल हा आपला विचार नाहीये. ते दोघे एकमेकांना पूरकच आहेत. पण ते कसे पूरक, हे त्यांचं त्यांना ठरवावं लागेल. सामान्यीकरण करून नाही चालणार. तूही वाढ, मीही वाढतो. मुळात वाढणे या कल्पनेवरचा विश्वास हे स्त्रीमुक्तीचं महत्त्वाचं अंग आहे. पुरुषाला वाढण्याची संधी होतीच. बाईची इच्छा असून ती तिला मिळत नव्हती. तिची वाढ होण्यात माझं काही गैर होत नाहीये हे सुद्धा पुरुषाला कळायला पाहिजे. वाढ वेगवेगळी असेल. पण एकमेकांच्या वाढीचा आनंद व्हायला हवा. दोघेही वाढू शकतात ही मूलभूत जाणीव हवी.

**विद्याताई, स्त्रीमुक्तीच्या संदर्भात स्त्रीच्या लैंगिक स्वातंत्र्याबद्दल चर्चा झाल्या. त्याचा व्यापक अर्थ लक्षात न घेता 'मग आता काय तुम्हाला लैंगिक स्वातंत्र्यासाठी चळवळ करायची आहे का?' असा प्रश्न विचारला जाई. अजूनही विचारला जातो. त्याबाबत काय भूमिका हवी?**

लैंगिकता आपण नाकारत नाहीच. पण फक्त पुरुषव्यवस्थेने स्त्रीच्या चारित्र्याचे आणि पावित्र्याचे निकष ठरवायची गरज नाही. मुख्य मुद्दा हा आहे, की माझ्या शरीरावर माझा अधिकार आहे. त्या बाबतीत होकाराचा आणि नकाराचा मला अधिकार हवा. स्त्री-पुरुषांच्या कोणत्याही नात्यात तो अधिकार हवा.

❐

# लय भारी वाटतंय 'सुपर वुमन' म्हटलं की!

■ डॉ. कुंदा प्रमिला निळकंठ

'स्त्री ही क्षणाची पत्नी आणि अनंत काळची माता असते', किंवा 'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उद्धारी' ही दोन्ही वचने अधूनमधून आपल्या कानी पडत असतात. पण ते फुकाचे गौरवीकरण आहे हे आपल्याला चांगले कळत असतेच नाही का? एखाद्याला ज्याच्याकडून काम काढून घ्यायचे आहे त्याची वारेमाप स्तुती करून किंवा 'हरभऱ्याच्या' झाडावर चढवून कार्यभाग साधायचा असे ते आहे. गंमत म्हणजे आपल्या नकळत पुरुषसत्ताक कुटुंब पद्धतीत गेली हजारो वर्ष 'देवी', 'माता' 'दुर्गा' वगैरे वगैरे उपाध्या लावून स्त्रियांना फुकटचे राबवून घेतले जात आहे. खरं म्हणजे, आपण स्वखुशीने स्वीकारलेले वेळोवेळचे हे 'देवीपण' म्हणजे एक प्रकारचा 'सोन्याचा पिंजराच' आहे. कारण 'कुटुंबासाठी खस्ता' खाण्यात आपण स्त्रिया आनंद मानत असतो. त्यात गैर काहीच नाही. पण माणसाने स्वत:च्या आनंदासाठी केलेल्या 'अदृश्य श्रमपासून' उदाहरण घ्यायचे तर शिक्षकांनी दिलेल्या 'अमूर्त ज्ञानदाना'पासून शरीरसुखापर्यन्त आशा कित्येक गोष्टी आहेत ज्या आज खरेदी-विक्रीच्या भाषेत तोलल्या जातात. पण या बाजारपेठी दुनियेत मात्र बाईच्या सर्व प्रकारच्या 'घरेलू श्रमाची' अजिबात गणतीसुद्धा होऊ नये? हे आता आपण गंभीरपणे घ्यायला हवं.

भांडवलदारांच्या बाजारपेठेत श्रमिकांच्या श्रमाचे मूल्य ठरविताना बाईच्या श्रमाचे मूल्यच ठरविले जात नसेल तर ते आता ठरवा हे सांगण्याची वेळ आलीय. आजच्या जागतिक मार्केटमध्ये नोकरी करणाऱ्या बाईला 'सुपर वुमन' वगैरे संबोधून गौरवीकरणाच्या नवनवीन संकल्पना प्रचलित केल्या जातायत. थोडक्यात, सांगायचे, तर तिला 'सोन्याच्या पिंजऱ्यात' ठेवून आजच्या श्रमिकांच्या जागतिक बाजारपेठेतले बाईच्या श्रमाचे योग्य मूल्य ठरविण्याची टाळाटाळ केली जाते. म्हणूनच 'अनंत काळची माता', 'नवदुर्गा' वगैरे पुरस्कार म्हणजे आपल्यासाठी बनवलेले 'सोन्याच्या पिंजरे' आणि त्याच्या बाहेर येऊन उंच भरारी घेण्याची वेळ आता आलीय.

ऑक्सफॅमचा अहवाल

''जिस दिन महिला श्रम का हिसाब होगा उस दिन मानव इतिहास की सबसे बडी चोरी पकडी जाएगी!''

२१ जानेवारी २०१९ला वर्ल्ड इकोनॉमिक फोरममध्ये स्त्रियांच्या श्रमाबाबत एक अहवाल मांडला गेला त्यातील आकडेवारी डोळे पांढरे करणारी होती त्याला पुष्टी देणारे वरील आशयाचे पोस्टर होते. ऑक्सफॅमची आकडेवारी असे सांगत होती की, 'दररोज स्त्रिया कुटुंबासाठी जे विनामोबदला श्रम करतात उदा. स्वयंपाक, बालसंगोपन, घराची देखभाल वगैरे या सगळ्याचे श्रमाच्या बाजारपेठेत आर्थिक मूल्य ठरवायचे झाल्यास ते वर्षाला (१० ट्रीलियन म्हणजे) १० दशलक्ष कोटी डॉलर इतके भरते. याचा अर्थ असा की हे मूल्य जगातील सर्वात मोठी कॉम्प्युटर आयटी कंपनी 'ॲपल'च्या वार्षिक उत्पन्नाच्या ४३ पटीने जास्त आहे'

ही आकडेवारी बरोबर असण्याची जास्त शक्यता आहे याला दोन कारणे आहेत एक म्हणजे ही आकडेवारी वर्ल्ड इकोनॉमिक फोरममध्ये सादर केली गेली जी जागतिक भांडवली व्यवस्थेत जागतिक बँकेच्या सहयोगाने काम करणारी संस्था आहे आणि

ऑक्सफॅम ही त्यांच्याच सोबत भांडवली संरचनेत काम करणारी समाज कार्यासाठी भांडवल पुरविणारी जागतिक कीर्तीची संस्था आहे. त्यांचे भांडवली आर्थिक हितसंबंध लक्षात घेता स्त्रियांच्या 'अदृश्य श्रमांना' आजपर्यंत त्यांनी 'अनुत्पादक श्रम' मानले. या श्रमाची 'मूल्यनिश्चिती' न झाल्यामुळे वेतनाचा विचार भांडवली व्यवस्थेबाहेरच ठेवला गेला अशा 'घरेलू श्रमांना', 'मूल्यनिश्चितीच्या' समीकरणात बसविण्याचा हा प्रयत्न आहे. म्हणजे गेली १०० वर्षे म्हणजेच २०व्या शतकाच्या सुरुवातीपासून आजतागायत वेगवेगळ्या विचारांच्या स्त्रीवादी संघटनांनी 'घरगुती, कौटुंबिक' श्रमांना 'उत्पादक श्रम' मानले जावे आणि 'वेतन' स्वरूपात त्याची मूल्य निश्चिती व्हावी यासाठी जो लढा दिला आहे त्याला यश येऊ लागले आहे असे यावरून दिसते.

स्त्रियांच्या घरगुती श्रमांची मूल्यनिश्चिती

ऑक्सफॅमच्या या अहवालात भारतातले वास्तव मांडताना असे म्हटले आहे की, भारतातील गृहिणी जे घरकामाचे श्रम विनामोबदला करतात. उदा. घराची देखभाल, स्वयंपाक, कपडे धुणे, भांडी घासणे, साफसफाई करणे, मुलांचे संगोपन करणे त्यात त्यांनी दिलेल्या वेळेचा 'तासा'नुसार हिशेब लावला आणि याच सेवा पुरविणाऱ्या बाहेरच्या संस्था जे शुल्क आकारतात त्या मार्केटमधील संस्थांच्या 'सेवा शुल्काशी' बाईच्या श्रमाशी तुलना केल्यास असे लक्षात येते की, त्याचे आर्थिक मूल्य देशातील विकासदरासाठी गृहीत धरलेल्या उत्पन्नापेक्षा ३.१ पटीने जास्त आहे. शहरातील गृहिणी दिवसभरात विनामोबदला घरकामासाठी ३१२ मिनिटे घालवतात तर ग्रामीण भागातील स्त्रिया दिवसभरात २९१ मिनिटे घालवतात. त्या तुलनेत शहरातील पुरुष कामगार फक्त २९ मिनिटे घरातील स्वत:च्या नित्यकामासाठी देतात तर ग्रामीण भागातले पुरुष ३२ मिनिटे नित्यकामासाठी देतात. पण भारतातल्या प्रत्यक्षातील ११९ अब्जाधीश भांडवलदारांमध्ये स्त्रिया मात्र फक्त नऊ आहेत. तर सामान्य माणसांपैकी स्त्रिया आणि पुरुषांच्या आमदनीमध्ये एकूण ३४%चा फरक आहे.

म्हणूनच एकूणच जागतिक श्रम बाजारपेठेतील स्त्रियांच्या श्रमाची ही चोरी झाकण्यासाठी ''आजची स्त्री ही 'सुपर मॅन' सारखीच 'सुपर वुमन' आणि 'सुपर मॉम' आहे'' वगैरे वारंवार गुणगान गाईले जाते. जेणेकरून तिला 'आपण सोन्याच्या पिंजऱ्यात' कोंडले गेलेलो आहोत हे तिला जाणवू नये म्हणून हा उदात्त उपाधींचा खटाटोप! आधुनिक सुशिक्षित स्त्री 'दशभुजा दुर्गामाते'सारखी आहे असे यातून सुचवायचे असते. 'सुपर वुमन' आणि त्याही पेक्षा 'सुपर मॉम' म्हणजे हजार कामांचा चांगला उरक असलेली, एकाच वेळी आदर्श 'माता', 'पत्नी' बनण्याचा प्रयत्न करणारी, नोकरीची धावपळ करतानाच घरचा स्वयंपाक करून सगळ्यांच्या आवडीनिवडी सांभाळणारी, ऑफिसात कामसू कामगार, कर्मचारी आणि घरी आली की आदर्श पत्नी, माता, आदर्श सून, वगैरे अशी ही 'नव-दुर्गा' वगैरे वगैरे...!

स्त्रीला 'सुपर वुमन' किंवा 'सुपर मॉम' किंवा 'नव-दुर्गा' म्हणत एकदा हरभऱ्याच्या झाडावर चढवले की तिला 'अलौकिकत्व' प्राप्त होते. या प्रक्रियेत एकतर तिचं 'यंत्र' तरी बनते नाहीतर उदात्त 'देवत्व'. स्त्रीचे संपूर्ण 'माणूसपण' यात झाकोळले जाते. या उपाधीने तिला इतकं 'भारी' वाटते की आपोआप एक उदात्ततेची भावना तिच्या मेंदूत खोलवर रुजत जाते. अशा वेळी तिचा 'माणूस' म्हणून स्वतंत्र विकास न होता तिचे एक यंत्र बनते किंवा एक प्रजोत्पादन करणारा प्राणी याच पातळीवर तिचं अस्तित्व राहते. स्त्रीने या जैविक पातळीवरून बाहेर पडू नये म्हणून 'घराला घरपण देणारी' 'कुटुंबातील मुलांवर संस्कार करणारी', 'निसर्गाच्या सृजनाचे म्हणजेच साक्षात देवाचे 'प्रेमस्वरूप' सगुण रूप म्हणजे 'दुर्गा' (माता)!'' स्त्रीला लावलेल्या या आणि अशा अनेक उदात्त उपाधींचा सांभाळ करण्याची म्हणजेच 'शब्दाला जागण्याची' जबाबदारी कळत नकळतपणे बिचाऱ्या त्या एकट्या कर्तृत्ववान स्त्रीवर येऊन पडली आणि त्या सोन्याच्या पिंजऱ्याच्या ओझ्याखाली प्रत्येक बाई पूर्ती वाकून जाते. नोकरी-व्यवसायात धावताना, करियर करीत असताना, 'आईपणा'चे कर्तव्य निभावायला आपण कमी तर पडलो नाहींना अशी सतत टोचणी बाईला लागून राहते आणि खूप अपराधी वाटत राहते नाही?

हे पाहिलं की मला नेहमी १८८२ साली 'स्त्री-पुरुष तुलना' हा निबंध लिहून स्त्रियांना गुलामगिरीत टाकणाऱ्या रूढी प्रथांवर प्रश्न चिन्ह उभे करणाऱ्या, महात्मा जोतिराव फुलेंच्या शिष्या ताराबाई शिंदे यांची आठवण येते. ताराबाई जिवंत असत्या तर कदाचित त्यांनी आपल्या परखड भाषेत सवाल केला असता. स्त्रीला 'अनंत काळची माता' अशी उपाधी लावून गो-मातेच्या पातळीवर आणणाऱ्या तमाम पुरुषांना त्यांनी विचारले असते की'

'काय हो, स्त्रीला जर क्षणाची पत्नी आणि अनंत काळची माता म्हणता तर पोरवळ्यांचे लेंढार तिच्या पाठीला बांधून, तुम्ही क्षणाचे बाप आणि अनंत काळचे 'सांड' बनून फिरणार की काय? तुमचे आपल्या बायकोप्रती काहीच कर्तव्य लागत नाही काय?''

१८८२ साली ताराबाई शिंदे ज्या 'विजयालक्ष्मीच्या' केसच्या निमित्ताने 'स्त्री-पुरुष तुलना' हा अजरामर निबंध लिहिण्यास पुढे सरसावल्या, त्या विजयालक्ष्मीला 'भ्रूणहत्येच्या आरोपाखाली फाशीची

शिक्षा झाली होती. तिच्यावर असा आरोप होता की, व्यभिचार करून ती गरोदर राहिली होती त्यामुळे ती नैतिकदृष्ट्या भ्रष्ट आणि विकृत आहे तसेच मानसिक संतुलन ढासळलेली स्त्री आहे. पण त्या स्त्रीला फशी पाडणाऱ्या आणि आपली जबाबदारी झटकून निघून जाणाऱ्या पुरुषांबद्दल मात्र त्यावेळी कोणीच काहीच कसे बोलत नाही, त्याचा सात्त्विक संताप ताराबाई शिंदेंना आला होता. 'बायका या मूलत: पवित्र असतात आणि परंपरेचा तोल सांभाळायची जबाबदारी बायकांचीच आहे असा त्या काळातल्या समाजाचा विचार होता. पण खरंच आज २०० वर्षांनंतर तरी हे विचार बदललेत का? असो. ताराबाई शिंदे आता जिवंत नाहीत हे एका अर्थी बरेच झाले. जर त्या जिवंत असत्या तर हल्लीच्या टेलिव्हिजन चॅनेल्सवरील चर्चा ऐकून त्यांना तसाच संताप आला असता हे नक्की.

दोनेक वर्षांपूर्वी एका पाळणाघरात ठेवलेल्या एका लहानबाळाला तिथल्या दाईने कशी मारहाण चालवली होती याचा व्हिडीओ खूपच व्हायरल झाला होता. तसेच एका गरीब कष्टकरी माता व बाप आपल्या लहानग्या मुलीला रेल्वे स्टेशनवर सोडून निघून गेल्याच्या घटनेचा विषयसुद्धा टीव्ही चॅनेलवर तेथे चर्चिला जात होता आणि त्या चर्चेत मलाही बोलावले होते परंतु तेथे इतर स्त्रियांची मतं ऐकली आणि मला जोतिबा आणि सावित्रीबाई फुले आणि ताराबाई शिंदे यांची प्रकर्षाने आठवण येऊ लागली. एकूणच साऱ्या चर्चांचे सार 'स्त्री' ही अनंतकाळची माता असते'' किंवा 'माता न तू वैरिणी या संकल्पनेच्या गौरवीकरणापर्यंत येऊन थांबत असे.

खारघर येथे पाळणाघरात सहा महिन्यांच्या बाळाला केलेल्या मारहाणीचे फुटेज सगळ्या न्यूज चॅनेलवर पुन्हा पुन्हा मिनिटाला १० वेळा रिपीट रेटने दाखवून एकूण शहरी मध्यमवर्गीय तरुण आणि वयस्क मातांच्या मनाला हजारो वेळा डागण्या देण्याचा प्रयत्न झाला. ते पाहताना अनेक महिलांच्या मनात एकच विचार येऊन जात होता.

या चर्चा ऐकताना 'नको ते पाळणाघर आणि नको ती नोकरी, 'आयुष्यात आपल्या बाळाच्या सुरक्षेपेक्षा आणखी काय मोठं आहे?' 'शेवटी आपण कोणासाठी कमावतो, बाळासाठीच ना? आपल्या बाळाचा जीव धोक्यात घालण्यापेक्षा नोकरी न केलेली बरी!' असा विचार प्रत्येक नोकरी करणाऱ्या बाईच्या मनात येऊन गेला असणार हे नक्की! पण अशी टोचणी फक्त स्त्रियांच्याच मनाला का लागत होती? पुरुष यावर काय विचार करत होते? बाळाच्या संगोपन आणि सुरक्षेचा विचार ही केवळ स्त्रियांचीच जबाबदारी आहे का? त्यावर पुरुषाची प्रतिक्रिया इतकीच होती की 'मुलाला सांभाळण्याची सोय नसेल तर बायकांनी घरी बसावे'. 'होय, बायकांनीच घरी बसावे' ही अपेक्षा असणे हे आजचे कटू वास्तव आहे खरं. कुणी म्हणालं, हा सगळा विभक्त कुटुंबपद्धतीचाच दोष आहे, स्त्रीने एकत्र कुटुंबात ॲडजेस्ट केलं तर काय होतं? आजकालच्या तरुण मुलीना स्वातंत्र्य हवे. कुणी म्हणालं, बायकांना मुलांपेक्षा स्वत:चे करियर महत्त्वाचे वाटते. कुणी म्हणालं ती दाई मुस्लीम आहे म्हणून अशी वागली इत्यादी इत्यादी..

या सगळ्या प्रतिक्रियांमध्ये एक समान गृहीतक आहे की प्रत्येक स्त्री ही मुळातच 'माता' असते, मग ती तरुण असो की वयस्क, 'लहान मुलाला सांभाळायचे कोणतेही प्रशिक्षण न घेता ते आपसूकच स्त्रीमध्ये येते'. दुसरे गृहीतक असे आहे की बालकांना सांभाळणाऱ्या संगोपन संस्था या म्हणजे समाजातील 'दुसरी कुटुंबे'च आहेत. त्यामुळे कुटुंबसंस्थेत जशी काळजी घेतात तशीच त्यांनी काळजी घ्यायला हवी. तिसरे गृहीतक म्हणजे बालसंगोपन ही निव्वळ त्या त्या कुटुंबाची खासगी जबाबदारी आहे आणि कायदे बनवणे या व्यतिरिक्त 'प्रशासना'चा, 'सरकारची' त्यात काहीच जबाबदारी नाही.

खरं म्हणजे जन्माला येणारे प्रत्येक मूल हे राष्ट्राची सामाजिक संपत्ती असल्यामुळे प्रत्येक छोट्या–मोठ्या शहरात अनेक सार्वजनिक बालसंगोपन केंद्रे स्थापन करून प्रत्येक नोकरी करणाऱ्या दाम्पत्याच्या मुलाची त्यांच्या अपरोक्ष पूर्ण काळजी वाहणे ही सरकारची जबाबदारी आहे. जशी सरकारी रुग्णालये, शाळा आणि कॉलेजे असतात तशीच संगोपन केंद्रे ही देखील सरकारचीच जबाबदारी आहे. नोकरी करणारे प्रत्येक जोडपे हे राष्ट्रीय उत्पादन व्यवस्थेचाच एक भाग आहेत आणि भांडवली व्यवस्थेत तर ते राष्ट्राला नफा कमावून देत असतात.

जर का सोव्हिएत रशिया, जपान, चीन, क्युबा, अमेरिका आणि ब्रिटन यापैकी कोणत्याही देशात पाहिलेत तर लोकसंख्येच्या तीस टक्के प्रमाणात अशी संगोपन केंद्रे आढळतील. ती सारी संगोपन केंद्रे अतिशय सुसज्जदेखील असतात. भारतीय केंद्र शासनाने ऑक्टोबर २०१३ मध्ये संगोपनगृहाबाबत ज्या गाइडलाइन प्रसिद्ध केल्या आहेत त्यात उल्लेख केल्याप्रमाणे संपूर्ण भारतात फक्त २९१३ नोंदवलेली संगोपनगृहे उपलब्ध आहेत. भारताची लोकसंख्या किती? १२५ कोटीच्या लोकसंख्येच्या मानाने ती निश्चितच अपुरी आहेत. प्रश्न असा आहे की, भारतीय लोक, पारंपरिक मातृत्व भावनेच्या विचाराच्या चौकटीबाहेर पडून विचारच करत नाहीत. भारतातील भांडवली शासनव्यवस्थेने तर दुसरे टोक गाठले आहे, राष्ट्रीय उत्पादन व्यवस्थेतील उत्पादक घटकांची सामाजिक सुरक्षेची जबाबदारी पूर्णपणे अंगावरून झटकून टाकली आहे.

आपण एक लक्षात घेत नाही की, मुळात विभक्तकुटुंबपद्धती तयार होणं ही भांडवली व्यवस्थेचीच परिणती आहे. कारण सामूहिक उत्पादन व्यवस्था आणि नैसर्गिक स्रोतावर वर्चस्व प्राप्त करून भांडवलशाहीचा विकास होत असतो.

माझा स्वत:चा वैयक्तिक अनुभव मी सांगते. ३० वर्षांपूर्वी मी आई झाले त्यावेळी मी एका पब्लिक सेक्टर कंपनीत कामाला होते. गरोदरपणीसुद्धा नोकरी आणि सामाजिक कार्याच्या व्यस्ततेमुळे माझ्याकडे अजिबात रजा शिल्लक नव्हत्या. बाळंत झाल्यानंतर तीन महिन्यांची बाळंतपणाची रजा संपल्यावर लगेचच मला कामावर रुजू, होणे भागच होते. तशी मी तीन महिन्यांनंतर कामावर रुजू झाले. बाळासाठी बाटलीच्या दुधाची सोय करून मी पहिल्या दिवशी ऑफिसमध्ये आले खरी पण अंगावरच्या दुधाचा पान्हा काही आटत नव्हता. मी घातलेला ड्रेस भिजू लागला. ते दिसू नये म्हणून अनेक उपाय केले. डबल दुपट्टे घेतले पण पान्हा काही थांबेना. सगळे कपडे भिजले. अखेर शरमेने माझ्या साहेबांना सांगून मी कशीबशी घरी परतले. तो प्रसंग आजही आठवला तरी डोळ्यात पाणी येतं. इथे मुद्दा काय आहे की आपण भांडवली व्यवस्थेतली आधुनिकता अंगीकारली पण श्रनिकांच्या गरजांची मात्र अवहेलना केलीय.

वास्तविक पाहता शहरातील पालणाघरात लहान बाळांना आणि त्यांच्या मातांना सोसाव्या लागणाऱ्या समस्या ग्रामीण भागातील कष्टकरी शेतमजूर स्त्रीला सोसाव्या लागत नाहीत का? नसतील तर त्या का नाहीत? अशी कोणती बफर सिस्टीम त्यांना आधार देते? शहरातील कमावत्या स्त्रियांना (समाजवादी व्यवस्थेप्रमाणे) त्यांच्या गरजेपुरते कुटुंब-वेतन दिले गेले तर त्या अशा हालअपेष्टा सहन करून त्या सुपर मॉम बनण्याचा का प्रयत्न करतील? इतके शारीरिक, मानसिक कष्ट उचलून राबण्याची त्यांना हौस असते का? मध्यमवर्गीय स्त्रियांचे सोडा पण त्यांच्याकडे काम करणाऱ्या मोलकरणी किंवा पाळणाघरातील कर्मचारी स्त्रियांचे आयुष्य सुखकर असते का? त्या कष्टकरी स्त्रिया त्यांच्या मालकिणीपेक्षाही दुप्पट कामाचा बोझा अंगावर पेलत बाहेर आणि स्वत:च्या घरी दोन्हीकडे राबत असतात. त्यांच्या कष्टांचे मोजमाप आपण करणार आहोत की नाही?

पाळणाघराविषयीच्या चर्चांमधून आणखीनही बरेच मुद्दे पुढे आले जे मुख्यत: व्यवस्थापन आणि प्रशासनाने काय अंकुश ठेवावा याबाबत होते. उदाहरणार्थ १) पाळणाघरे आणि संगोपन घरांसाठी सरकारने कडक नियमावली करावी. २) त्या पाळणाघराला टाळे मारावे. ३) पाळणाघरांची नोंद पोलीस स्टेशनमध्ये करावी किंवा एक सुरक्षारक्षक ठेवावा. ४) सीसीटीव्ही कॅमेराची सक्ती करावी. ५) प्रत्येक दोन मुलांमागे एक सांभाळणारी दाई असावी. ६) डॉक्टर तसेच औषधांची सोय असावी. ७) आईवडिलांना मोबाइलवर माहिती देणारे ॲप असावेत. ८) प्रशासनाने या पाळणाघरातील दाईचे प्रशिक्षण झाले असले तरच परवानगी द्यावी. ९) प्रशासनाने तेथील खेळणी साहित्य याची तपासणी निश्चित करावी. १०) आईबापांनी सुरक्षेची तपासणी केल्यानंतरच ते पाळणाघर निवडावे इत्यादी इत्यादी.

तसं पाहिलं तर विज्ञान तंत्रज्ञानाच्या या युगात, प्रजनन ही स्त्रियांची भूमिका वगळता मुलांचे भरण, पोषण, संगोपन आणि वृद्धापकाळातील देखभाल या साऱ्या जबाबदाऱ्या संपूर्ण कुटुंब समाज आणि आधुनिक काळात अंतिमत: शासनाचीच ठरते. पुरुषसत्ताक कुटुंबपद्धती संयुक्ततेकडून विभक्त पद्धतीकडे संक्रमण करून पुढे आली. संयुक्त पद्धतीतील विषमतापूर्ण सत्तासंबंधांच्या जाचापासून स्त्रीने स्वत:ची सोडवणूक करून घेतली खरी, पण पुरुषसत्तेतील अन्यायकारक श्रमविभागणीचे स्वरूप मात्र तेच राहिले. खरं म्हणजे, उलट सुपर वुमनवर साधारण स्त्रीच्या मूळ क्षमतेच्या पेक्षा कितीतरी जास्त पटीने कामाचा बोझा वाढला. परिणामी आधुनिक स्त्रीला सुपर मॉमचा अवतार धारण करून दहा हात, दहा तोंडे, दहा आयुधे यांचा वापर करावा लागतो. मातृत्व गौरवीकरणाचे नवे मुकुट धारण करावे लागत आहेत.

खरं तर, इतिहासाचार्य वि.का. राजवाडे यांनी विवाहसंस्थेचा उद्देश हा शरीर संबंधांचे नियोजन आणि मानववंश सातत्य राखणे इतकाच आहे असे मांडले. परंतु त्या नंतरच्या काळात त्यातून उदयाला आलेली कुटुंबसंस्था ही विषमतामूलकच ठरत गेली. आदिम मानवसमूह स्थिर झाले आणि हळूहळू खासगी मालमत्ता तयार झाली. अतिरिक्त उत्पादनातून वरकड मूल्य तयार झाले, त्याची जपणूक करण्यासाठी कुटुंबसंस्थेचा उदय झाला. कुटुंबसंस्था तयार झाल्यामुळे त्यात दांडगाई करू इच्छिणाऱ्या पुरुषाकडे कुटुंब प्रमुखपद गेले. कालांतराने सामाजिक विकासाच्या प्रक्रियेत त्याच्या संपत्तीला वारस असणारी मुले त्याचीच असली पाहिजेत असा आग्रह धरला गेला. साहजिकच स्त्रीच्या जननक्षमतेला वेठीला धरले गेले आणि कुटुंब व्यवस्था काळाच्या ओघात अधिकाधिक बंदिस्त होत गेली. या बंदिस्त कुटुंबव्यवस्थेत व्यवसायाधारित जातीव्यवस्थेचा शिरकाव झाला. उच्च–नीचतेची उतरंड तयार झाली आणि अखेर डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात तसे 'स्त्रिया जातीव्यवस्थेचे प्रवेशद्वार बनल्या.' इतिहासाचा हा सूत्रात्मक आढावा या ठिकाणी घेण्याचे कारण असे की, वर्तमानात पुन: पुन्हा उद्‌भवणाऱ्या चर्चा आणि वादंगाच्या काळात ही पार्श्वभूमी लक्षात ठेवणे गरजेचे आहे.

इतिहासाच्या पुढल्या टप्प्यावर विकसित झालेल्या भांडवली व्यवस्थेत पुरुषसत्तेचे हितसंबंध जपणारी श्रमविभागणी झाली. परिणामी

मातृत्वाचे आणि त्या सभोवतालच्या अन्य संगोपन संकल्पनांचे उदात्तीकरण करण्यात आले. त्यासाठी धर्माचा आणि विविध रूढीप्रथांचा आधार घेतला गेला. साहजिकच प्रजनन व संगोपन यांचे यंत्र बनून स्त्री घरातच कोंडली गेली. स्त्रिया घरात जे काम करतात त्याला मोल न देता तिच्या या दुहेरी भूमिकेचे गौरवीकरण करत स्त्रीला या उदात्ततेच्या मूल्यांमध्ये जखडून टाकले गेले. स्त्रीने स्वत:च आनंदाने स्वीकारलेल्या या भूमिकेतील आणि श्रमविभागणीमधील विषमता तिला कित्येकदा जाणवत असूनही ती त्यातून बाहेर पडू शकत नाही.

आश्चर्य म्हणजे पुरुषसत्तेने विज्ञान तंत्रज्ञानाचा वापरसुद्धा आपल्याच स्वार्थासाठी सुरू केला आहे. स्वत:च्या पुरुष बीजाचे जतन करून अनोळखी स्त्रीचे गर्भाशय भाड्याने घेऊन सरोगेट मदरच्या रूपात आपल्या वंशाचे मूल जन्माला घालणारी शाहरूख खान किंवा अमीर खानसारखी मंडळी एक प्रकारे वंशवादी दृष्टिकोनालाच खतपाणी घालत आहेत असं म्हणावे लागेल. दुसरीकडे स्त्रियासुद्धा कितीही शिकल्या, वैमानिक बनल्या, सीमेवर लढायला गेल्या, अंतराळात गेल्या, पोलीस कमिशनर झाल्या तरीही त्यांना आयुष्यात एकदा तरी मातृत्वाच्या सनातन प्रश्नाला सामोरे जावेच लागते. व्यवसायपरत्वे त्यांची इच्छा असो वा नसो, मूल जन्माला घातलेच पाहिजे त्यातच स्त्री जीवनाची सार्थकता आहे अशा प्रभावाखाली त्या राहतात.

या विचाराचे दुसरे टोक ज्या स्त्रिया मूल जन्माला घालू शकत नाहीत किंवा ज्या समलिंगी आहेत त्या अपवित्र आणि अपशकुनी आहेत म्हणून त्यांना रोजच्या व्यवहारातून बाजूला फेकले जाते. केवळ वांझोट्या स्त्रिया असा शिक्का बसू नये म्हणूनही अनेक स्त्रिया दडपणाखाली येऊन मूल जन्माला घालतात. 'खरे म्हणजे मातृत्वाचा अनुभव घ्यावा की न घ्यावा हा त्या त्या व्यक्तीचा प्रश्न आहे पण त्यापलीकडे 'वंशसातत्य टिकवण्यासाठी' या संकल्पनेचा पुन्हा विचार व्हायला हवा. कितीही टेस्ट ट्यूब बेबीचे तंत्र येवो, किंवा आयव्हीएफचे तंत्र येवोत स्त्रियांच्या बाबतीत ही सारी तंत्रे 'वंशशुद्धी, वंशाचे सातत्य, गर्भलिंग निवड आणि वंशाला दिवा देणे' या उद्दिष्टासाठीच केवळ वापरली जातात. मुलीचा गर्भ निपटून टाकावा यासाठीच या तंत्राचा उपयोग स्त्रियांना करावासा वाटावा यासारखी दुसरी दु:खाची बाब नाही.

प्रश्न नुसता हा नाही की आधुनिक प्रजोत्पादन विज्ञान-तंत्रज्ञान (रीप्रोडक्टिव्ह टेक्नॉलॉजी) यांचा गैरवापर होतो आहे. प्रश्न असा आहे की तो गैरवापर कशासाठी होतोय? आधुनिक प्रजोत्पादन विज्ञान-तंत्रज्ञानाचा गैरवापर हजारो वर्ष जुन्या-पुराण्या हिंसात्मक मूल्यासाठी होतोय. ते मूल्य कोणते? तर ते म्हणजे 'वंश श्रेष्ठत्व' टिकवणे. आपले वंशश्रेष्ठत्व टिकवण्यासाठी दुसऱ्या समूहांवर हल्ला करून त्यांना नेस्तनाबूत करणं हे जितकं हिंसात्मक आहे तितकंच वंश टिकवण्यासाठी गर्भलिंग निवड करून स्त्री गर्भाची हत्या करणं हे आहे. 'वंशवृद्धी आणि वंशश्रेष्ठत्व' यासाठी कोणत्याही हिंसेचा पुरस्कार करणारी माणसे ही मुळातच फॅसिस्ट वृत्तीची असतात असे म्हटले तर ते वावगे ठरू नये. हिंसेचा अवलंब आणि फॅसिझम यांचे किती जवळचे नाते आहे हे हिटलरसारख्या नाझी भस्मासुराच्या उदाहरणातून स्पष्ट होते.

वंशवादी मनोवृत्तीचे पुनरुज्जीवन आज पाश्चात्त्य देशात पुन्हा होऊ लागलेले दिसते. १९व्या आणि २०व्या शतकात टोकाची वंशवादी भूमिका असणाऱ्या अमेरिकेला वंशवादविरोधी संघर्षाला सामोरे जावे लागले होते. परिणामी अब्राहिम लिंकन असोत किंवा मार्टिन ल्युथर किंग यांना वंशवादविरोधी कायद्याची प्रस्थापना करण्यासाठी लढावे लागले त्यात त्यांचा बळी घेतला गेला. अमेरिकन सरकारने निग्रोंच्या लोकसंख्या वाढीवर नियंत्रण आणण्याच्या दृष्टीने १९३९ साली 'निग्रो प्रोजेक्ट' नावाचा संशोधित अहवाल प्रसिद्ध केला. या रिपोर्टमध्ये वैज्ञानिक संशोधनाचा आविर्भाव आणीत असे म्हटले गेले की 'निग्रो स्त्रिया या मूलत: नैसर्गिकरीत्याच माता असतात, सातत्याने मुलांना जन्म दिल्याने त्यांच्यात मातृप्रधान कुटुंबपद्धती असते, मातृप्रधान कुटुंबात अर्थार्जनाचा अभाव असल्याने दारिद्र्य वाट्याला येते, त्यामुळे अशी मातृप्रधान कुटुंबे (अनफिट) वाढणे हे राष्ट्र विकासाला अयोग्य आहे. अधिकाधिक पितृप्रधान कुटुंबे तयार व्हावीत त्यासाठी कुटुंबनियोजनचा अवलंब केला पाहिजे. त्यानंतर तेथे मोठ्या प्रमाणावर गर्भनिरोधक औषधांचा बेलगाम वापर केला गेला. काळ्या व गोऱ्या नसलेल्या स्त्रियांना खेचून नेऊन त्यांच्यावर ऑपरेशन्स केली गेली. साहजिकच या मास स्टरिलायझेशनला काळ्यांच्या संघटनांकडून तीव्र प्रतिक्रिया उमटली काळ्या पुरुष नेतृत्वाने, काळ्या स्त्रियांनी गृहिणीपद व मातृत्व सांभाळावे आणि जास्तीत जास्त मुलांना जन्म द्यावा असे आवाहन केले. यावर काळ्या स्त्रीवाद्यांनी कडाडून हल्ला तर केलाच पण अमेरिकन सरकारच्या वंशवादी धोरणाविरुद्ध काबाडकष्ट करणाऱ्या स्त्रियांना घेऊन हल्लाबोल केला.

एकूणच सुपर मॉमविषयीच्या चर्चेतून एक लक्षात येतं की, आधुनिक भांडवली समाजात सगळ्या जगाचा संगोपन आणि संस्कृती-संवर्धनाचा डोंगर काळाच्या ओघात मल्टिपल स्किल्स आत्मसात केलेल्या सर्व आधुनिकतावादी स्त्रियांच्या शिरावर दिलेला आहे आणि बिचाऱ्या स्त्रियांनी, ब्रह्मचारी हनुमानापेक्षाही दुप्पट ताकदीने तो आपल्या शिरावर पेललाय हेच खरे.

**संपर्कासाठी फोन नं : ९९६९१४८६५४**

❖❖❖

# अमेरिकेतील स्त्रीवाद : शोध आणि बोध

■ स्नेहा गोळे

आज नवउदारमतवादी भांडवली व्यवस्थेच्या बदलत्या स्वरूपामुळे तसेच ट्रम्प - मोदी ह्यांच्या जमान्यात सामाजिक चळवळी संपल्या आहेत, त्यातील लढाऊ बाणा संपला आहे अशी चर्चा सातत्याने होताना दिसत आहे. मात्र अनेक अभ्यासक मांडतात त्याप्रमाणे कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीच्या प्रतिकाराची बीजे ही त्या परिस्थितीतच लपलेली असतात. त्या विशिष्ट कालखंडात वेगवेगळ्या वर्गांचा परस्परांशी होणारा संघर्ष, निर्माण होणारी चर्चा यातूनच नवीन समाज व्यवस्था निर्माण होत असते. त्यामुळे वेगवेगळ्या काळातील चळवळी वेगवेगळ्या दिसतात, असतात आणि त्यामुळेच समकालीन चळवळी या कोणती साधने, अवकाश आणि रणनीती वापरत आहेत यांचा अभ्यास करणे गरजेचे ठरते. समकालीन चळवळ समजून घेताना म्हणून इतिहासाचा संदर्भ समजणे महत्त्वाचे आहे आणि म्हणूनच या टप्प्यावर ज्या काळाला चळवळीचा सुवर्णकाळ म्हणून संबोधण्यात येते, अशा १९६०-७०च्या दशकाकडे नव्याने चिकित्सक पद्धतीने बघण्याची गरज निर्माण झाली आहे आणि नेमकी हीच गरज नेटफ्लिक्सवरील ''शी इज ब्युटीफुल व्हेन शी इज अँग्री''हा माहितीपट बऱ्याच अंशी पूर्ण करतो. म्हणून याची ओळख करून देण्याचा हा प्रयत्न. माहितीपटात एक स्त्रीवादी म्हणते त्याप्रमाणे, समकालीन पिढीला स्त्रीवादी चळवळीच्या आधी परिस्थिती कशी होती याची जाणीव नाहीये - विवाह म्हणजेच यश, तुम्ही मुले न होऊ द्यायचा निर्णय घेऊच शकत नव्हता... आणि म्हणूनही एका अर्थाने हा माहितीपट समजणे, बघणे आत्ताच्या टप्प्याला गरजेचे वाटते.

२०१४ साली बनवलेल्या या माहितीपटाची पार्श्वभूमी आहे टेक्सास आणि इतर राज्यांमध्ये स्त्रियांच्या पुनरोत्पादक हक्कांवर घालण्यात येणारा घाला आणि या विरुद्ध स्त्रिया करीत असलेली आंदोलने. मेरी डोर यांनी दिग्दर्शित केलेली आणि मेरी डोर आणि नॅन्सी केनडी या निर्माता असलेल्या या माहितीपटामध्ये ६०-७० च्या दशकातील ऐतिहासिक दस्तऐवज आणि त्या वेळेपासून स्त्रीवादी चळवळीत सहभागी स्त्रियांच्या मुलाखती यांचा प्रामुख्याने वापर करण्यात आला आहे. त्याचबरोबर सध्या अमेरिकेन स्त्रिया काढीत असलेले मोर्चे, सभा यांचे चित्रीकरण यात वापरले गेले आहे. माहितीपटाचे शीर्षक अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहे, स्त्रियांनी सौम्य असावे, नाजूक असावे, त्यांनी रागावू नये, प्रश्न विचारू नये, चिडचिड करू नये, आपल्या परिस्थितीविरुद्ध लढू नये, ब्रदेखील उच्चारू नये, अशी चौकट असताना, माहितीपट - ती जेव्हा चिडलेली असते, संतप्त असते तेव्हा ती सुंदर असते असे प्रतिपादन आपल्या शीर्षकातून करतो. बेनिता रॉथ ६०-७० च्या दशकातील अमेरिकेतील स्त्री चळवळीचा जो अभ्यास करतात, त्यात त्या असे म्हणतात की नवडाव्या गटांमध्ये सक्रिय असणाऱ्या स्त्रिया जेव्हा स्त्री प्रश्न उचलू लागल्या तेव्हा त्यांनी चिक्स (सुंदर मुली) बनून राहावे, बिच्च (कुत्री, कजाग, भांडकुदळ स्त्री) बनू नये असे त्यांना म्हटले गेले. या पार्श्वभूमीवर माहितीपटाचे नाव अधिकच महत्त्वपूर्ण ठरते.

१९६६-१९७१ मध्ये अमेरिकेत उदयास आलेल्या नव्या स्त्री चळवळीचे सिंहावलोकन करण्याचा प्रयत्न यात केला आहे. नॉव

(स्त्रियांची राष्ट्रीय संघटना) च्या स्थापनेपासून आणि बेटी फ्रिडन यांच्या 'फेमिनीन मिस्टिक' या पुस्तकाच्या प्रकाशनापासून माहितीपट या नव्या कालखंडांचा मागोवा घेतो. पहिल्या टप्प्यात कामाच्या ठिकाणी होणारा भेदभाव आणि स्त्रियांना विशिष्ट नोकऱ्यांमध्ये अडकवले जाणे, या संबंधी झालेल्या आंदोलनाची चर्चा केली जाते. त्याच बरोबर या कालखंडात एकच एक अशी एकसंध चळवळ नव्हती तर यात अनेक वेगवेगळ्या प्रवाहांचा, वेगवेगळ्या धारांचा समावेश होता याचे भान माहितीपट सातत्याने ठेवतो. पहिल्यांदा गोऱ्या स्त्रियांच्या स्त्रीवादी संघटना उभ्या राहिल्या आणि मग त्यांतील भेदभावामुळे नंतरच्या टप्प्याला रंगधारी स्त्रियांनी आपल्या संघटना उभ्या केल्या अशी जो सरधोपट आणि चुकीची ऐतिहासिक मांडणी झाली आहे त्याला माहितीपट प्रश्नांकित करतो. ६०-७० च्या दशकात स्त्री प्रश्न पुढे आणणाऱ्या आणि त्या भोवती संघटन करणाऱ्या स्त्रिया या केवळ गोऱ्या, मध्यमवर्गीय नव्हत्या तर त्या आफ्रिकन-अमेरिकन लोकांच्या नागरी हक्क चळवळ, युद्धविरोधी चळवळ, कामगार हक्कांच्या चळवळ अशा विविध चळवळींमधून स्त्री प्रश्न मांडत होत्या, राजकीय बनत होत्या आणि म्हणून त्यांची स्त्री प्रश्नांची मांडणी वेगवेगळी होती, तसेच त्यांच्या संघटनांचा उगम एकाच वेळेला, समांतर पद्धतीने होत होता हे माहितीपटातून ठळकपणे पुढे येते. ६०-७० च्या दशकातील सामाजिक परिवर्तनाच्या इतर चळवळी आणि स्त्री चळवळ यांच्यामध्ये आंतरिक, नाळेचे नाते होते, हेसुद्धा मुलाखतींमधून स्पष्ट होते.

'जे जे खासगी ते राजकीय' या स्त्री चळवळीच्या महत्त्वाच्या घोषणेची पाळे-मुळे माहितीपटात सापडतात. आपले अनुभव हे आपल्या एकटीचे नाहीत तर इतरही अनेक स्त्रियांचे आहेत, त्यामुळे स्त्री म्हणून आलेले अनुभव हे केवळ वैयक्तिक राग / अपयश किंवा निराशेशी निगडित नसून, व्यवस्थेशी, समाजाशी निगडित आहेत ही जाणीव, जाणीव-जागृती गटाचा भाग बनून स्त्रियांना येत होती. यातून स्त्री या व्यवस्थेत सत्तेच्या संदर्भात घडते आणि जर हे अनुभव समान असतील तर याचा प्रतिकारसुद्धा एकत्र येऊन होऊ शकतो, या जाणिवेचा विकास या गटामधून झाला. यात एका नवीन प्रकारच्या राजकारणाची चुणूक जशी होती, तसेच स्त्रीवादी राजकारण यापुरते मर्यादित ठेवण्याचे धोकेही काय होते, याची सविस्तर चर्चा माहितीपटात केलेली आहे. स्त्रीवादी चळवळीतील एका टप्प्याला जेव्हा समाजाने घालून दिलेल्या स्त्रीसुलभ आणि पुरुषी चौकटींना स्त्रियांनी प्रश्न विचारायला सुरुवात केली, तेव्हा त्या वेळेस अनुभवास आलेला उत्साह, आपण एकटे नाही तर 'स्त्रिया' नावाच्या समूहाचा आणि त्यातून घडलेल्या अनुभवाचा आपण भाग आहोत. ही जाणीव क्रांतिकारी कशी होती, हे स्पष्ट होते. अनुभवांची देवाण-घेवाण कशी राजकीय ठरली / बनली हे स्त्रियांच्या मुलाखतींमधून स्पष्ट होते. या जाणिवेतून मग ज्ञानक्षेत्र, अकादमिक क्षेत्र यामध्ये स्त्रिया कुठे आहेत, त्यांचा इतिहास काय, त्यांचे साहित्य, त्यांची कला का शिकवली जात नाही असे प्रश्न पुढे आले आणि याचेच रूपांतर कालांतराने स्त्री अभ्यास या ज्ञानक्षेत्रात झाले. ज्ञानक्षेत्रातील भेदभावाविरोधी आपल्या पदव्यांचे दहन, मिस अमेरिका स्पर्धेच्या विरोधात ब्रा आणि इतर नियमन करणाऱ्या कपड्यांचा सार्वजनिकरित्या त्याग करणे असो, अशा या काळातील नव्या रणनीतींची झलक सुद्धा माहितीपटात बघायला मिळते. चळवळ केवळ धरणे आणि आंदोलन नाही, तर कविता, कला, भित्तीपत्रके, मासिक या सर्वांतून कशी घडत गेली आणि स्त्रियांचे प्रश्न नावाचा कोटिक्रम कसा घडत गेला हेसुद्धा यातून स्पष्टपणे पुढे येते. स्त्रियांच्या शरीरावरील हक्क, सौंदर्याच्या कल्पना, स्त्रियांनी स्वत:चे शरीर समजून घेण्यासाठी केलेला झगडा, लिहिलेली पुस्तके असा सगळा आढावा यात येतो. बलात्कार हा पुरुषांच्या वासनेचा नाही तर सत्तेचा मुद्दा आहे, बलात्कार हा स्त्रियांविरुद्ध होणाऱ्या राजकीय हिंसेचे चेहरा आहे, असे मुद्दे चळवळीमधून कसे पुढे आले, हे यात बघायला मिळते.

स्त्री नावाचा कोटिक्रम घडण्यातून जसे नवीन राजकारण उभे राहिले, तसेच तो एकजिनसी कोटिक्रम आहे या आग्रहामुळे कोणत्या कोंड्या निर्माण झाल्या याचा वेधही माहितीपट घेतो. एकीकडे गर्भपाताचा मुद्दा सार्वत्रिक, सर्व स्त्रियांचा मुद्दा म्हणून चळवळ पुढे आणते, पण यात काळ्या स्त्रियांचे वेगळे म्हणणे, त्यांचे विशिष्ट प्रश्न आणि अनुभव केंद्रस्थानी न आणल्याने झालेले गोंधळ - कृती आणि विश्लेषणात राहिलेल्या मर्यादा आणि काळ्या स्त्रियांनी केलेली वैशिष्ट्यपूर्ण मांडणी हे सर्व माहितीपटातून ठळक होते. याचप्रमाणे समलिंगी (लेस्बियन) स्त्रियांची स्वतंत्र मांडणी कशी, केव्हा झाली आणि त्यांनी त्यांचे प्रश्न ऐरणीवर आणण्यासाठी कुठल्या रणनीती वापरल्या याचे दर्शनसुद्धा माहितीपटातून होते. यातील सर्वात महत्त्वाची बाब अशी आहे की, हे सगळे विविध मतप्रवाह आहेत, राजकीय समज आणि विश्लेषणातील भिन्नत्व आहेत हे अधोरेखित करून, 'बायका बायकांचे पटत नाही', त्यांच्यात छोट्या छोट्या कारणांवरून भांडणे होतात, यामुळे चळवळीचे तुकडे झाले, असा जो सर्वमान्य समज आहे, त्याला माहितीपट प्रश्नांकित करतो. चळवळीचा भाग होणे, स्त्रीवाद या कल्पनेशी झालेला सामना हा आनंददायी, मुक्तिदायी, इरोटिक होता असे स्त्रिया वारंवार म्हणताना दिसतात.

स्त्रीवादाच्या संदर्भात एक मोठा गैरसमज असा आहे की, स्त्रीवाद हा कुटुंब, विवाह आणि मातृत्वविरोधी आहे. अमेरिकेतील

चळवळीने सातत्याने बालकांच्या काळजीसाठी पाळणाघरे असावी, मुलांच्या संगोपनाची जबाबदारी स्त्रियांबरोबर राज्यसंस्था आणि भांडवलशाहीचीसुद्धा असावी या मागण्या कशा लावून धरल्या याच्या चित्रणातून माहितीपट हा गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न करतो. तसेच गर्भपाताच्या सेवा स्त्रियांना असाव्यात हा प्रश्न मातृत्वविरोधी नसून, स्त्रियांच्या स्वत:च्या शरीरावरील हक्कांचा, तसेच जास्त प्रभावी राजकीय व्यक्ती बनण्याचा आहे हे यातून पुढे येते. प्रामुख्याने काळ्या आणि चिकाना स्त्रियांनी केलेल्या पुनरुत्पादक न्यायाच्या मागणीमधून हे अधोरेखित होते.

स्त्रियांच्या स्वायत्त गटांनी नेतृत्व आणि निर्णय प्रक्रिया या संदर्भात केलेल्या प्रयोगांची आणि त्यांच्या यशापयशाचा आढावादेखील यात येतो. हे करत असताना माहितीपट या गटांमधील पडझडीकडे डोळसपणे बघतो आणि एकंदर पुरुषसत्ताक समाजात या प्रयोगांना आलेले अपयश समजून घेण्याचा प्रयत्न करतो.

ज्या हक्कांसाठी अमेरिकन स्त्रियांनी ६०-७०च्या दशकात संघर्ष केला, परत एकदा त्या हक्कांवर घाला येतो आहे, अशा परिस्थितीत नैराश्य येणे स्वाभाविक आहे. पण स्त्रीवाद नावाच्या कल्पनेनी जग बदलून टाकले आणि हा बदल आपोआप आला नाही, तर तो स्त्रियांच्या एकजुटीतून आणि संघर्षांतून निर्माण झाला याची आठवण करणे या काळात प्रेरणादायी ठरते. आपला संदर्भ जरी वेगळा असला तरी जेव्हा स्त्री प्रश्नाचे सार्वत्रिकीकरण झाले आहे आणि त्यातील राजकीय धार लोप पावली आहे की, काय असा प्रश्न पडतो आहे, त्या काळात आपण कोणाच्या खांद्यावर उभे आहोत आणि आपण गृहीत धरत असलेले हक्क कुठल्या संघर्षामधून घडले आहेत, याची आठवण ठेवणे गरजेचे आहे. तसेच आपला कालखंड आणि त्यातील आव्हाने जरी वेगळी असली तरी ती इतिहासापासून पूर्णत: तुटलेली नसतात, चळवळीचा हा नवीन टप्पा असला तरी ती जुन्या टप्प्यापासून जसा फारकत घेतो, तसेच जुन्या टप्प्याशी सलगतादेखील दर्शवितो, म्हणून सलगता आणि खंड यांच्यातील द्वंद्व आणि त्यातून समकालीन चळवळीचे सम्यक आकलन करायचे असेल तर हा इतिहास तपासून बघणे महत्त्वाचे आहे आणि म्हणूनच स्त्रीवादाने काय केले याची ओळख करून देणारा हा माहितीपट बघणे, त्याची चर्चा करणे गरजेचे आहे असे वाटते.

❑

# कविता

## नागरिकत्व

हा देश हिसकावून देणार नाही
आम्ही तुम्हाला आमच्या हातून
हे पर्वत, डोंगर
या नद्या नाले
ही शेतंभातं
अन् सर्वव्यापी निरभ्र आकाश
शतकानुशतकांची नि:संदिग्ध वहिवाट
आहे ही आमची
आणि तुम्ही खुजे सिद्ध करायला सांगता आहात
आमच्या इथल्या अस्तित्वाबद्दल?
इथल्या प्रत्येक मानवी स्वातंत्र्याच्या
विजयाचे उत्सव साजरे केले आहेत आम्ही
अन् अश्रूंनी भिजवली आहे ही जमीन
आमच्या आयाबहिणी
तुमच्या ग्लोबल बाजारात विकताना पाहताना
पण आम्ही षंढ नाही याचे भान ठेवा
हे आमच्या अस्तित्वाला दिलेले आव्हान
सक्षमपणे स्वीकारतोय आम्ही
याद राखा
हा देश हिसकावून देणार नाही
आम्ही तुम्हाला आमच्या हातून
आमच्या लाल रक्ताची
कितीही किंमत मोजावी लागली तरी.

**- अरुणचंद्र गवळी, पुणे**

❑

# मागे वळून पाहाताना

■ **वैशाली चवाथे**

नुकताच मला १० फेब्रुवारी २०२० रोजी ''निर्भया पुरस्काराने सन्मानित'' करण्यात आले. सातारा जिल्ह्यातील ९ महिलांचा महाराष्ट्र ''पोलिस दला''कडून माननीय गृहराज्य मंत्री श्री. शंभुराज देसाई व जिल्हा पोलीस अधिक्षक तेजस्वी सातपुते यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. हा सन्मान सोहळा सातारा येथे पार पडला. या सोहळ्याला प्रमुख उपस्थिती होती ती मे. फिनोलेक्स केबल लि. या कंपनीचे चेअरमन श्री. दीपक छाब्रिया व व्यवस्थापनातील सहकारी श्री. महेश विश्वनाथन व श्री. रमेश लालवाणी.

या उंचीवर पोहोचताना मला नक्कीच मागे वळून पाहाण्याची गरज आहे. जिवनामध्ये मी किती पायऱ्या चढून वर आले हे मला निरखून पाहावे लागेल.

एका सामान्य कुटूंबात जन्माला आलेली मी मुळातच बुजरी व अबोल होते. मला निर्भया पुरस्कार मिळणे हे एक आश्चर्यच होते! तसे परिस्थिती माणसाला धीट बनवते. हा पुरस्कार मिळाला व मी मागे वळून पाहिले. माझे मलाच नवल वाटले. तसे या अगोदर मला माझ्या सामाजिक कार्याची दखल घेऊन अन्नपूर्णा परिवाराने ''यशस्वी उद्योजिका'' पुरस्कार देऊन २०१५ला सन्मानित केले होते तसेच किर्लोस्कर ग्रूप ऑफ कंपनीतर्फे २०१६ साली महिलांना मार्गदर्शन करण्यासाठी बोलावून सन्मान केला होता.

माझे बालपण तसे मध्यमवर्गीय कुटूंबातले माझे वडील बँकेत होते. आई शाळेत चित्रकला शिक्षिका होती. बालपण उल्हासनगर मुंबई येथे गेले. वडिलांची अलिबाग चौक येथे बदली झाली. आईला नोकरी सोडावी लागली. नंतर घराचा गाडा सांभाळण्यासाठी पतसंस्थेत व मुलींचा शिवणकलेचा क्लास घेऊन, प्रपंच सांभाळून मदत करू लागली.

शालेय व महाविद्यालयीन शिक्षण चौल अलिबागसारख्या छोट्या गावात झाले. 'बीकॉम'ची पदवी पास झाल्यावर मुंबई येथे येणे झाले.

मी अन्नपूर्णा संस्थेमध्ये श्रीमती प्रेमा ताईना भेटण्यासाठी गेले असता त्याच दिवशी अन्नपूर्णाच्या वाशी कार्यालयात कॅशियर म्हणून नियुक्त करून घेतले. हे वर्ष १९९५. मी ह्या संस्थेची झाले.

त्यानंतर अन्नपूर्णातील माझा प्रवास सुरू झाला. जगाचा काही अनुभव नसलेली मुंबई जवळील पनवेलमध्ये राहून वाशी कार्यालयात काम करू लागले. हे काम करताना अनेक वेळा होणाऱ्या एका ताईच्या प्रेमाने रागाने समजून देण्याच्या पद्धतीने शिकत गेले.

१९९७ साली 'शिरवळ' येथे गोदरेज समुहाची लॉकीम कंपनीत अन्नपूर्णाला कॅन्टीन चालवायला मिळाले. प्रेमाताईंनी माझी कॅन्टीन मॅनेजर म्हणून नेमणूक केली. कधीही घरापासून दूर न राहिलेली पण सर्वांच्या पाठिंब्याने प्रथम प्रवास सुरू झाला. आम्ही ११ जणांची टीम घेऊन ह्या शिंदेवाडीत काम सुरू केले. परके गाव, अनोळखी माणसे, चोरांची शिंदेवाडी असे नाव असलेले गाव रात्री खूप भयाण वाटायचे पण. माझ्या बरोबरचा स्टाफ माझी खूप काळजी घ्यायचा. पाटील मावशीसारख्या अनेक मावश्यानी मला धीर दिला. घरून येणारा फोन व प्रेमाताई स्वत: येऊन आम्हाला मार्गदर्शन करायच्या आमच्यातील एक होऊन राहात होत्या.

हळूहळू ओळख झाल्यावर हुरूप आला. गावकरी सुद्धा सहकार्य करावयास लागले. ह्या ठिकाणी मार्केट दूर असल्यामुळे व निरनिराळ्या कंपन्यांमध्ये देखरेखीसाठी जावे लागत असे. त्यावेळी कॅन्टीनच्या गाडीवर अवलंबून राहावे लागे म्हणून प्रेमाताईनी मला कार ड्रायव्हिंगचे

शिक्षण दिले. स्वत:ला स्वयंपूर्ण करून घेण्याची संधी दिली. गाडी घेऊन जाताना मुलांना गावकऱ्यांना खूप नवल वाटत असे. कारण त्यावेळी ह्या गावातील मुली शिकत नव्हत्या. लग्न लवकर होत होती. मला वाटते इथेच माझ्या जीवनाची सुरुवात नकळतपणे निर्भया म्हणून झाली.

मार्च २००० साली प्रेमाताईंनी माझे लग्न लावून दिले खूप थाटामाटात सोहळा झाला. सर्व पाहून लग्न केले. सासरघरची सर्व माणसे चांगली होती पण, दुर्दैवाने हिऱ्याच्या खाणीतून कोळसा निघावा तसे झाले ते जास्त दिवस टिकू शकले नाही. पूर्ण व्यसनाधिन, कर्जबाजारी व खोटे बोलणे ह्या दुर्गुणाने परिपूर्ण व त्याच्या ह्या वागण्याने व समाजाच्या त्रासाने कंटाळून गेले होते.

त्या परिस्थितीत काहीही कठोर व अविचारी निर्णय घेतला गेला असता. ह्या प्रसंगी माझ्या आईवडिलांचे मोलाचे सहकार्य व धीर मला मिळाल्यामुळे व ज्या पद्धतीचे संस्कार निर्भयता व जगाकडे पाहाण्याची विशाल दृष्टी. आईने दिल्यामुळे ह्या खडतर पायऱ्या स्वाभिमानाने चढत चढत निर्भया झाले.

या नंतरचा प्रवास सौ. मेधा ताई बरोबर सुरू झाला. ह्या प्रवासातही खूप काही शिकायला मिळाले. चांगल्या व कठीण दोन्ही परिस्थितीत मार्ग कसा काढायचा हे त्यांच्याकडून शिकायला मिळाले. शिरवळ शिंदेवाडी येथे ग्रामीण महिलांसाठी निवासी पॉलिटेक्निक काढावे असे प्रेमाताईंचे स्वप्न होते ते काही कारणाने पुढे शक्य होऊ शकले नाही. म्हणून मग शिखळ प्रोजेक्ट मध्ये स्वत: मेधा ताईंना लक्ष घालावे लागले.

अन्नपूर्णा मंडळाचे जहाज चालविण्यासाठी मेधा ताईना लक्ष घालावे लागले. नाईलाजास्तव हा प्रोजेक्ट बंद करावा लागला. त्यावेळी ही सर्व कामे करताना त्यांना झालेला मानसिक त्रास मी जवळून पाहिला आहे. त्यांच्यामधील कणखरपणा व संस्था वाचविण्यासाठी धडपड ही त्यांच्या बद्दलचा आदर वाढवून गेली.

शिरवळ प्रोजेक्ट बंद झाल्यावर मुंबईत नोकरी करून स्थिर स्थावर होण्याचा प्रस्ताव मेघाताईंनी मला दिला. अन्नपूर्णाच्या दादर येथील क्रेडीट सोसायटीमध्ये 'सिस्टीम मॅनेजर' म्हणून नेमणूक केली. लहान मुलगा आई व आजारी वडील यांना शिरवळला ठेवून मी एकटी मुंबईला नोकरी करू लागले. उत्पन्नाचे ते एक मुख्य साधन असल्यामुळे मला ही तडजोड करणे भाग होते.

शनिवारी मुंबई येथून निघून शिरवळला रात्री उशिरा घरी पोहचत असे तसेच सोमवारी पहाटे शिरवळ येथून निघून मुंबईला पोहचत होते असा प्रवास सुरू झाला. मुलाला वेळ देतायेत नाही, त्याचे बालपण अनुभवता येत नाही, वडिलांची सेवा करता येत नाही ही खंत मनाला टोचत होती. या ओढताणीकडे मेधा ताईनी अतिशय संवेदनशीलतेने पाहिले व निर्णय घेत मला मुंबईवरून पुण्याच्या कार्यालयात बदली करून घेतले.

पुण्यात असताना मी मेधाताईच्या केबीनसमोर बसून काम करू लागले. ह्या काळात ताईंच्या कामाची पद्धत जवळून बघण्याची संधी मला मिळाली प्रसंगी रागावून समजावून प्रेमाने अनेक हिरे ह्या अन्नपूर्णात निर्माण केले. दिवसाचे १२/१५ तास न थकता काम करण्याची त्यांची क्षमता, दिवसातला एकही क्षण वाया जाऊ नये म्हणून त्यांची असणारी धडपड, कामाचा उरक व कोणीही आले तरी त्याची विचारपूस करणे प्रत्येक स्टाफच्या घरच्यांची प्रेमाने विचारपूस करणे हे त्यांचे मोहक रूप व धडपड पाहून मी थक्कच नाहीतर भारावून जात होते. जीवनात त्यांचाच आदर्श मला बळ देत आहे.

पुण्यात काम करताना शिरवळहून येजा करण्यासाठी त्यांनी मला त्यांची गाडी दिली. आपल्या स्टाफला त्रास होऊ नये याची त्या खूप काळजी घेत. पेट्रोलचा खर्च वाढत होता. त्यांनी मीटिंगमध्ये गाडी गॅसवर करण्याचा प्रस्ताव मांडला त्यावर श्री बलवीर सर म्हणाले, गॅस नक्की स्वस्त पडेल पण तुमचा स्टाफ रोज बॉम्बवर बसून प्रवास करणार आहे. हे ऐकल्यावर लगेच प्रस्ताव मागे घेतला. प्रत्येक स्टाफची त्यांना खूप काळजी असते हे सिद्ध झाले.

२०११ साली शिरवळमध्ये राहून अन्नपूर्णा कॅन्टीन व्यवसाय स्वतंत्रपणे चालविण्याचा निर्णय मी घेतला व मेधाताईनी ह्या गोष्टीला परवानगी दिली.

आपल्या मुलाला उभे करून जशी आई मुलाला स्वतंत्र जगण्याची शिकवण देते. तसे मेधाताईनी मला ह्या व्यवसायात उभे केले. माझ्या प्रत्येक प्रसंगात त्या माझ्या पाठीशी सावलीसारख्या उभ्या राहून मार्गदर्शक झाल्या. माझ्या व्यवसायाला अन्नपूर्णाचे नाव देऊन तोच विश्वास त्यांनी कंपन्यांना दिला. जवळपास सर्व कंपन्यामध्ये कॅन्टीन सुविधा आम्ही पुरवितो. सर्व कर्मचारी जेवणाची तारीफ करतात. सध्या माझ्याकडे २० स्टाफ आहे. त्यांच्या सहकार्याने ६००/७०० लोकांचे जेवण तयार होते. त्यात माझ्यासोबत असणारा माझा स्टाफ खूप मोलाचा वाटतो. थोड्याच दिवसात अन्नपूर्णा फॅसिलीटी मॅनेजमेंट सर्व्हिसेस ही उद्योग समूहामध्ये जेवण व नास्ता पुरविणारी उत्कृष्ट कंपनी म्हणून प्रसिद्ध झाली.

हे काम करत असताना गावातील बऱ्याच महिला काम मागण्यासाठी माझ्याकडे येत होत्या. त्या सर्वांना कॅन्टीनमध्ये काम देणे शक्य नव्हते. तेव्हा मेधाताईनी अजून एक संधी मला उपलब्ध करून दिली, वाईच्या मे गरवारे ब्रेस्ट्रीच ह्या कंपनीचे पॅकींगचे काम त्यांनी मिळवून दिले. गावातील ५० महिलांना घेऊन गेली सहा वर्षे यशस्वीरित्या हे काम पार पाडत आहोत. केअर टेकर्स इंडस्ट्रीयल सर्व्हिसेसला गेली चार वर्षे सतत 'उत्कृष्ट वेंडर' हा पुरस्कार मिळतो आहे.

सध्या सोबत काम करताना ह्या महिला त्यांच्या अनेक समस्या माझ्याकडे सांगतात. ''तुम्ही कोणावर अन्याय करू नका आणि कुणी केलेला सहन करू नका'' असे माझे नेहमी सांगणे असते. त्या महिलांच्या जीवनात कामामुळे घडलेला आनंदही त्या सांगत असतात.

वार्षिक सहल, कौटुंबिक स्नेह संमेलन, दहावी-बारावीत यशस्वी मुलांचा कौतुक सोहळा अशा माध्यमातून आम्ही नेहमी एकमेकांच्या आनंदात सहभागी होतो. संक्रातीचे हळदी-कुंकू, मुलींच्या लग्नाचे गडगणेर असे आनंदाचे सर्व प्रसंग सर्वांसाठी करून आम्ही सर्वच एकाच कुटुंबातील आहोत हा विश्वास त्यांना मिळतो. आज माझ्या कुटूंबात ७० जणी आहेत. त्यांच्या साथीने सहकार्याने मी हा प्रवास करते आहे.

माझा मुलगा सोहम नाशिकला भोसला मिलीट्री स्कूलमध्ये १२वीच्या वर्षात शिकत आहे. एनडीए पास होऊन 'हवाई दलात' जाऊन देशाची सेवा करण्याची त्याची इच्छा मला यशस्वी आई असल्याची ग्वाही देते. ह्या प्रवासात मुख्य आधार असलेली माझी आई मला अजूनही खंबीरपणे साथ देते आहे.

माझ्या बाबाचे २०१६ मध्ये निधन झाले. पण बाबाच्या वाढदिवसालाच म्हणजे १० फेब्रुवारीला मला निर्भया पुरस्कार मिळाला हा योगायोग आहे की मला मिळालेला आशिर्वाद आहे हे सांगताना खूप आनंद होतो. आयुष्यात श्रीमंत असण्यापेक्षा समाधानी असणे जास्त महत्त्वाचे व मी माझ्या ह्या संसारात खूप समाधानी आहे. एका क्षणी माझ्याकडे जगण्यासाठी काही नव्हते, आज माझ्याकडे देवाने आणि अन्नपूर्णा संस्थेने दिलेले खूप काही आहे. समाजाचे आपण काही देणे लागतो ह्या न्यायाने मी समाजात गरीब व गरजू महिलांना सबळ बनविण्यासाठी माझे उर्वरित आयुष्य खर्ची घालण्याचे ठरविले आहे.

माझे मनोगत लिहिताना एकच सांगणे आहे की परिस्थितीने खचून जाऊ नका. स्वत:वर विश्वास ठेवा. आजच्या अंधारात गेलेला सूर्य उद्या जास्त प्रकाशित होऊन येणार आहे. स्वप्न बघा व ती पूर्ण करण्यासाठी प्रयत्नाची कास धरा. आजच्या अंधारात उद्याची प्रकाशमय सफलता तुमची वाट यशस्वी करणार आहे.

❐

# कविता

## कवी असण्याची गोष्ट

आपण कवी आहोत ही गोष्ट भयप्रद वाटू लागलीय
आपण जिवंत आहोत ही गोष्ट जाहीर करायची
का लपवायची हेही समजेनासं झालंय
रस्त्यावरून चालणं चांगलं
की ट्रेननं बसनं वारूळ होत बसणं चांगलं
हेही ठरवता येत नाहीय
आपण विकासाच्या बाजूनं चाललो आहोत
तर हेल्मेट आवश्यक आहे का
ते पण विचारता येत नाहीय
आपण मातृभाषेत लिहायचं की
हिब्रूमध्ये लिहिलं तरी चालेल
घरी नक्की किती वाजता जायचं
न् भाजी घेताना पॅनकार्ड दाखवायचं
का आधार हे पण ठाऊक नाहीय
घरी कुणाचे फोटो लावायचे
मुलं किती न् कधी जन्माला घालायची
पुस्तकं कुठली वाचायची
आणि नेमकं किती न् काय खायचं
याचा जीआर अजून निघालाच नाही
शब्द लपवून ठेवावेत अशी जागा
घरात नाही न् मेंदूतही
कवितांना कसलंच भय वाटत नसावं
पाहा कशा नंग्या तलवारी घेऊन हिंडतायत
मेंदूच्या गल्ल्यांमधून

**मलिका अमर शेख, मुंबई**

❐

# लक्ष्मी नारायण
# सहसंस्थापक स्वच्छ
# प्रेरणादायी प्रवास

■ **वृषाली मगदूम**

१) लक्ष्मी कचरावेचक महिलांसाठी काम करण्यामागची प्रेरणा काय? हे काम का करावेसे वाटले तथा कामाची सुरूवात कशी केलीत.

१९८९ साली मी समाजकार्याचे पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले व मुंबईतून पुण्यात माझ्या घरी परत आले. पुणे विद्यापीठाच्या प्रौढ शिक्षण विभागात माझ्यासाठी एक नोकरी चालून आली व ती मी घेतली या नोकरीमध्ये मला फक्त प्रोढांना शिकवायचे नव्हते. तर त्यांच्यात इतरही कौशल्यविकसीत करायची होती या नोकरीत मला गरीब लोकांसाठी उत्पन्न निर्मिती असे उपक्रम घ्यायचे होते मग मी शिक्षण क्लास सारखे प्रशिक्षण वर्ग तळागाळातील महिलासाठी सुरू केले पण काही दिवसातच माझ्या असे लक्षात आले की दिवसांतच माझ्या असे लक्षात आले की, शहरी वस्तीतील लोकांना उदरनिर्वाहासाठी नोकरी करणे हे प्राध्यान्यकम असतो. त्यामुळे अशा प्रकारचे प्रशिक्षण हा काही उपाय नाही.

२) मग दुसरा पर्याय कसा व काय काढलात

गरीबातल्या गरीब व्यक्तीपर्यंत पोचायचे हे ठरले होते. पण त्यांच्यापर्यंत तुम्ही सहज पोहचू शकत नाही. कारण ते उदरनिर्वाहासाठी सतत बाहेर असतात. आमच्या कार्यक्रम त्यांना पूर्ण वेळ पुरेसे उत्पन्न देऊ शकत नव्हता अनौपचारिक व अनियमित अशा कामात ते गुंतले होते. गरिबातल्या गरिबापर्यंत कसे पोचायचे हा विचार चालू असताना आम्हाला कचरा वेचणारी काही मुले भेटली त्यांना शिकायचे होते. मग आम्ही त्यांच्यासाठी साक्षरता वर्ग चालू केले ही मुले भराभर प्रगती करत होती पण कचरा वेचायच्या कष्टाच्या कामानंतर त्यांना अभ्यास करताना झोप यायची. त्यांच्या समस्या समजून घ्यायला आम्ही त्यांच्याबरोबर कचरा वेचायला जायचो कचरा वेचणे व वेगळा करणे यातला वेळ वाचविण्यासाठी आम्ही वेगवेगळ्या सोसायटीमधून त्यांना काम मिळवून द्यायचे ठरवले. पण सोसायटीमधून या मुलांना वेगळा कचरा मिळावा म्हणून प्रयत्न करताना या मुलांच्या आया पुढे आल्या व आम्हालाच कचरा द्या म्हणू लागल्या. मग आम्ही या मुलांची शाळेत नावे घालायला सुरुवात केली. संध्याकाळी शाळेत जाणाऱ्या या मुलांनाच दुसऱ्या वस्तीत घेऊन जायचो व इथल्या मुलांनाही शाळेत यावे म्हणून प्रयत्न करू लागलो.

३) कचरावेचक तुम्हाला कोठे भेटल्या. त्यांच्या कोणत्या समस्या प्रामुख्याने तुमच्या लक्षात आल्या.

१९७२ ला महाराष्ट्रात जेव्हा दुष्काळ पडला. तेव्हा यातील बऱ्याच जणी पुणे व मुंबई येथे आल्या. इतर काहीच काम न मिळाल्याने या कचरा वेचण्याच्या कामाला लागल्या. या साऱ्याच जणी दलित, मातंग, गोसावी, बंजारा समाजातील आहेत. कचरावेचक महिलांना भेटल्यानंतर ह्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी आम्हीही त्यांच्याबरोबर कचरा वेचायला त्यांच्याबरोबर जाऊ लागलो. बोट क्लब, कल्याणीनगर या झोपडपट्टीत जात होतो. सुरुवातीला एकशेपन्नास महिला बरोबर काम सुरू केले. कचरा कोणीही घेऊ शकतो. कचरावेचक महिलेच्या कचऱ्यावर अधिकार नाही. पोलीस व इतर समाजातील घटकांपासून महिलांना त्रास व्हायचा. वस्तीमध्ये जाऊन आम्ही संध्याकाळी महिलांना भेटायचो. त्यांच्या समस्या जाणून घ्यायचो. पौर्णिमा चिकरमाने, मोहन ननावरे हे व इतर कार्यकर्ते काम करत होते. १९८९ सालची ही गोष्ट आहे. सुरुवातीला

आठवड्याला वस्तीत जायचो. १९९० ला कचरावेचकांची एक परिषद पुण्यात भरवली. १९९३ ला कागद काच पत्रा, कणाकरी पंचायत या नावाने संस्था रजिस्टर केली व कचरावेचक महिलांसाठी काम सुरू केले.

४) सुरुवातीला कामाचे स्वरूप काय होते. कचरावेचक महिलांसाठी काय काम सुरू केले.

बाबा आढाव यांचा या कामात मोलाचा सल्ला मिळत होता. सुरवातीला महिलांचे बचत गट केले. १९९७ ला ८० बचत गट बांधले. कात्रज, पिंपरी, चिंचवड या भागांत काम सुरू केले. वस्तीतील महिलांमधील नेतृत्व गुण शोधून ह्यांच्यातलचे लिडर बनवले. महिला सुरक्षा, बालमजुरी, घनकचरा व्यवस्थापन, पोलीस यंत्रणा अशा विविध विषयांवर प्रशिक्षणही आयोजित केले. महिलांना कचरा मिळतो. पण काटेवाल्यांकडून शोषण होते, हे लक्षात आले. काटेवाले त्यांचा माल खूप काही किमतीत घेतात. त्यामुळेच महिलांना काटेवाला करायचे ठरवले. १९९८ ला सहकारी तत्त्वावर पहिले भंगार दुकान सुरू केले. ५० ते ६० महिला हे दुकान चालवतात नफा वाटून घेतात. सुरुवातीला बचत गट बांधले, पण प्रत्येक गटात कर्जव्यवहार करणे, हिशोब ठेवणे खूप जिकीरीचे व वेळखाऊ वाटले. म्हणून १९९८ ला पतपेढी रजिस्टर केली. आता पतपेढीच्या ५००० महिला सभासद आहेत. दोनशे ते तीनशे रुपये महिन्याला जमा करतात. ७५००० रुपये पर्यंत कर्ज होतात. ३ कोटी कर्जापोटी बाहेर जातात. हे काम बघायला तीन रिकव्हरी ऑफिसर व दोन अकाऊंटंट आहेत.

५) तुमच्या संस्थेने पुण्यामध्ये महापालिकेबरोबर कचरावेचकांना सर्वात जास्त जोडून घेतले आहे असे म्हटले जाते. महापालिकेशी या महिलांना कसे जोडून घेतलेय. महापालिकेच्या माध्यमातून काय काम चालू आहेत.

१९९६ पासून महानगरपालिकेशी अनेक मागण्यांसाठी भेटणे. पत्रव्यवहार करणे. बोलणी चालू होती. या महिलांना महापालिकेने ओळखपत्र दिली तर त्यांच्या कामाला ओळख मिळेल व त्यांनाही सोसायटीतून काम करणे सोपे होईल. असा विचार केला. १९९६ साली पुणे महापालिकेने ओळखपत्रे देण्यास मान्यता दिली. या महिला दारोदारी जाऊन कचरा वेचायच्या, पण कचऱ्यावर त्यांचा अधिकार नव्हता. मग मी या साऱ्यांचा अभ्यास व संशोधन सुरू केले. महापालिका घनकचरा व्यवस्थापनावर किती पैसा खर्च करते याचाही अभ्यास सुरू केला. २००० साली वर्तन समितीचे नियम आले. या नियमानुसार कचरावेचक महिलांना कचरा प्रत्येक घराच्या दाराशी मिळाला पाहिजे. स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने हे काम झाले पाहिजे असेही या नियमात म्हटले होते. २००० साली या महिलांचा आरोग्य विमा उतरवला गेला. महापालिका या महिलांचा विमा हप्ता भरते. दरवर्षी नवीन महिलांचा प्रस्ताव मंजूर करावा लागतो. आज २०२० रोजी या विमा पॉलिशीत पाच हजार महिलांचा समावेश आहे.

६) कागद काच पत्रा कष्टकरी पंचायत असे सुरूवातीचे नाव होते. तुमचे आजचे काम स्वच्छ संस्था या नावाने ओळखले जाते हा बदल का केला.

हो सुरुवाताला १९९३ साली कागद काच पत्रा कणाकरी पंचायत या नावाने संस्थेचे काम सुरू झाले. महिलांना कचरा मिळत नव्हता. याचे उदरनिर्वाहाचे साधन असलेला कचरा मिळत नसेल तर काय उपयोग असे वाटले, मग पुणे महापालिका कमिशनरना पत्र देऊन महिलांना घरटी कचरा मिळावा यासाठी प्रयत्न सुरू केले. यासाठी मंजुरी मिळाली. सुरुवातीला १०० ते दीडशे महिलांना काम मिळाले. या महिला सकाळी ७ ते १२ काम करू लागल्या. त्यांना घरटी १० ते २० रुपये महिना मिळायचे. त्या ओला व सुका कचरा वेगळा द्यायच्या. ओला कचरा महापालिकेला घ्यायचा. सुका कचरा बोडमध्ये नेऊन दुपारच्या वेळात वर्गीकरण करायचे, असे सकाळी सात ते संध्याकाळपर्यंत महिला काम करू लागल्या. २०१२ मध्ये चार लाख घरांमधून महिला कचरा घेऊ लागल्याय. २० रुपये लागल्या. आज २०२० साली घरटी ७० रुपये मिळतात.

७) पैसे मिळण्यात अडचणी येतात का? कारण मध्यमवर्गीयांची मानसिकता असते. आज पैसे नाहीत उद्या ये, पुढील महिन्यात देते असे म्हणतात. पैसे मिळत नाहीत असे होते का?

हो, अडचणी तर येतात. महिलांना वारंवार सांगावे लागते. पैसे मागावे लागतात. काही वेळा गोड बोलून सांगावे लागते. शेवटचे शस्त्र म्हणजे उद्यापासून कचरा घेणार नाही. असेही म्हणावे लागते मग पैसे मिळतात.

८) महापालिका आणखी काय मदत करते. महापालिका युनिफॉर्म, रेनकोट, बकेट हातगाडी देते.

९) पण मग या गोष्टीतर वारंवार लागतात. नवीन काम सुरू झाले की नवीन वस्तू लागतात. त्या मागणे जिकिरीचे नाही होत का?

नाही होत. कारण आम्ही एक कॅलेंडर बनवले आहे. त्यानुसार मागणी करतो.

१०) या सर्व कामांचे आर्थिक गणित काय आहे. हे गणित कधी ढासळते का? महिलांशी कसे जोडले गेला आहात.

या कामासाठी शंभर स्टाफ नेमला आहे. महापालिका ग्रॅन्टमधून त्यांना मानधन मिळते. २००८ साली महापालिकेशी पाच वर्षांचा करार झाला. या सर्व कामांचे व महिलांचे को-ऑर्डिनेशन ठेवावे लागते. हिशेब ठेवणे. या कामाचे रेकॉर्ड, डेटा तयार करणे अशी अनेक कामे असतात. २०१६ मध्ये नवीन नियम आले. कचरावेचकांना कामात सामावून घेणे हे ठळकपणे सांगितले आहे. या नियमाच्या अंमलबजावणीसाठी धडपड करावी लागते. EPR कायदा आला.

उत्पादनकर्त्याची वाढीव जबाबदारी (Extended Producers Responsiblity) काय आहे हे समजून वेगवेगळ्या कंपन्यांबरोबर काम करण्यासाठी प्रयत्नशील आहोत. तू म्हणते तसे २०१४ ला आर्थिक गणीत ढासळले. २०१४ ला करार संपला. दोन वर्षे महापालिका करार झाला नाही. शंभरवरून दहा लोकच काम करू लागले. दोन वर्षे सतत आंदोलन केले. महापालिकेबरोबर पत्रव्यवहार केला. तेव्हा पैसे मिळाले. २०१६ साली परत पाच वर्षांचा करार झालाय. २००८ सालच्या करारामध्ये दरवर्षीच अनुदानात घट होती, पण आता अनुदानात दहा टक्के वाढ आहे.

१०) अजून कामात काय वाढ केलीत.

महिलांना सुका कचरा वेगळा करण्यासाठी जागा हवी असते आज सत्तर कचरा वर्गीकरण शेड बांधल्या आहेत. १०० लहान पिंजरे आहेत. ज्यामध्ये कचरा वेगळा ठेवला जातो. आज आठ लाख घरांतून १ हजार ८०० कचरावेचक कचरा घेत आहोत. हाऊसिंग सोसायटीमधून वेगवेगळ्या पातळ्यांवर काम करतो, गेटवर फक्त कचरा घेणे, सोसायटी पूर्ण काम घेणे नुसता कचरा घेणे वगैरे. नवीन सोसायटीत अडचणी येतात. पण सतत बोलून सोडवतो.

११) तुम्ही स्वत: आज काय काम करता.

अनेक पातळ्यावर काम करावे लागते. २००९ ते २०१३ पर्यंत मी संस्तेची जनरल सेक्रेटरी म्हणून काम करत होते. माझे महिन्याचे वेळापत्रक असते. कामाला चोवीस तासही कमी पडतात. संध्याकाळी वस्तीत मीटिंग होते. भंगारवाले, दुकानदार यापासून महिलांना त्रास होतो. त्यासाठी काम करावे लागते. कौटुंबिक समस्या आहेत. महिलांचे आरोग्य व रेशन यावरही काम चालू आहे. मुलांनी शिकले पाहिजे. लहान मुलांनी काम करू नये. यासाठी प्रयत्नशील असतो पन्नासेक मुलांना हॉस्टेलवर ठेवले आहे. कचरावेचक महिला ते तिचे कुटुंब व त्याचे कल्याण या उद्देशाने हा प्रवास चालू आहे. तीन दशकांचा हा प्रवास आहे. महिलांचे स्थित्यंतर झाले. नेतृत्वगुण आले हे समाधान आहे.

**(लक्ष्मी नारायण या कचरावेचक महिलांसाठी गेली तीन दशके काम करत आहेत. यापुढेही करत राहतील. त्यांच्या या सामाजिक प्रवासाची ही कहाणी.)**

❐

---

# कविता

## नॅनो युग

माझ्या कवितेतील विश्वातल्या
ई-संवेदनेनं पकडलाय नॅनो युगाचा वेग
मानवी मेंदूतील हार्डवर्कच्या साहाय्यानं
इलेक्ट्रॉनिक वस्तूंनी घेतलंय क्रांतिकारी वळण
तिने बनवलाय मल्टिमीडिया नॅनो संगणक,
नॅनो टीव्ही, रंग बदलणारे नॅनो फ्रिज,
नव्या ॲप दुनियेचा नॅनो स्मार्टफोन
आता घासणारच नाहीत शरीराचे बोन
माणूस झाला रोबोट आताशा
नव्या ॲप दुनियेनं
तो चालत्या, बोलत्या, असंख्य फिरत्या वस्तू
लीलया साकारू लागलाय,
ई-ऑफिस, ई-सिनेमा घर
ई-बिग बाजार, वाढला ई-शेजार
आताशा कागदावरून, तो ई-कागदावर आला
माणसाला हवंय आता इन्स्टंट जगणं
नुस्तं ई-संवेदनेनं वागणं
आता तो निव्वळ अडकलाय
रिलेशनशिपच्या ई-भानगडीत
हे नॅनो युगाच्या पाथरवटांनो!
जगताना समष्टीचं ठेवावं भान
ई-जगण्यात असावी संवेदनेची जाण
नाहीतर तुमच्या नि समग्र वंचितांच्या
जगण्यामध्ये पडून जाईल मूलभूत गॅप
व्यर्थ जातील श्रम शोधून नवीन ॲप.
हे ॲप दुनियेच्या शिल्पकारांनो!
स्मार्टफोनच्या बळावर,
तुम्ही बनवा अखंड मानवी झोन
सेफ ठेवून कष्टकरी शरीराचे बोन

**- अशोक इंगळे, अकोला**

❐

# एक आई म्हणून मला कसा समाज हवा आहे?

■ वासंती ताठे

आजकाल सोशल मीडियामुळे मदर्स डे, फादर्स डे, फॅमिली डे असे काही भन्नाट दिवस साजरे करण्याचं खूळ सध्या सगळ्यांच्याच डोक्यात भरलं आहे. अर्थात मीही त्याला अपवाद नाहीये, पण सगळ्यांनी आपलं स्टेटस अपडेट केलं की जरा उत्साह येतो आणि आपणही काही तरी करावं असं वाटायला लागतं. त्यातूनच मग आई-वडिलांबद्दल किती आणि काय काय लिहावं अगदी असं होतं. बरोबर ना? मला खात्री आहे हा लेख वाचणा-यांपैकी अनेकांच्या मनात असेच काही तरी विचार असतील. पण आपल्या मुलांनी पालक म्हणून आपल्या बद्दलच्या भावना एखाद्या विशिष्ट दिवशी व्यक्त कराव्यात ही कल्पना वजा अपेक्षा आपण बाळगत असू तर एक **'आई'** म्हणून समाजाकडूनही काही अपेक्षा ठेवता येतील का?

आपलं मूल इतर प्रत्येक मुलापेक्षा वेगळं असावं, प्रगतिशील असावं असं प्रत्येक पालकांना आणि विशेषत: आईला वाटत असतं. अभ्यासात पहिला नंबर घेणारं, विविध कलागुणांनी युक्त वगैरे वगैरे आणि मूल दहावी-बारावीत गेलं की मग काय विचारूच नये. मेरिटमध्येच यायला हवं म्हणून पहिल्या दिवसापासूनच उपदेशांचे डोस सुरूच. आता हे सगळं का तर माझं मूल या स्पर्धेमध्ये मागे पडले तर **'लोक काय म्हणतील'**या धडकीनेच अपेक्षांचं ओझं मुलांवर लादायचं. पण मुलांकडून अतिअपेक्षा करताना मुलाच्या अपेक्षा आपल्याकडून काय आहेत, समाजाकडून काय आहेत, त्यांना काय आवडेल, काय करायला जमेल याचा विचार किती पालक करतात? ज्या समाजात आपण वावरतो तो समाज म्हणजे मुलांसाठी एक **'पाठशाळा'** आहे असे समाजशास्त्र सांगते. मग मुलांसाठी शाळा निवडताना पालक जितके जागरूक असतात तितकीच जागरुकता समाजाप्रति असायला काय हरकत आहे. आपल्या आजूबाजूला जे लोक वावरतात मग आपले मित्र–मैत्रिणी, नातेवाईक, शेजारी या सर्व घटकांकडून मूल शिकत असते. किंबहुना आपले पालक या सर्व घटकांशी कसे वागतात ह्याचेही निरीक्षण मुले करतात आणि तशीच घडतात. त्यामुळे समाजातील या आणि तत्सम अनेक घटकांमध्ये विचारक्षम परिवर्तन व्हायला हवे आहे.

आपल्या समाजामध्ये आजही 'नकोशी' म्हणून जन्माला आलेल्या मुलीला नाहीसे करणारे पालक आहेत. मुलगी म्हणजे बापाच्या डोक्यावर लग्नाचं ओझं अशी मानसिकता आजही बाळगणारी अनेक कुटुंब आपल्या आजूबाजूला पाहायला मिळतील. ही मानसिकता बदलणे आवश्यक आहे. आंतरजातीय विवाह करण्याचे परिणाम थेट जिवावर बेतणारे आहेत हा धडा संबंधित पालकांनीच घालून दिला, अशी किती तरी उदाहरणे देता येतील समाजाच्या अनियंत्रित विचारांची आणि त्यातून होणाऱ्या वर्तनाची. अशा वर्तणुकीतून मुलांनी नेमका काय बोध घ्यावा? मग ज्या समाजासाठी आपण मुलांच्या मनाची कुचंबणा करतो तेव्हा अशी अघोरी कृत्य करताना कुठे जाते या समाजाचे सौजन्य?

याच्या आणखी थोडे पुढे जाऊन विचार करता, मुलांमध्ये सामाजिक प्रश्नांची जाण यायची असेल तर **'समाजभान'** हा

विचार मुलांच्या मनातही रुजवायला हवा आहे. सामाजिकतेचे बाळकडू मुलांना बालपणापासूनच मिळायला हवे आहेत. पण आजकालच्या चौकोनी कुटुंबामध्ये 'आपले आपण' ही भावना मुलांना लहानपणापासूनच समाजभान येऊ देत नाही. परिणामी समाजात किंवा आपल्या आजूबाजूला चालणाऱ्या अनेक घटक-घटनांपासून मुले वंचित राहतात. ही जबाबदारी समाजतील प्रत्येक घटकाची असल्याने मुलांमध्ये कौटुंबिक एकोप्याची जाणीव वाढीस लागल्यास समाजभान आपोआपच येईल. याचे उत्तम उदाहरण म्हणजे पूर्वीच्या काळी अतिशय प्रख्यात असणारी एकत्र कुटुंब पद्धती होय. दहापासून ते अगदी पन्नास जणांचं एकत्र कुटुंब ही त्या कुटुंबात वाढणाऱ्या मुलांसाठी एक **'सामजिक शाळा'**च होतीच. एकमेकांची काळजी वजा जबाबदारी घेणे, प्रत्यकाने कामं वाटून घेणं, वृद्ध-आजाऱ्यांची सेवा करणे, सामाईक आर्थिक व्यवहार, सामाईक व्यवसाय अशा किती तरी गोष्टी मुलांना वेगळ्या शिकवण्याची गरजच नव्हती. सर्वसाधारणपणे १९व्या शतकात जी पिढी घडून गेली तिथपर्यंतच सामाजिक सामिलकी हि संकल्पना अस्तित्वात होती. २०व्या शतकाच्या सुरूवातीपासूनच हि सामिल की शहरीकरण, औद्योगिकरण आणि तंत्रज्ञानाच्या विळख्यात हरवून गेली. पैसा हा, माणूस आणि नात्यांपेक्षा मोठा झाला. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आपण मोठी मजल मारली पण संस्कारक्षम पिढी घडवण्यात मात्र अविकसित राहिलो. मोबाईल, टीव्ही, इंटरनेटमधून अपरिमित माहिती उपलब्ध झाली पण खऱ्या अर्थाने ज्ञानार्जन होईल अशा शाळा आणि असे थोर शिक्षक मिळणे दुर्मीळ झाले. ही आणि अशी अनेक उदाहरणं देता येतील मुलांमध्ये रुजणाऱ्या माणुसकीच्या अभावाची. या सगळ्यांचा मेळ साधायचा असेल तांत्रिक साधनांनी जवळ असलेले नातेसंबंध 'अ-भावनिक' आहेत हे मुलांना पटवून द्यावे लागेल. ही सर्व तांत्रिक माध्यमे ही भौतिक प्रगतीची साधने असून ते अंतिम साध्य नाही याची जाण मुलांना असणे आवश्यक आहे आणि यामध्ये पालकांचा सहभाग हा अत्यंत महत्त्वाचा ठरतो. आजच्या स्पर्धेच्या युगात मुलांवर अभ्यासाचा अपरिमित ताण असून पुस्तकी ज्ञानातून मिळणाऱ्या गुणांकांच्या आधारावर पालक मुलांचे भवितव्य ठरवितात. यामध्ये मुलांमधील सुप्त गुणांना वाव देणाऱ्या संधी उपलब्ध नसल्याने कमी गुण मिळणे ही बाब मुलांना बरेचदा नैराश्याकडे घेऊन जाते. अर्थात ही बाब कुटुंबाच्या तथाकथित प्रतिष्ठेला गालबोट लावणारी असल्याने मुलांवरचा दबाव आणखीनच वाढवला जातो. अर्थात काही पालक याला अपवाद असतीलही, पण उर्वरित पालकांनी मात्र अल्बर्ट आईनस्टाईन, सचिन तेंडुलकर, आमीर खान, बॉक्सिंगवुमन मेरी कोम या आणि अशा कितीतरी यशस्वी व्यक्तिमत्त्वाची उदाहरणे विचारात घ्यावीत जे आपल्या शालेय जीवनात प्रगती करू शकले नाहीत. पण आपापल्या क्षेत्रात मात्र कमालीचे यशस्वी झाले आणि नुसतेच यशस्वी नाही तर आपल्या व्यक्तिमत्त्वाची छाप संपूर्ण जगावर पाडण्यातही यशस्वी झाले. पालकांनी मुलांचे हे अंगभूत गुण जर वेळीच ओळखले आणि त्यांना योग्य विचारांचे खतपाणी देत स्वत:ला सिद्ध करण्याच्या संधी उपलब्ध करून दिल्या तर आपल्या देशाचे भवितव्य घडवणारी एक पिढी ही **'क्रियाशील'** पिढी म्हणून नक्कीच पुढे येऊ शकेल. या सगळ्यांचा मेळ साधायचा असेल तर **'मूल्याधारित आणि कृती शिक्षणाची'** पद्धतींचा अवलंबली गेली पाहिजे. याकरिता मूल्यशिक्षण आणि इतर विषय हे पुस्तकी न राहता कृतीवर आधारित असणे आवश्यक आहे. शाळेच्या रेकॉर्डवर मुलांना जात धर्माचा उल्लेख करायला लावणारी शिक्षण व्यवस्था जाऊन बाबासाहेबांनी आपल्या देशाला दिलेल्या **संविधानाचा मतीतार्थ** सांगणारी शिक्षणपद्धती उदयास आली तर आरक्षण मुद्दा पुसला जाऊन प्रत्येक कामासाठी पात्र उमेदवार तयार होतील.

एक आई म्हणून समाजाकडून असणाऱ्या अपेक्षाची यादी न संपणारी असली तरी पालक म्हणूनही मुलांच्या प्रति असणारी जबाबदारी आणि कर्तव्ये आपल्याला नाकारता येणार नाहीत. मुलांच्या प्रती पालकांच्या अपेक्षा काय आहेत हे पाहत असताना मुलांना काय हवे आहे आणि त्यांच्या काय अपेक्षा आहेत हेही तितकेच महत्त्वाचे आहे. मुलांनी स्वतःच्या मनात रेखाटलेली पालकांची प्रतिमा जेव्हा प्रत्येक पालकाला स्पष्ट दिसेल तेव्हा खऱ्या अर्थाने आपल्या मुलांसमोर एक आदर्श समाज असेल.

शेवटी काय............... कुटुंब हीच मुलांची पहिली शाळा आणि पालक हेच त्यांचे पहिले **'आदर्श शिक्षक'!!**

पर्वती स्वयंविकास सह. संस्था. मर्या. पुणे.

❒

# घर

■ **मालती भादळे**

१ फेब्रुवारीच्या मोठ्या मीटिंगमध्ये भाषण करताना मेघाताईंनी अन्नपूर्णाच्या ज्या सभासदांना स्वत:चं घर नाही त्यांच्या घराचा विषय घेतला आणि माझं विचारचक्र चालू झालं. एका विवाहितेला तिचं हक्काचं घर हा किती जिव्हाळ्याचा विषय असतो ते मनात विचार घोळायला लागले. कारण आपल्या धर्मानं लेकीला नेहमीच परक्याचं धन मानलं. माहेरचं घर तिचं हक्काचं नसते. तो हक्क सासरच्या घरावर.

आणि इथूनच सगळी सुरुवात झाली. सासरी आपलं घर उभारण्यासाठी एक बाई ध्यास घेते. तिला तिच्या दोन मुलांना नवऱ्याला एक छान निवारा हवा असतो. तिला दागिने चांगल्या साड्या, हिडणं, फिरणं काही नको असतं. तिचा ध्यास एकच असतो. तिच स्वत:च घर, कालांतरणं ते होतंही मुलांची लग्न होतात सुरुवाती सुरवातीला सारं काही ठिक चाललं असतं. नंतर समज गैरसमज होऊन, दोन्ही मुलं वेगळी होतात. सुनांचं किचन सजतं. त्याबद्दल त्यांना दोष देणंही योग्य नाही. बदल सृष्टीचा नियमच आहे. बदलावं तर लागणारच. तो वादच नाही, पण यात जिनं त्या घरासाठी ध्यास घेतला होता त्या स्त्रीची काय फरफट होत असते ते तिनं कुणाला सांगावं. मेघाताईंनी कमी खर्चात परवडेल अशा घरांचा विचार मांडला तेव्हा त्या विस्कटलेल्या एका उभ्या केलेल्या तिच्या घराचं तिनं काय करावं. हे काही तिला कळतच नाही.

अशा असंख्य महिला आज समाजात वावरताना आपण पाहतो. आयुष्याची तीस-चाळीस वर्ष कष्ट घेऊन उभं राहिलेलं तिचं घर जेव्हा तिचं राहातच नाही तेव्हा तिनं काय करावं?

मेघाताई, तुमच्याकडं पाहिल्यावर एक मोठी बहीण मिळाल्याचा भास झाला तेव्हा हा या लेखाचा प्रपंच करायचं धाडस केलं.

❐



# विनम्र अभिवादन

**स्त्रीवादाच्या भाष्यकार, 'मिळून साऱ्या जणी'**च्या संपादक आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या **विद्या बाळ** यांचं दीर्घ आजारानं दि. ३० जानेवारी २०२० रोजी द:खद निधन झालं. त्या ८४ वर्षांच्या होत्या.

अन्नपूर्णा परिवाराशी त्यांचे जिव्हाळ्यांचे संबंध होते. अन्नपूर्णा परिवारातर्फे त्यांना विनम्र अभिवादन..

# विज्ञान निर्भयता नीती
# स्त्रिया आणि अंधश्रद्धा

■ दीक्षा इंद्रसेन गोरे, ब्रॅच १५ पिंपरी BM

आपल्या समाजामध्ये आजही स्त्रियांमध्ये जास्त अंधश्रद्धा आहेत त्या त्यांच्या बळी आहेत आणि वाहककही आहेत. त्यांना मानसिक गुलामीमुळे अंधश्रद्धेतून होणारे शोषण हे कधी जाणवतच नाही. पुरषप्रधान कुटुंब व्यवस्था समाजात समान संधीचा अभाव, धर्माने कित्येक दुय्यमत्व यामुळे स्त्री अगतिक बनले व अंधश्रद्धेला बळी पडले. स्त्रीचे शारीरिक व मानसिक अनारोग्यही तिला अंधश्रद्धेला बळी पडण्यास भाग पाडले. त्यातुनच बाईच्या अंगात येणे, तिने भानामतीचे एजंट बनणे असे प्रकार घडतात. रूढी परंपरा स्त्रियांना अंधश्रद्धेत अडकवतात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समिती गेली ३० वर्षे समाजातील अंधश्रद्धा नाहीशा करण्यासाठी अनेक मार्गाने प्रयत्नशील आहे. कामाच्या ओघात असे रीतीने स्त्रीचे शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले नसणे, तिच्या अंधश्रद्धा असण्यास कारणीभुत आहे. स्त्रीच्या अंधश्रद्धेचे तिसरे कारण आहे. आपल्या रूढी - परंपरा १५० वर्षापूवी स्त्रिया शिकत नव्हत्या, पोथी, पुराणे, कथा, कीर्तन यांच्यात तिला आधार होता, त्यात सांगितलेली, व्रतवैकल्ये, कर्मकांड ती इमानेइतबारे करत आली. त्याची चिकित्सा करण्याची तिला मुभाच नव्हती. तसे तिने केले असेल तर तिला लक्षात आले असते की यामध्ये किती अंधश्रद्धा आहेत आणि त्याच्या पालनामध्ये तिला गौणत्व देऊन डांबून ठेवण्याचा कसा डाव आहे. ते आपण दोन व्रत तपासून पाहा. प्रत्येक सुहासिनी लग्नानंतर पतीला दीर्घायुष्य लाभावे (अखंड सौभाग्यवती) म्हणजेच आपण नवऱ्याचे आयुष्य वाढावे म्हणून मंगळागौरीचे व्रत करते तीच स्त्री सातजन्मी हाच पती मिळावा.

वटपौर्णिमेचे व्रत करते पती हा पत्नीपेक्षा वयाने मोठा असतो पुढच्या जन्मातही तो मोठा हवा म्हणजे  जन्मायला पण हवा ना. त्यासाठी तो या जन्मात आधी मरायला पण हवा म्हणजे स्त्रिया मंगळागौर पण पुजते. नवरा आपल्यानंतर मरावा. म्हणून आणि वटपौर्णिमाही करते. नवरा आपल्या आधी मरावा म्हणून म्हणजे हे सारे डोळे झाकून पुर्वज सांगतात म्हणून हीच स्त्री अंधश्रद्धा जोपासणे म्हणून स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणत कि हरितालिकेपासून वटपौर्णिमेपर्यंत सर्व व्रतवैकल्यही असल्याची पूजा आहे. सतीप्रथा देवदासीप्रथा अशा अन्यायावर आधारीत रुढी परंपरा ती आचरत असते.

या अंधश्रद्धांच्या जोखडातून स्त्रियांना बाहेर उठायचं असेल तर त्यांना शिक्षण दिल्याने ते साध्य होईल असे वाटले होते; पण तसे झाले नाही. आपल्याकडे अजूनही भूगोलाची शिक्षिका चंद्र-सूर्याची ग्रहण का लागतात हे मुलांना सप्रयोग शिकवले. त्यांना सांगले चंद्र-सूर्याची ग्रहणे म्हणत राहू केतू यांना मिळत नाहीत तर हा सावळ्यांचा खेळ आहे. पण प्रत्यक्षात ग्रहणाच्या दिवशी ग्रहणानंतर शिजविलेले अन्न, पाणी टाकून देते दान करते म्हणजे तिला जे शिक्षण मिळाले ते पुस्तकी परीक्षार्थी होते. विचार करायला लावणारे नव्हते आणि म्हणून तो वैज्ञानिक दृष्टिकोनात प्रत्येक घटनेची चिकित्सा न करता ती स्वीकारते. म्हणून स्त्रियांच्या अंधश्रद्धा नष्ट करण्यासाठी वरील कारणांचे निराकरण केले पाहिजे. त्याचा कृती कार्यक्रम म्हणजेच 'महिला अंधश्रद्धा  निर्मूलन' जाहीरनामा  'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने' तयार केला आहे. तो असा १) स्त्रियांना साक्षर करणे, स्वत:च्या शिक्षणाचा आग्रह धरला पाहिजे व दुसऱ्या स्त्रीच्या, मुलीच्या शिक्षणाला मदत केली पाहिजे, याचबरोबर स्वतंत्र विचार करायला शिकविले पाहिजे. म्हणजेच वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासायला हवा ज्या योग्य ती परंपरा, व्रतवैकल्ये यांची व इतरही बाबींची चिकित्सा उद्रेक योग्य असेल ते स्वीकारून अयोग्य नाकारण्याचा धीटपणा दाखवले. २) स्त्री-पुरुष असमानता दूर करण्यासाठी तिने स्वत:ला हीन लेखणे सोडून द्यायला हवे. मी पुरुषांपेक्षा बुद्धीने किंवा ताकदीने कुठेही उभी नाही. हा आत्मविश्वास बाळगून स्वत:च्या विकास करत घ्यावा. ३) बुवाबाजी, भानामती, चेटूक शकुन-अपशकुन, अंगात येणे, मुलाने झपाटणे या स्वरूपाच्या अंधश्रद्धांना थेट व स्पष्टपणे विरोध करावा, दुसऱ्याला शरण न जाता स्त्रीने

त्याला सामोरे जावे, दु :ख पेलण्याची ताकद वाढविली तर खोटे आधार (अंधश्रद्धा) शोधण्याची तिला गरज राहणार नाही.

सर्वेनंतर असे आढळून आले की, समाजाने पुरुषापेक्षा स्त्रियांमध्ये अंधश्रद्धा जास्त आहेत. उदा. लग्नानंतर बरीच वर्षे मूल झाले नाहीत? त्याच दु:ख पती-पत्नी दोघांनाही असलं, पण मूल घेण्यासाठी नवससायास उपासतापास कोण करेल? पत्नीच ना? नवसानी मुलं होत नाहीत. हे तर ३५० वर्षापूर्वी संत तुकारामांनी सागितलं होतं. 'नवस सायास पुत्र होती, तो का करणे लागे पती?' म्हणजे अंधश्रद्धाळू कोण स्त्रीच ना? मंगळागौर, वटपौर्णिमा व वैभवलक्ष्मी अशी व्रतवैकल्ये करणाऱ्या जास्ती स्त्रियाच आहेत, एकीकडे कल्पना चावलासारख्या महिला विज्ञानाच्या जोरावर चंद्रावर जाऊन येतात. तर आपल्या समाजात अजूनही काही आशा आहेत ज्या केवळ अंधश्रद्धेमुळे मागे पडल्या आहेत. महिला इतकेच नव्हे तर त्या अंधश्रद्धेच्या बळी आहेत. मरताना मुलाने तोंडात पाणी घातले की स्वर्ग प्राप्त होतो या अंधश्रद्धेपायी मुलगा जन्माला येण्याची वाट पाहिली जाते. तोपर्यंत जन्माला येणाऱ्या मुलींना पोसायचे कसे? म्हणून नवजात मुलींना गंगार्पण करणं अशा अघोरी मार्गाने मारून टाकले जाते. ग्रामीण प्रथा, देवदासी प्रथा यामध्येही स्त्रियांचा बळी जातो आहे. इतके झाले तरी स्त्रिया याविरुद्ध पेटून उठत नाहीत कारण त्यांना या अंधश्रद्धा वाटतच नाहीत, उलट जगण्याला आवश्यक आधार देण्याचा श्रद्धा आहेत. असा त्यांचा समज आहे. यामुळेच या अंधश्रद्धा आईकडून मुलीकडे, सासूकडून सुनेकडे प्रवाहित होतात. अशा स्त्रिया अंधश्रद्धांच्या वाहकही आहेत. मग स्त्रिया **नासते** अंधश्रद्धा असण्याची कारणे काय? आपल्याला माहीत आहे, की अति दु:खाने माणूस निराश होतो, वारंवार आलेल्या संकटाने खचून जातो. अपयश वैफल्य संकटातून सुटण्यासाठी तो आधार शोधायला लागतो व नेमका अंधश्रद्धांचा आधार घेतो. स्त्रियांचे दु:ख अपयश वैफल्य अधिक म्हणून स्त्रियांमधील अंधश्रद्धा दूर करायची असेल तर तिच्या अगतिकतेची कारणे शोधून ती दूर करायला हवी. स्त्रिया अगतिक होण्याचे मुख्य कारण म्हणजे त्यांचे कुटुंब, समाज व धर्मातील दुय्यम स्थान, स्त्री जन्मापासून नकोशी आहे. ती जन्माला आली तरी लग्न असे होईल ही चिंता लग्नानंतर तिला मूल व त्यातून मुलगाच हवा हा आग्रह चांगला पती व पुत्र हाच तिच्या जीवनाची सार्थकता मानण्यात आली आहे.

अंधश्रद्धेच्या जोरावर या समाजात मोठ्या प्रमाणावर देवदासी प्रथा सुरू आहे. त्यामुळे सालस, निरागस, शेवळ्या, निपरराधी मुलींचा बळी दिला जातो. त्यांना जिवंतपणे मारले जाते म्हणून अंधश्रद्धा आणि निरर्थक चालीरीती यांचा त्याग करून ज्ञानाची उपासना केली पाहिजे. ज्ञानाच्या बळावर वस्तुस्थितीचे आकलन करून घेतल्याशिवाय आपला विकास होणार नाही. असे महिलांना समजून सांगितले पाहिजे. समाजातून अंधश्रद्धा नष्ट झाली पाहिजे म्हणतात ना की, ''जुने जाऊ द्या मरणालागुनी जाळुनी किंवा पुरुनी टाका'' असे प्रत्येकाने ठरविले पाहिजे. पुढील पिढीला आवाहन आहे की, समाजाला लागले हे, अंधश्रद्धेचे ग्रहण सुटले पाहिजे, विशेषकरून स्त्रियांनी हे मानले पाहिजे की व्रतवैकल्य करून किंवा अंगात आणून करणी, भानामतीसारख्या अघोरी प्रथा चालवून सुख मिळत नाही.

❐

# रिती माझी ओंजळ.....

स्त्रीत्वाचा जन्म मला पुन्हा पुन्हा लाभू दे, रिती माझी ओंजळ बाईपणाने वाहू दे.

रुचिर अन्न वाढता तृप्त होऊ दे क्षुधा, क्षुधा तृप्त करण्यासाठी मला अन्नपूर्णा होऊ दे...

रिती माझी ओंजळ बाईपणाने वाहू दे

विद्यादान होऊ दे अन् वृद्धिंगत होवो ज्ञान, ज्ञानदान करण्यासाठी मला सरस्वती तू होऊ दे...

रिती माझी ओंजळ बाईपणाने वाहू दे

आईपणाची कूस माझी ममत्वतेने न्हाऊ दे,ममत्वतेच्या कार्यसिद्धी मला वात्सल्यपूर्ण होऊ दे...

रिती माझी ओंजळ बाईपणाने वाहू दे

गाऊ दे मला आता गीत नभी पसरू दे, गीत गाण्यासाठी मला शारदा तू होऊ दे...

रिती माझी ओंजळ बाईपणाने वाहू दे

ध्यान योग दे मला कास व्यायामाची दे, आरोग्य संपदेने मला स्वास्थ्यपूर्ण होऊ दे...

रिती माझी ओंजळ बाईपणाने वाहू दे

राबुदेत हात माझे कार्य महान होऊ दे, महान कार्य करण्यासाठी कर्तव्यनिष्ठ राहू दे...

रिती माझी ओंजळ बाईपणाने वाहू दे

कष्टणारे हात माझे यशकीर्ती न्हाऊ दे,यशकीर्तीच्या सागरात धनसंपदा मी होऊ दे...

रिती माझी ओंजळ बाईपणाने वाहू दे

प्राणप्रियाची साथ दे पत्नीधर्म मज लाभू दे, पत्नीधर्म जगण्यासाठी प्राणसखी मज होऊ दे...

रिती माझी ओंजळ बाईपणाने वाहू दे

**- वासंती ताठे**

**पर्वती स्वयंविकास सहकारी संस्था मर्यादित पुणे**

❐

# अन्नपूर्णा वार्तापत्र

**■ अंजली दिवाण पाटिल**

अन्नपूर्णा मधील माझ्या सर्व सभासद, कर्मचारी, विश्वस्त हितचिंतक अश्या सर्व मित्र मैत्रिणींनो, हा लेख लिहिताना मी ३ महिन्याच्या आपल्या कामाचा, घडलेल्या घटनांचा आढावा घेत असते.

डिसेंबरचा अंक आवडला का तुम्हांला, माझी माय अन्नपूर्णा आणि आपल्या देशाच्या तीन महान नेत्यांच्या  कार्या विषयी चे लेख...

आपला अंक प्रसिद्ध झाला आपल्या evaluation ट्रिप मध्ये. त्या दिवशी आपण सगळे लेखा फार्मला गेलो होतो. पुणे मुंबई सगळा स्टाफ आणि आम्ही सर्व विश्वस्त मंडळीही.

ही आपली ट्रिप खुप मजेचा दिवस असतो सगळ्यांसाठी. ताईंच्या मनात ही गोष्ट आली त्यालाही किती वर्ष झाली. सुरवातीच्या ट्रिप मला आठवत आहेत, सिंहगड पायथा ला छोट्या रिसॉर्ट किंवा त्या सारख्या ठिकाणी...

स्कूटरवर २,२ जण अश्या सगळ्या जायचो तेव्हा स्टाफ पण जास्त नव्हता.

मागील संपूर्ण वर्षाच्याकामाचा आढावा घ्यायचा, काही बदल करायचे का, पुढे काम कस करुयात, कसे वाढवू या ह्याबद्दल चर्चा व्हायची, जेवण करायचं आणि परत आपल्या गाडीवरून पुण्यात फिरायचं.

आता स्टाफ वाढला, नवनवीन कल्पना वाढल्या, creativity आली - त्यामुळे सादरीकरण आल. प्रोजेक्ट प्रमाणे तुम्ही आता तुमचं कामाचं सादरीकरण करता. झालेले काम, पुढील वर्षात कसे वाढणार, बदल करायचे असतील तर त्यावर चर्चा असे तुमच्यातील कला गुणासह बाहेर पडते. इतर स्टाफ ला ही अन्नपूर्णा मध्ये इतर प्रकल्पामध्ये कशी काम चालतात, तुमचा सहभाग, वेळेत काम संपवण्यासाठी काय केले पाहिजे, त्यावर इतर काम कशी अवलंबुन आहेत हे समजते. आणि सादरीकरण हे आपल्या आवडणाऱ्या गोष्टीरुप पद्धतीने नाट्यमय प्रकारे होतं जे सर्वांना आवडतेही आणि त्याचा एक प्रकारे training म्हणूनही उपयोग होतो. आणि दुपारनंतर आपण धमाल करतो की ज्या योगे सर्वच जण रिलॅक्स होतात शारीरिक आणि मानसिक दृष्ट्याही. तुम्हाला समजतं की नाही माहीत. नाही पण मानसिक दृष्टीने खूप रिलॅक्स होतो. आपण सगळे आणि त्यांचं दृष्टीने मेधा ताईंनी दरवर्षी एव्हडा खर्च होत असला तरी ट्रिप जिला आपण evaluation  ट्रिप असे नाव दिलंय ती arrange केले असते आपल्या वर्षभराच्या प्रोग्राममध्ये.

आणि आम्ही विश्वस्त मंडळी ही रिलॅक्स असतो, नवीन विषय जे आम्हाला बोलायला, चर्चा करायला वेळ मिळत नसतो, तो इथे काढतो, चर्चा करतो, गप्पाही मारतो, घरगुती गोष्टी ही इथे share करतो आणि थोडं नेहमीच्या कामातून बाहेरू येऊन नवी energy घेण्याचा प्रयत्न करतो.

यावर्षीही आपण अभ्यास ही केला आपल्या प्रकल्पचा आणि पुढील वर्षी कायबदल करू इच्छितो ह्यावर चर्चा केली आणि असे बदल जाने २०२० पासून अमलात ही आणले.

आपल्या ह्या ट्रिप नंतर १८ डिसेंबर ला आपल्या सर्व CRs ची ट्रिप होती. पुणे मुंबई दोन्ही कडील CR पुण्यात ट्रिप साठी आल्या होत्या. Community मधून प्रतिनिधी आपल्या वस्ती मधील सभासदांसाठी वर्षभर काम करतात, मीटिंग साठी येतात, विना मोबदला ते हे काम करत असतात, एक सामाजिक काम आहे ते.

सभासदांच्या अडचणी इथे मांडणी आणि नविन योजना त्यांच्या

पर्यंत पोहोचण्यात त्यांचा हातभार मोठा आहे. तर त्यांच्या exposure साठी आपली ही ट्रीप असते, एक दिवसाची.

पुणे किंवा मुंबई येतील काही ठिकाण त्यांना दाखवतो, माहिती देतो, ताई सकाळी त्यांना भेटून शुभेच्छा देतात.

अगदी शेवंताबाईच्या पासून हि ट्रिप चालू झाली आहे, त्या नेहमी ह्याची आठवण सांगतात, मुंबई ला त्यांना ट्रिप ला नेल्याची... ही मेधा बाई आपल्या कुठंतरी दुसरीकडे तर नेऊन सोडणार नाही ना अशा भीतीत ते सगळे ट्रिप ला गेले आणि मस्त मुंबई फिरून स्वच्छ मनाने परत आल्या ती आठवण त्या सगळ्याना सांगत असतात.

ह्यावेळी पुण्यात गांधीभवन आणि आगाखान Palace ह्या ऐतिहासिक स्थळाना भेट दिली. गांधी भवन फिरून पाहिले, छोटी फिल्म पहिली, गांधीजी विषयी खरी माहिती त्यांनी घेतली. आगाखान Palace ही फिरून पहिले. तिथले प्रदर्शन पाहिले. खुप आवडलं त्यांना.

नेहमीप्रमाणे ७ जानेवारीला आपली CR मीटिंग होती. इतर विषयां बरोबरीने यावेळी ताईंनी सर्व CR समोर काही गोष्टी मांडल्या.

केंद्र सरकारने भारतीय नागरिकत्व सिद्ध करण्यासाठी चा कायदा भारतात लागू करण्यासंदर्भात ताई सर्वांशी बोलल्या. हा कायदा लागू झाल्यास सर्व सामान्य व्यक्ती साठी खूप अवघड आहे. १९५१ पूर्वी पासून तुम्ही भारतात होतात असा कागदी पुरावा दाखवा अन्यथा तुम्ही भारतीय नाही असा त्याचा अर्थ.

आणि आपले वस्ती पातळी वरील सर्व सामान्य गरीब लोक असे कागद पत्र दाखवूच शकणार नाहीत. आताची कागदपत्र मिळू शकतील पण आपले पूर्वज इथल्या मातीत जन्मले ह्याचा पुरावा कसा मिळेल? तर आपण ह्या कायद्याला विरोध करू या का, आपण कागदपत्रांची महाराष्ट्र सरकारने सक्ती करू नये, इथे हा कायदा राबवू नये असा ठराव AGM ला घेऊ या का, असे ताईंनी सर्व वस्ती प्रतिनिधी ना विचारले, त्यांनाही ते पटले आणि एकमुखाने हा ठराव मांडू आणि मुख्यमंत्री यांना ते निवेदन आपण सह्या सकट देऊ असे ह्या मीटिंग मध्ये ठरले.

त्यानंतर सुरू झाली AGM ची धामधूम. तुम्ही त्यात बुडून गेला असाल.

आधी २३ जानेवारी मुंबई AGM झाली. वाशी मध्ये एक्सिबिशन सेंटर मध्ये जवळ जवळ ५००० सभासद उपस्थित होते. प्रमुख पाहुणे होते मशाल या संस्थेचे प्रमुख श्री. शरद महाजन आणि त्यांचे सोबत Habitat चे निलेश. ह्या संस्थेसोबत आपण काम करणार आहोत. गरीब महिलेचे घराचे स्वप्न आपण अन्नपूर्णा आणि मशाल हातात हात घेऊन पूर्णत्वाला नेण्याचा प्रयत्न नक्की करणार आहोत.

आपल्या दोन्ही AGM साठी ताईंना हा विषय अगदी सविस्तर घेतला. शरद महाजन आणि निलेश यांनी ही स्वस्त घराची सविस्तर माहिती दिली.

AGM मध्ये कॉ. आनंद मेणसे ह्यांनी लिहिलेले आणि कीर्ती मराठे ह्यांनी इंग्लिश मध्ये अनुवादित केलेल्या "गांधीजी" ह्या पुस्तकाचे प्रकाशनही झाले. पुस्तक प्रकाशन सोतब आपले यावर्षीचे कॅलेंडर ही प्रकाशित झाले. ज्यामध्ये आपण अन्नपूर्णा मधील विविध प्रकल्पा ची माहिती सभासदांना देतो. आपल्या वार्षिक अहवाल ही AGM मध्ये प्रकाशित केला. ज्या मधे वर्ष भराचा आढावा सभासदांना मंजुरी साठी मांडण्यात येतो.

१ फेब्रुवारीच्या पुण्याच्या AGM साठी रंजनी ताई रांची हुन आल्या होत्या. त्या पण Habitat India साठी काम करतात. स्वस्त, मजबूत घरे, एकत्रित घरे बांधण्यासाठी सल्ला आणि आवश्यक ती मदत ते देणार आणि अन्नपूर्णा फायनान्स देणार अशी ही योजना आहे.

IOB चे प्रमुख हरिहर सेना हे पण उपस्थित होते.

AGM ला ताईंना काही गोष्टी, काही ठराव पास केले, नविन कर्जाची रक्कम वाढवली आहे. पहिले कर्ज आता २५,३०,३५ हजार ह्या रकमेचे मिळू शकेल आणि त्यासाठी कर्ज जी वरील व्याजाची काही वाढ नाही. फक्त ४० ते ६०००० ह्या स्लॅब साठी आपला व्याजदर १३.५०% असा करू या का असे ताईंनी सर्व सभासदांना विचारले. त्यांची मंजुरी AGM मध्ये घेतली गेली. मेधा ताईंनी AGM मधे असेही सांगितले की ह्या वर्षी आपण HMF, FMF, LMF साठीची वर्गणी तीच ठेवली आहे, वाढवणार नाही. यावर्षी साठी आपण सर्व सभासदांसाठी ८% ने डिविडंड मंजूर केला. ताईंनी तसे सांगताच टाळ्याच्या गजरात त्याचे स्वागत झाले.

AGM मधेच ताईंनी अजून एक ठराव मंजूर करून घेतला. आपल्या स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी अन्नपूर्णा मधील RD आणि FD च्या व्याजदरात किंचित वाढ केली आहे.

१ वर्षासाठी १०% ऐवजी १०.२५%

२ वर्षाचा ११ ऐवजी १२%

आणि ३ वर्ष साठी १२.२५% असा व्याजदर मिळू शकणार आहे. आपल्या सभासद सुद्धा RD FD करू लागल्या आहेत तर त्यांना हा फायदा नक्की मिळू शकेल.

७ जानेवारीच्या CR मिटींगमध्ये चर्चिला गेलेला भारतीय नागरिकत्व कायद्याची ही माहिती ताईंनी सर्व सभासदांना दिली. त्यांना हा कायदा इतका आपल्यापर्यंत येईल, आपल्याला आपल्या पूर्वजांच्या जन्म दाखल्याची गरज भासेल असे वाटले नव्हते. आदिवासी, दवाखान्यात न जन्मता घरीच बाळंतपण झालेल्या व्यक्तींकडे कुठली असणार कागदपत्र... ह्या कायद्याची तीव्रता त्यांना भिडली आणि एकमुखाने सर्वांनी आपण ह्याला विरोध केला पाहिजे, आम्ही नक्की ह्यात सहभागी आहोत, आमच्या सह्यांचे निवेदन मुख्यमंत्री साहेबांना आपण पाठवू, असा ठराव दोन्ही AGM मध्ये मंजूर झाला.

नागरिकत्व नोंदणी कायद्याला विरोध करण्याचा ठराव आपण मांडला, मुख्यमंत्री यांना सह्यांचे पत्र आपण पाठवणार आहोतच.

त्याचप्रमाणे पुण्यात सुद्धा ह्याला विरोध करण्यासाठी खूप ठिकाणी आंदोलन चालू आहेत. शाहीन बाग, कौसर बाग येथील महिलांना पाठिंबा आणि ह्या कायद्याला विरोध यासाठी १८ जानेवारी रोजी पुण्यामधील स्त्री मुक्ती संघटनेच्या अलका पावनगडकर, मनीषा गुप्ते, लोकायातचे कार्यकर्ते, किरण मोघेताई, सुनिती सू. र. अन्वर राजन, अन्नपूर्णा परिवारकडून मेधा ताई, चित्रा ताई, अंजली ताई, लता, गणेश, दिनेश, ऋचा, कबीर कला मंचचे कित्येक दुसऱ्या दिवशी विद्यार्थी असे जवळ जवळ एक हजार लोक सायंकाळी सहा ते सकाळी सहा पर्यंत गाणी, शाहिरी गीतं, खूप उत्साही वातावरण यासह उपस्थित होते. संपूर्ण रात्र अशा वातावरणात जागवली. हा कायदा का नको ह्यावर खूप वक्ते बोलले. काही मुस्लिम नेते आले होते, त्यांनीही ह्या गोष्टीला पाठिंबा दिला.

कौसर बाग कोंढवा इथेही खूप महिला दिवसभर बसून असतात, हा कायदा लागू होऊ नये म्हणून. आपल्या लहान लहान मुलांना घेऊन बसून असतात. गेली कित्येक दिवस ह्या तडफदार महिला आंदोलनात सहभागी आहेत. अन्नपूर्णा परिवारमधून २२ जानेवारी रोजी मेधा ताई, अंजली ताई, उज्वला ताई, आरती ताई, अनिता ताई आपल्या कोंढवाचे मेंबर ना घेऊन तिथे बसलो. गाणी म्हटली. ताईंनी त्या सर्वांचे खूप अभिनंदन केले, त्यांना पाठिंबा दिला. त्यांचा हौसला वाढवला.

आणि १४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी हम भारत के लोगक चे विलास किरोते, सुभाष वारे, कबीर कला मंचची मुल, अन्नपूर्णा मधील खूप स्टाफ अशी आपण सगळ्यांनी मिळून स्वारगेट चौकात सायंकाळी सहा ते आठ मानवी साखळी केली. नागरिकत्व कायद्याच्या विरोधात का आहोत, हा कायदा लागू केले तर सगळ्या सामान्य माणसांना त्याची कशी झळ बसेल ह्याचे एक पत्रक आपण लोकांमध्ये वाटले. लोकांशी बोललो, त्यांना ह्यामध्ये सामील होण्याचे आवाहन केले.

२ फेब्रुवारी रोजी आपल्या मेधा ताईंना बेळगांव इथल्या येळ्ळूर साहित्य संमेलन मध्ये रमाबाई आंबेडकर ह्यांच्या नावाचा सामाजिक पुरस्कार मिळाला. आपल्या सर्वांसाठी ही अभिमानाची गोष्ट आहे.

आणि अजून एक अभिमानाची गोष्ट इथे नमूद करते. आपल्या पद्मश्री प्रेमा ताईंना देखील ८ फेब्रुवारीला सामाजिक कृतज्ञता पुरस्कार मिळाला. प्रेमाताई आजारी असल्याने त्यांच्याऐवजी मेधा ताईंनी तो स्वीकारला. एस एम जोशी सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. यावेळी ताईंनी प्रेमा ताई आणि दादा पुरव ह्या असमान्य अशा आई वडीलांमुळे आपण कसे घडलो, त्यांनी पेरलेल्या सामाजिक संस्कारामुळे आज मी इथे आहे, अन्नपूर्णा इतकी मोठी झाली आहे, वाढली आहे तरीही मी जमिनीवर आहे ती ह्या दोघांमुळे असे सांगितले.

तुम्हाला जानेवारी महिन्यात ट्रेनिंगमध्ये शिकवले असेलच की कर्ज देण्यासाठी आपण यावेळी आरडी आधारपूर्णाला जास्त महत्त्व दिले आहे. तुम्ही सर्वांनी ते नोटीस केले असेलच. जर मला माझी ब्रँच सक्षम करायची आहे तर आणि माझे सभासद स्वत:च्या पायावर ठाम उभे असावेत असे तीव्रतेने वाटत असेल तर ह्या दोन गोष्टीसाठी मी आग्रही असावयास हवीच हो ना. आणि मी नक्की कर्ज फॉर्म तपासताना ह्याची नोंद घेते हे तुम्ही पाहाल.

आपल्या पाळणाघर मुलांचे आरोग्य शिबिर ह्यावेळी डिसेंबरमध्ये झाले. जवळ जवळ आठवडाभर सर्व पाळणाघरामध्ये शिबीर, तपासणी चालू होती. आपल्या बच्चे कंपनीचे आरोग्य चांगले राहिले पाहिजे ह्याची आपल्या पाळणाघर ताई आणि डॉक्टर काळजी घेतात.

त्याचप्रमाणे तुमचेही आरोग्य नक्कीच चांगले असले पाहिजे ह्यासाठी ही आपली आरोग्य शिबीर असतात हे तुम्ही जाणताच. यावेळी ६ जानेवारीला तुम्ही आपली दृष्टी नीट आहे ना, प्रॉब्लेम नाही ना हे तपासून घेतले ना. हो हो तुमच्या डोळे तपासणी शिबिराबद्दलच बोलते आहे मी.

आपली विश्वस्त मंडळ मीटिंग ही ५ डिसेंबरला झाली आहे. वर जे नियम बदल केले ते ह्या बोर्ड मिटींगमध्ये चर्चा करून मंजूर केले होते आणि जानेवारीपासून अंमलात आणले गेले आहेत. कोणतेही नियम बोर्ड मंजूरी शिवाय आपण तसेच चालू करत नाही हे तुम्ही नक्कीच जाणता.

इथे वस्ती प्रतिनिधी ही सामील असल्यामुळे सामान्य सभासदांना काय फायद्याचे, तोट्याचे होईल, कोणता नियम क्लीष्ट असू शकेल ह्याची नक्कीच चर्चा होते, आणि वस्ती प्रतिनिधी त्यावर मत मांडतात.

मागील अंक वाचून तुमच्या प्रतिक्रिया पाठवल्या का ग तुम्ही...? आम्ही त्याची वाट पाहतो नेहमी. डिसेंबरचा अंक सामाजिक बांधिलकी असणाऱ्या भारतातील तीन थोर नेत्यांचा, त्यांच्या भारतीय तळागाळातील लोकांसाठी, स्त्रियांसाठी असणाऱ्या मानसिकतेचा होता. धर्म जात यावर विद्वेष न करण्याचा आग्रह धरण्याचा होता, जो की आज देशभर जास्त पसरवला जात आहे. त्यावरच भर दिला जात आहे आणि आपण एक स्त्री, एक चांगला माणूस म्हणून ह्या सर्व गोष्टींना विरोध केला पाहिजे. एक सुंदर प्रेमाचे जग निर्माण करण्यात आपला नक्कीच हातभार असला पाहिजे. आपण वस्ती पातळीवर काम करतो, तिथे कुठेही हाच संदेश आपल्याकडून गेला पाहिजे. घरातील प्रमुख स्त्री, जी आपल्या मुलांना, तरुण पिढीला घडवते, तिला आपण ठाम केले पाहिजे, आर्थिक आणि वैचारिकसुद्धा. पटते आहे का ग तुम्हाला. चला तर मग अन्नपूर्णा म्हणून आणि एक चांगले भारतीय म्हणून आपण आपला वेळ सत्कारणी लावू या. नोकरी करता करता हातात हात घालून सामाजिक काम ही करूया.

तर मैत्रिणींनो आणि माझ्या तरुण सहकाऱ्यांनो ही घडी खूप कठीण आहे, समजून उमजून काम करूया.

भेटेनच मी परत अशीच पुढील वार्ता पत्रात...

❐

# सत्य आणि तथ्य, याचा भ्रम

■ **प्रतिमा जोशी**

***शिक्षणामुळे मुलींमध्ये उद्धटपणा येतो आणि त्यामुळे घटस्फोट होतात, या सरसंघचालक मोहन भागवत यांच्या अजब विधानाची घेतलेली झाडाझडती...***

नवऱ्याने मारलं आणि पावसाने झोडपलं, तर तक्रार कुणाकडे करायची? या प्रश्नची धग कमी केली ती स्त्रीशिक्षणानं आणि त्याची उत्तरं दिली ती भारतीय संविधानानं. अनेक राजे, सरदार, संस्थानं यांमुळे विखंडित असलेल्या आणि धर्म, जाती, पंथ, संप्रदाय यांमुळे शतखंड अवस्थेतील आपल्या देशाला एक राष्ट्र म्हणून आकार देणाऱ्या भारतीय संविधानानं शिक्षण, रोजगार, अभिव्यक्ती, आचार, विचार, विहार, संचार, अधिकार या सर्व बाबतीत सर्व जातिधर्मीच्या पुरुषांच्या बरोबरीनेच स्त्रियांनाही समान हक्क बहाल केले आणि दीडेकशे वर्षांपूर्वी फुले दाम्पत्याने रुजवलेल्या स्त्रीशिक्षणाच्या रोपट्याचे सावली देणाऱ्या वृक्षात रूपांतर करण्याच्या प्रक्रियेला गती दिली. नवऱ्याने मारलं आणि पावसाने झोडपलं तर काय करावं, या प्रश्नाच्या उन्हात भाजून निघालेल्या बायांनी या सावलीत मोकळा श्वास घेतला आणि आपण कोणत्याही बाबतीत कमी नाही, हे अतीव कष्ट घेऊन सिद्ध केलं. संसाररथाची दोन्ही चाकं सारख्याच त्रिज्येची आणि क्षमतेची असतील, तरच संसार सुखाचा होतो हे नैसर्गिक तत्त्व अधोरेखित केलं.

हात उगारण्यासाठी नसतात, हात हातात मिळवण्यासाठी असतात; हे सहजीवनातलं हरवलेलं सूत्र भारतीय संविधानानं स्त्रीपुरुषांच्या हाती सोपवलं, त्याला जेमतेम सत्तर वर्षंही होतायत, वाटचाल नुकतीच कुठे सुरू होतेय, तेवढ्यातच स्त्रीशिक्षणामुळे कुटुंबसंस्था डळमळीत होत असल्याचा साक्षात्कार मोहन भागवत यांना झाला आहे. भागवत हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक आहेत. राष्ट्रउभारणीला आपण समर्पित असल्याचा संघाचा दावा आहे. संघ राष्ट्रवादाचा कडवा पुरस्कर्ता आहे आणि भागवत हे त्या संघटनेच्या सर्वोच्च पदावर आहेत. रा. स्व. संघाच्या सेवाकार्याचाही मोठा बोलबाला आहे. संघ देशाला माता मानतो. देवीचा दर्जा देतो. त्यामुळे स्त्रियांच्या प्रति या संघटनेला आदर असावा, असं तत्त्वत: मानण्यास हरकत नाही.

मात्र भागवतांनी अलीकडेच एका कार्यक्रमात हे जाहीर वक्तव्य केलं आहे, ही वस्तुस्थिती आहे. त्यांच्या मते, जास्त शिकल्यामुळे मुलींमध्ये अहंकार निर्माण होतो आणि त्यामुळे संसार मोडतात. शिकलेल्या मुली जुळवून घेऊ शकत नाहीत, नमते घेत नाहीत, परिणामी संसार टिकत नाहीत. भागवतांच्या या विधानांचा व्यत्यास काढला, तर काय म्हणता येईल... तर कुटुंबव्यवस्था आणि पर्यायानं समाजव्यवस्था विनाकलह आणि मुकाट चालवायच्या असतील, तर स्त्रियांनी अधिक शिकून काही उपयोग नाही, कारण शिकलेल्या स्त्रिया बखेडे, तंटे उत्पन्न करतात!

एका प्रखर राष्ट्रवादी म्हणवणाऱ्या संघटनेच्या प्रमुखाने हे वक्तव्य करणे, हे अनेक अर्थांनी गंभीर आहे. हे त्यांचे वैयक्तिक मत आहे, असे सांगून संघ परिवार त्यावर पांघरुण घालू शकत नाही. भागवतांची आणि त्यांच्या संघटनेची, राष्ट्र आणि राष्ट्रवादाची व्याख्या काय आहे, असाच प्रश्न यातून उपस्थित होतो. जात, धर्म, वंश आणि लिंग या सगळ्याला निरपेक्ष समान दर्जा देणाऱ्या भारतीय राज्यघटनेच्या तत्त्वांवर उभ्या असणाऱ्या भारत नावाच्या आधुनिक राष्ट्राची कल्पना आणि असा दर्जा लाभण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न नि कायद्यांसहित सार्थ हस्तक्षेप, ही राष्ट्रवादाची व्याख्या त्यांना मंजूर आहे की नाही, असाही प्रश्न यातून निर्माण होतो.

भागवतांचे विधान आणखीही काही कारणांसाठी गंभीरपणे घ्यायला हवं. मुली आणि स्त्रियांवरील अत्याचारांच्या घटना एकीकडे वाढत असताना, दुसरीकडे स्त्रियांनीच कसं मर्यादेत दोन्ही खांद्यांवरून पदर घेऊन आणि सातच्या आत घरात, अशा पद्धतीने वावरलं पाहिजे, याचे डोस देणाऱ्या संस्कृतिरक्षकांची फौज सध्या महाराष्ट्राच्या आणि देशाच्याही सामाजिक-सांस्कृतिक पटलावर सुसज्ज आहे.

मासिक पाळीत बाईनं स्वैपाक केला तर ती पुढच्या जन्मी कुत्री होते, इथपासून ते सम तारखेस संग केला तर मुलगा व विषम तारखेस केला तर मुलगी, असे जावईशोध लावणाऱ्या कथित आध्यात्मिक गुरुंचा सध्या सुळसुळाट आहे. सत्य आणि तथ्य नसलेल्या असंख्य गोष्टी, ज्यांची जेमतेम दुसरी-तिसरी पिढी शिकू लागली आहे, अशा समूहांच्या माथ्यावर थोपवल्या जात आहेत. त्यातील खरेखोटेपण तपासून बघण्याचं तारतम्य, बहुसंख्य नागरिकांत नाही. या देशातील एक मोठी टक्केवारी अशा समूहांनी बनलेली आहे. तर्कशुद्ध विचारांचं बोट धरून मानवी मूल्यांचा आग्रह धरणारा समाज निर्माण करायचा, की तर्कहीन युक्तिवादाच्या चक्रव्यूहात त्यांना गरगरत ठेवायचं, हा पेच भागवत आणि त्यांच्या संघटनेला सोडवावाच लागणार आहे. मात्र त्यांच्या या ताज्या विधानावरून तरी हा पेच कायमच राहावा, अशी त्यांची अनधिकृत भूमिका असावी अशी शंका घेण्यास वाव आहे.

पूर्वीच्या काळी, म्हणजे आत्ता आत्ता विसाव्या शतकापर्यंत, लग्नाच्या गाठी स्वर्गात देव बांधतो अशी समजूत होती. गाठी जरी जगन्नियंता बांधत असला, तरी जन्मकुंडली पाहून, त्यातील किती गुण जुळतात ते पाहून मगच विवाह पक्का केला जात असे. केवळ कुंडलीच पुरेशी नसे, तर गोत्र, नाडी, पदर सर्व जुळायला हवं. शिवाय जात, पोटजात तर अतिशय महत्त्वाची. थोडक्यात कुंडली, गोत्र, जात याबाबत देवालाही काही चॉइस नसे. खरं तर हे अगदीच भूतकाळात पाहण्याची आवश्यकता नाही. कारण आजही बहुतांश कुटुंबांत या सर्व बाबींचं प्रस्थ कायम आहे आणि लग्नगाठी तो जुळवतो आणि संसारातील दु:खं, संसार मोडणं हेही त्याच्याच हातात असतं... नशिबाचा खेळ असतो तो, पूर्वजन्मीच्या कर्माची फळं असतात वगैरे वगैरे समजुतीही थोड्या अशक्त झालेल्या असल्या, तरी लोकांच्या मनात जागा बळकावून बसलेल्या दिसतात. अशा समजुती आणि भारतीय समाजजीवनातील पुरुषप्रधानता यांच्या आहारी गेलेल्या समाजाला परस्परांचा आदर करणारी, सुखी सहजीवनाची संकल्पना स्वीकारार्ह तेव्हाच वाटेल, जेव्हा नवऱ्यानं मारलं आणि पावसानं झोडपलं, तर तक्रार कुणाकडे करायची, हा प्रश्न आपल्या संस्कृतीत अस्तित्वात आलाच कसा, याच्या मुळाशी जाण्याची आवश्यकता स्त्री-पुरुष सर्वांनाच भासेल.

स्त्रियांनी कसं मर्यादशील जगावं याचे धडे देणाऱ्यांना, पुरुषांनी हिंस्र, आक्रमक आणि क्रूर वर्तन करू नये असे धडे द्यावेसे वाटू नये? ज्यांच्या खांद्यावर राष्ट्रनिर्मितीची धुरा सरसंघचालक देऊ पाहतात, ज्यांच्यातील राष्ट्रवादाची भावना ते प्रखर करू पाहतात, ज्यांना देशाच्या रक्षणासाठी दक्ष राहण्याच्या सूचना देतात; त्या तरुणांना, पुरुषांना घरातील-समाजातील स्त्रियांशी आदराने आणि सन्मानानं वागण्याविषयी, किमान आईबहिणीवरून शिव्या न देण्याविषयी ते चार शब्द बोलतील, तर राष्ट्रनिर्मितीच्या दिशेनं अर्धं पाऊल तरी पुढे पडेल!

समाज निकोप होण्यासाठी, समाज ज्या ज्या घटकांचा मिळून बनलेला आहे, त्या घटकांचं सहअस्तित्व असणं गरजेचं असतं. त्यासाठी आधी दुसऱ्याचं अस्तित्व मान्य असावं लागतं. स्त्री-पुरुष सहअस्तित्व ही समाजाचा दर्जा उंचावण्यासाठी अत्यंत निकडीची बाब आहे. स्त्रियांचं वेगळं संघटन एका टप्प्यानंतर अपुरं आहे आणि संघटनात्मक पातळीवरही स्त्री-पुरुष सहअस्तित्वाची गरज आहे; याकडेही भागवत आणि त्यांच्या संघटनेनं आस्थेनं पाहिलं, तर भारतीय कुटुंबव्यवस्थेतील पेचांबाबत त्यांची विधानं वेगळी येतील!

या देशातील मुली आणि महिला, निव्वळ जिवंत राहण्यासाठी, इभ्रतीनं जगण्यासाठी आज, एकविसाव्या शतकातही झगडत आहेत. शिक्षण आणि त्याद्वारे आर्थिक स्वावलंबन, हेच अस्त्र त्यांच्यापाशी आहे. दुसऱ्याला इजा न करता स्वसंरक्षण करणारं हे नामी अस्त्र आहे. ते काढून घेण्याचा प्रयत्न कोणी करेल, तर ते आता शक्य नाही...! ❐

---

# कविता

१) अन्नपूर्णा संस्थेची दुनिया ही न्यारी
गगनाला गवसणी घालून घेऊ उंच भरारी

२) नवी स्वप्ने, नवी क्षितिजे नवी आशा
कष्टकरी, गरीब, गरजू सभासदांना मिळावी नवी दिशा

३) Amccsl मधुनी मिळाली Micro Finanace ला गती
Sd, Rd, Fd मधुनी झाली बचतीची प्रगती

४) Loan, Neft System ला आला आकार
तीन दिवसांचा Goal झाला साकार

५) Apvs ने दिला आधारपूर्णाचा आधार
आरोग्य, कुटुंब, जीवन विम्याने आला जगण्याला आधार

६) vatsalyapurna ची मजाच भारी
बालगोपालांची आली स्वारी
आरोग्य, शिक्षण संगोपनाची जोडी
खेळ, कला अशा विविध गुणांची लागली गोडी.

७) Amm च्या Vidyapurna प्रकल्पाने दिला
एकट्या मातांच्या पाल्यांना मदतीचा हात
उज्ज्वल यशस्वी भविष्याची झाली सुरूवात

८) DPRC मधुनी होतात नवनवीन संशोधने
पुस्तकांमार्फत साकारतात ज्ञानामृताची प्रकाशने

**- सौ. हेमलता देसाई**
**(Amm Pune Accountant)**











पॉलीहैड्रॉन पुरस्कृत
स्वामी विवेकानंद विचार मंच
१५वे
येल्लूर ग्रामीण मराठी साहित्य संघ आयोजित
येल्लूर ग्रामीण मराठी साहित्य संमेलन

स्वामी विवेकानंद विचार मंच
१५वे





























अन्नपूर्णा परिवारातर्फे श्री सुरेश धोपेश्वरकर यांनी ''संवाद त्रैमासिक'' न्यू एज प्रिंटींग प्रेस,
८५ सयानी रोड, प्रभादेवी ४०००२५ येथे छापून घेतले.